M53 एम. ए. (लोकप्रशासन)
सेमिस्टर I
COURSE CODE : PAD103
BOOK CODE : PAD 1031

# PAD 103
## भारतीय शासन आणि प्रशासन

## पुस्तक 1
# भारतीय राजकीय यंत्रणा

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

मुखपृष्ठ रचना : अविनाश उमाकांत भरणे / मु. नि. केंद्र / यचमुवि विद्यापीठ / AF21-98

ज्ञानगंगा घरोघरी
यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

**PAD103**
**भारतीय शासन आणि प्रशासन**
**Book Code : 1031**

**पुस्तक १**

# भारतीय राजकीय यंत्रणा

**लेखक : डॉ. शैलेश अकुलवार**

| | |
|---|---|
| घटक १ : भारतीय लोकशाही व्यवस्था | १ |
| घटक २ : राष्ट्रपती व उपराष्ट्रपती | ११ |
| घटक ३ : राज्यसभा | १९ |
| घटक ४ : लोकसभा | २८ |
| घटक ५ : पंतप्रधान व मंत्रीमंडळ | ३७ |
| घटक ६ : सर्वोच्च न्यायालय | ४८ |

Course Code : PAD103 Book Code : PAD1031 : भारतीय राजकीय यंत्रणा

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन

### मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषद


**डॉ. प्रवीण घोडेस्वार**
प्र. संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**नागार्जुन वाडेकर**
सहयोगी प्राध्यापक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. हेमंत राजगुरू**
सहयोगी प्राध्यापक
शैक्षणिक सेवा विभाग
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. विजया पाटील**
सहयोगी प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**माधव पळशीकर**
सहयोगी प्राध्यापक
संगणकशास्त्र विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**डॉ. मोहन काशीकर**
प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर

**डॉ. सतीश बडवे**
प्राध्यापक
मराठी भाषा आणि साहित्य विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. लतिका अजबानी**
सहायक प्राध्यापक
वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा
य.च.म. मुक्त विद्यापीठ
नाशिक

**डॉ. सुरेश कानडे**
प्राध्यापक
हिंदी विभाग
एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय
नाशिक

**डॉ. मधुकर शेवाळे**
उप ग्रंथपाल
य.च.म. मुक्त विद्यापीठ
नाशिक

**डॉ. विनायक देशपांडे**
प्राध्यापक व माजी विभागप्रमुख
व्यवसाय व्यवस्थापन विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
नागपूर


### अभ्यासक्रम समिती


**डॉ. श्याम शिरसाठ**
प्र. कुलगुरू
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. बालाजी कत्तूरवार**
प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड

**डॉ. वासंती रासम**
प्रमुख
राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. भारत गोरे**
सहयोगी प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
विवेकानंद महाविद्यालय
औरंगाबाद

**डॉ. जितेंद्र वासनिक**
सहयोगी प्राध्यापक
लोकप्रशासन व स्थानिक स्वराज शासन
विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ
नागपूर

**डॉ. प्रीती पोहेकर**
प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
राजर्षि शाहू महाविद्यालय
लातूर

**डॉ. अशोक नाईकवाडे**
प्राचार्य
पंडीत जवाहरलाल नेहरू महाविद्यालय
औरंगाबाद

**डॉ. अभिजित पिलखाने**
सहयोगी प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग
चेतना शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
कला वरिष्ठ महाविद्यालय, औरंगाबाद

**Course Code : PAD103 Book Code : PAD1031 : भारतीय राजकीय यंत्रणा**

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**कुलगुरू : प्रा. ई. वायुनंदन**

**प्र. संचालक : डॉ. प्रवीण घोडेस्वार, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**


**लेखक**

**डॉ. शैलेश अकुलवार**
सहायक प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग
बलभीम महाविद्यालय, बीड

**संपादक**

**डॉ. श्याम शिरसाठ**
प्र. कुलगुरू
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**अनुदेशन–तंत्र–संपादक**

**डॉ. सुनील गावंडे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**भाषा संपादक**

**डॉ. सुशील कांबळे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**शिक्षणक्रम संयोजक**

**डॉ. सुनील गावंडे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**डॉ. सुशील कांबळे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२

**राजेंद्र सोरमारे**
शैक्षणिक संयोजक
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ
नाशिक-४२२२२२



**निर्मिती**

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

*First Edition developed under DEC development grant.*

- **प्रथम आवृत्ती** : ऑगस्ट २०२१ **प्रकाशन क्रमांक** : २३११
- **मुखपृष्ठ रेखाटन** : श्री. अविनाश भरणे
- **अक्षरजुळणी** : परफेक्ट कॉम्प्युटर, त्रिमूर्ती चौक, सिडको, नाशिक - ८
- **मुद्रक तथा प्रकाशक** :डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**ISBN 978-93-91514-02-0**

**B18-19-117**

# कुलगुरूंचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम. ए. लोकप्रशासन या पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमात प्रवेश घेतल्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो. या शिक्षणक्रमाची पुस्तके आपल्या हाती देतांना मला विशेष आनंद होत आहे.

गेल्या तीस वर्षात विद्यापीठाने समाजाच्या गरजेनुरूप कौशल्यधिष्ठित शिक्षणक्रम विकसनास प्राधान्य देऊन शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. केवळ पारंपरिक शिक्षणावर आणि पुस्तकी ज्ञानावर भर ने देता, ज्ञानाचे उपयोजन दैनंदिन जीवनात स्वत:च्या व समाजाच्या हितासाठी कसे करावे, याचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा विद्यापीठाने सतत प्रयत्न केलेला आहे. कोणत्याही कारणाने शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य्य प्रवाहात येण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. काम करता करता शिक्षण घेता येईल असे शिक्षणक्रमाचे लवचिक स्वरूप, जसे शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी वाढीव कालावधी, अत्यल्पशिक्षणक्रम शुल्क आणि विद्यार्थीकेंद्री कार्यपद्धती, इत्यादी मुक्त शिक्षणप्रणालीची वैशिष्ट्ये आहेत. विद्यापीठाने शिक्षणाच्या संधीचे लोकशाहीकरण करताना, केवळ आर्थिक कुवत नाही म्हणून शिक्षण घेता आले नाही अशी स्थिती असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणले आहे.

शासन तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, विविध संस्था, संघटनांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार तसेच बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन विद्यापीठामार्फत नवनवीन शिक्षणक्रम विकसित करण्यात येतात. विविध शिक्षणक्रमाची त्या त्या विषयातील तज्ञांद्वारे विकसित केलेली दर्जेदार पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध करून दिली जातात. मुक्त विद्यापीठाने विकसित केलेली ही पुस्तके विद्यापीठाची ओळख झाली आहेत, याचा मला अभिमान वाटतो. अशा प्रकारे मुक्त विद्यापीठाने ज्ञानगंगा घरोघरी पोहचवणारी शिक्षणप्रणाली निर्माण करून देत राज्याच्या विकासात आपले योगदान दिले आहे.

लोकप्रशासन हा विषय एक विद्याशाखा म्हणून फक्त शंभर ते सव्वाशे वर्षापूर्वी अमेरिकेत अस्तित्वात आल्याचे दिसते. आता जगभरातील जवळपास सगळ्या प्रमुख विद्यापीठांमध्ये लोकप्रशासन एक स्वतंत्र विषय म्हणून शिकविल्या जात आहे. लोकप्रशासन एक विद्याशाखा म्हणून भारतातूनही मान्यता पावलेली दिसून येते. मात्र महाराष्ट्रात लोकप्रशासन एक स्वतंत्र विषय म्हणून काही मोजक्याच विद्यापीठात शिकविण्यात येतो. मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून सदर विषय महाराष्ट्रभर अभ्यासला जात आहे याचा आनंद वाटतो.

राज्याच्या (स्टेट) बदलत्या स्वरूपानुसार आता राज्य केवळ कायदा व सुव्यवस्था पाहणारी व्यवस्था राहिली नसून लोकांचे सर्वंकष कल्याण करणारी व्यवस्था बनली आहे. मात्र आधुनिक कल्याणकारी राज्यात लोकांचे कल्याण साधण्याकरिता कायदेमंडळाने ठरविलेल्या धोरणांची यथोचित अंमलबजावणी करण्यासाठी राज्याएवढीच लोकप्रशासनाच्या कार्याचीही आवश्यकता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी राज्याच्या आणि प्रशासनाच्या बदलत्या भूमिका बारकाईने समजून घ्यायला हव्यात.

लोकप्रशासन हा विषय विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या अभ्यासापासून ते ग्रामपंचायतीच्या सदस्यांपर्यंत सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषट आहे. विशेषत: लोकप्रशासन हा वैकल्पिक विषय घेऊन विविध विद्याशाखेतील विद्यार्थी केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन करीत आहेत. प्रशासकीय सेवेमध्ये निवड झाल्यानंतर कर्तव्य पाड पाडतांना लोकप्रशासनातील या तत्त्वांचा व सिद्धांतांचा त्यांना व्यवहारात उपयोग होताना दिसतो. त्या अनुषंगाने या शिक्षणक्रमात काही अभ्यासक्रमांचा विशेषत्वाने अंतर्भाव करण्यात आला आहे. जसे 'ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था', 'महाराष्ट्र प्रशासन', 'ग्रामीण विकास', 'भारतातील लोकशाही व विकास', इत्यादी महत्त्वाच्या अभ्यासक्रमाबरोबरच 'लोकप्रशासनातील नवप्रवाह', 'मानव व वित्तीय संसाधन व्यवस्थापन' व 'सामाजिक कल्याण प्रशासन', इत्यादी नविन घटकांचाही समावेश करण्यात आला आहे. आपल्या विषयात अद्ययावत राहण्यासाठी विद्यापीठाने तुम्हाला पुरविलेल्या स्वयं-अध्ययन साहित्याबरोबरच तुम्ही योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य अशा चालू घडामोडींवरील मासिकांचेदेखील नियमित अध्ययन करायला हवे.

पारंपारिक शिक्षणप्रणालित विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांमध्ये दररोज अभ्यासवर्ग असतात, तर दूरशिक्षण प्रणालीमध्ये सुट्टीच्या दिवशी संपर्कसत्र आयोजित केली जातात. स्वत:च्या व्यावसायिक तसेच कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण पूर्ण करणे असे या संकल्पनेमध्ये अपेक्षित असल्याने संपर्कसत्राला जातांना संबंधित अभ्यासक्रमाचा, त्यातील पुस्तकांचा म्हणजेच त्यातील घटकांचा अभ्यास करून उपस्थित राहणे आवश्यक आहे. म्हणजे तुमच्या शंका-अडचणी, प्राध्यापकांना त्यांचे

निराकरण करून घेता येईल. आदर्श संपर्कसत्राचे स्वरूप एकसुरी व्याख्यानाऐवजी चर्चात्मक व्हावे अशी विद्यापीठाची भूमिका आहे. विद्यापीठाने दृकश्राव्य माध्यमाचा प्रभावीपणे वापर करून विविध विषय तज्ज्ञांची व्याख्याने, मुलाखती विद्यापीठाच्या युट्युब वाहिनीवर (चॅनलवर) उपलब्ध करून दिल्या आहेत त्या आवर्जून पहाव्यात.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये प्रशासनात अंकित (डिजिटल) तंत्रज्ञानाचा वापर करून कागदरहित (पेपरलेस) प्रशासनावर भर दिल्या जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाची पुस्तके डिजिटल स्वरूपात www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत, ती विद्यार्थी, शिक्षक तसेच जिज्ञासूंना उपयुक्त ठरतील अशी खात्री आहे. विद्यापीठाच्या पुस्तकांबद्दल आपल्या अभिप्रायाचे स्वागत आहे.

आपल्या भविष्यातील वाटचालीसाठी पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा !

**प्रा. ई. वायुनंदन**
**कुलगुरू**

ज्ञानगंगा घरोघरी

## एम.ए. (लोकप्रशासन) पदव्युत्तर शिक्षणक्रम (M53)

## अभ्यासक्रम

## भारतीय शासन आणि प्रशासन (PAD103)

### पुस्तक १ :भारतीय राजकीय यंत्रणा

घटक १ : भारतीय लोकशाही व्यवस्था
घटक २ : राष्ट्रपती व उपराष्ट्रपती
घटक ३ : राज्यसभा
घटक ४ : लोकसभा
घटक ५ : पंतप्रधान व मंत्रीमंडळ
घटक ६ : सर्वोच्च न्यायालय

### पुस्तक २ : भारतीय प्रशासन

घटक १ : भारतीय प्रशासनाचा उगम व विकास
घटक २ : भारतीय प्रशासनाची वैशिष्ट्ये
घटक ३ : केंद्रीय मंत्रालय/खाते
घटक ४ : केंद्रीय सचिवालय
घटक ५ : मंत्रीमंडळात्मक सचिवालय व पंतप्रधानांचे कार्यालय
घटक ६ : भारतातील प्रशासकीय सुधारणा : एक आढावा

### पुस्तक ३ : राज्य प्रशासन

घटक १ : घटक राज्यांची निर्मिती
घटक २ : राज्य विधिमंडळ
घटक ३ : राज्य कार्यकारी मंडळ
घटक ४ : उच्च न्यायालय
घटक ५ : संवैधानिक व वैधानिक यंत्रणा
घटक ६ : केंद्र-राज्य संबंध

### पुस्तक ४ : जिल्हा प्रशासन

घटक १ : जिल्हा प्रशासनाची निर्मिती आणि विकास
घटक २ : जिल्हा प्रशासनाचे घटक
घटक ३ : जिल्हा नियोजन समिती
घटक ४ : जिल्हाधिकारी
घटक ५ : कायदा, सुव्यवस्था व पोलीस प्रशासन
घटक ६ : जिल्हा प्रशासनासमोरील समस्या आणि आव्हाने

# भारतीय शासन आणि प्रशासन (PAD 103)

## प्रस्तावना

आज जगातील अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. या शासन पद्धतीमुळेच अनेक राष्ट्र विकसित होत आहेत. ही एक जीवनपद्धत म्हणून प्रत्येक राष्ट्र स्वीकार करीत आहे. याप्रमाणेच आपल्या भारत देशानेसुद्धा लोकशाही शासन पद्धतीमधील संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. या संसदीय शासन पद्धतीमध्ये जनतेद्वारा निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधींमार्फत शासन कारभार चालवला जातो. राज्य स्तरावर राज्य प्रशासन, तर जिल्हा स्तरावर जिल्हा प्रशासन, केंद्र स्तरावर भारतीय प्रशासनाच्या माध्यमातून संपूर्ण भारताची प्रशासन व्यवस्था चालते. या प्रशासनाचा अभ्यास या अभ्यासक्रमामध्ये करणार आहोत. हा अभ्यासक्रम एकूण चार पुस्तकांत विभागण्यात आलेला आहे.

**पुस्तक १ :** 'भारतीय राजकीय यंत्रणा' यामध्ये भारतीय लोकशाही व्यवस्थेविषयी अभ्यास करणार आहोत. यामध्ये लोकशाहीचा अर्थ, लोकशाहीचा प्रकार, लोकशाही निर्मितीसाठी आधारभूत घटक यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच संसदीय शासन व्यवस्थामध्ये महत्त्वाचे घटक म्हणजे राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांचे अधिकार कार्य तसेच संविधानिक तरतुदींचा समावेश आहे. संसदेतील महत्त्वाचा घटक म्हणजे राज्यसभा. या सभागृहास संसदेचे वरिष्ठ सभागृह म्हणून पाहिले जाते, तर कनिष्ठ सभागृह म्हणजेच जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणजे 'लोकसभा' व 'राज्यसभा' या दोन्हींची रचना, अधिकार, कार्यांचा अभ्यास करणार आहोत. यानंतर पंतप्रधान व मंत्रिमंडळ, सर्वोच्च न्यायालय याविषयी सविस्तर चर्चाही या पुस्तकामध्ये करणार आहोत.

**पुस्तक २ :** 'भारतीय प्रशासन' यामध्ये भारतीय प्रशासनाचा उगम व विकासाचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच भारतीय प्रशासनाची वैशिष्ट्ये, केंद्रीय मंत्रालय खाते याविषयीचा अभ्यास करणार आहोत. भारतीय प्रशासनाचे आणखी महत्त्वाचा भाग म्हणजे केंद्रीय सचिवालय, मंत्रिमंडळ सचिवालय व पंतप्रधानांचे कार्यालय या तिन्हींचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. प्रशासकीय सुधारणाच्या अनुषंगाने विविध आयोग समित्यांची स्थापना करण्यात आलेली होती. स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रशासकीय सुधारणा असो वा स्वातंत्र्यानंतरच्या प्रशासकीय सुधारणा असो यासंबंधीचा सविस्तर आढावाही घेण्यात आला आहे.

**पुस्तक ३ :** राज्य प्रशासन यामध्ये घटकराज्य निर्मितीचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला आहे. तसेच राज्य विधिमंडळाचे स्वरूप व रचना, राज्य विधिमंडळाचे दोन्ही सभागृहाचा अभ्यास यात करणार आहोत. राज्य कार्यकारी मंडळातील राज्यपाल, मुख्यमंत्री, मंत्रिपरिषद याविषयी सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच राज्य प्रशासनातील महत्त्वाचा घटक म्हणजे उच्च न्यायालयातील रचना, अधिकार क्षेत्र याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. संवैधानिक व वैधानिक यंत्रणा, केंद्र-राज्य संबंध याविषयीचा अभ्यासही आपण करणार आहोत.

**पुस्तक ४ :** 'जिल्हा प्रशासन' यात आपण लोकशाही शासन पद्धतीमध्ये जनतेच्या प्रशासनाकडून फार मोठ्या अपेक्षा असतात. या जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी किंवा जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी, मदतीचा हात देण्यासाठी सर्वप्रथम जिल्हा प्रशासनाचा संबंध जनतेशी येत असतो. त्यामुळे जिल्हा प्रशासनाची निर्मिती करणे आवश्यक असते. यासाठी जिल्हा प्रशासनाची निर्मिती व विकास याचे सविस्तर विश्लेषण यात केलेले आहे. तसेच जिल्हा प्रशासनाच्या घटकांचादेखील उल्लेख यात केले आहे. जिल्हा पातळीवर लोककल्याणाची विविध कार्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी जिल्हा नियोजन समितीची स्थापना केली जाते. या समितीविषयी विवेचन यात करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाचे प्रमुख प्रशासकीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यांचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांची प्रमुख जबाबदारी कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या साहाय्यतेने जिल्हाधिकारी जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करीत असतात. हे करीत असताना त्यांना अनेक समस्या व आव्हाने पेलावी लागतात. यासंबंधीचा सविस्तर आढावाही या पुस्तकात करणार आहोत.

# पुस्तक पहिले : भारतीय राजकीय यंत्रणा

## प्रस्ताविक

भारतीय शासन आणि प्रशासन या अभ्यासक्रमातील भारतीय राजकीय यंत्रणा हे पहिले पुस्तक. या पुस्तकात भारतीय लोकशाही व्यवस्था, राष्ट्रपती, राज्यसभा, लोकसभा, पंतप्रधान व मंत्रिमंडळ, सर्वोच्च न्यायालय अशा सहा महत्त्वपूर्ण घटकांची माहिती देण्यात आली आहे. पहिल्या घटकामध्ये लोकशाहीचा अर्थ, व्याख्या, लोकशाहीचा उदय व विकास तसेच लोकशाहीचे प्रकार याविषयी आढावा घेण्यात आला आहे.

दुसऱ्या घटकामध्ये राष्ट्रपती पदासाठीची पात्रता, निवडप्रक्रिया, त्याचा कार्यकाळ, राष्ट्रपतींची बडतर्फी करण्याची प्रक्रिया म्हणजेच महाभियोग, त्यांचे अधिकार व कार्ये, तसेच उपराष्ट्रपती पदाचे अधिकार आणि कार्य यांची माहिती देण्यात आली आहे.

तिसऱ्या घटकात भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह तसेच घटकराज्याचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाणारे राज्यसभा या सभागृहाची रचना, राज्यसभा सदस्याची पात्रता, त्यांचा कार्यकाळ तसेच निवडणूक प्रक्रिया, पदाधिकारी व त्यांचे कार्य, राज्यसभेचे अधिकार व कार्य, कायदे निर्मिती प्रक्रिया इत्यादींची माहिती देण्यात आली आहे.

चौथ्या घटकात भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह तसेच जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाणारे लोकसभा या सभागृहाची रचना, या सभागृहाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये, लोकसभा सभागृहाचे अधिकार आणि कार्य, इत्यादींची माहिती देण्यात आली आहे.

पाचव्या घटकात संसदीय शासन व्यवस्थेतील वास्तविक प्रमुख पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळे, यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये पंतप्रधानाची निवड, नियुक्ती, अधिकार व कार्य तसेच त्यांचे स्थान व भूमिका, केंद्रीय मंत्रिमंडळाची संरचना, मंत्रिमंडळाची निर्मिती, प्रधानमंत्री कार्यालय व त्याची रचना, मंत्रिमंडळ पद्धतीची वैशिष्ट्ये व शेवटी मंत्रिमंडळाचे अधिकार आणि कार्य याविषयी अभ्यास करणार आहोत.

सहाव्या घटकामध्ये सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती, आवश्यकता व स्वातंत्र्य तसेच सर्वोच्च न्यायालयाची रचना, अधिकारक्षेत्र याविषयीची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

वरील सर्व घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणास आपल्या भारतातील राजकीय व्यवस्था कशी कार्य करते हे समजून येईल. याव्यतिरिक्त प्रत्येक घटकाच्या शेवटी अवांतर वाचनासाठी देण्यात आलेली पुस्तके, संदर्भ साहित्याचा अभ्यास केल्यास अधिक उपयुक्त व अधिकाधिक ज्ञान मिळेल.

ज्ञानगंगा घरोघरी

# घटक १ : भारतीय लोकशाही व्यवस्था

*अनुक्रमणिका*


१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
 १.२.१ लोकशाहीचा अर्थ व व्याख्या
 १.२.२ लोकशाहीचा उदय व विकास
 १.२.३ लोकशाहीचे प्रकार
 १.२.४ लोकशाहीची वैशिष्ट्ये
 १.२.५ लोकशाही निर्मितीचे आधारभूत घटक
 १.२.६ लोकशाहीचे गुण
 १.२.७ लोकशाहीचे दोष
१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- लोकशाहीची संकल्पना व अर्थ स्पष्ट करता येईल.
- लोकशाही निर्मितीसाठीचे आधारभूत घटक कोणते आहेत ते समजेल.
- लोकशाहीच्या गुण-दोषांची चर्चा करता येईल.
- लोकशाहीचे प्रमुख प्रकार सांगता येईल.
- लोकशाहीच्या वैशिष्ट्यांचा सविस्तर अभ्यास करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

जगातील अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. सामान्यपणे लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे. तो एक राज्यघटनेचा व राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. समाज आणि संस्कृती यांना उद्देशून लोकशाही या शब्दाचा वापर केला जातो. लोकशाही हाच सर्वोत्तम शासनप्रकार असून जास्तीतजास्त लोकांना राजकीय सत्तेत सहभागी करून घेणारी ही शासन पद्धती आहे. लोकशाहीच्या संकल्पनेचा आत्मा म्हणजे व्यक्ती स्वातंत्र्य. व्यक्ती स्वातंत्र्य नसेल, तर लोक निर्भय नसतील, अशा समाजात प्रत्यक्षात लोकशाही असूनही लोकशाही नसते. थोडक्यात, सामूहिक निर्णय जास्तीतजास्त योग्य

आणि न्यायोचित असणे हे लोकशाहीचे खरे मर्म आहे. निर्णयप्रक्रियेत भाग घेण्याचा सर्वांना समान हक्क असावा आणि तो त्यांना योग्य तऱ्हेने बजावता यावा हे लोकशाही व्यवस्थेचे लक्षण मानले जाते. म्हणून लोकशाही ही आधुनिक काळातील राजकीय रुढी बनलेली आहे. यातूनच व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडून येतो.

# १.२ विषय–विवेचन

## १.२.१ लोकशाहीचा अर्थ व व्याख्या

लोकशाही प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व नि:पक्षपाती निवडणुकांद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य अशी लोकशाहीची संकल्पना केली जाते. लोकशाही (Democracy) ही संज्ञा लोक (Demos) आणि सत्ता (Kratos) या दोन ग्रीक शब्दांपासून निर्माण झालेली आहे. याचा सरळ अर्थ असा आहे की, लोकांची सत्ता म्हणजे लोकशाही. इ. स. पूर्व काळात अथेन्स या ग्रीक नगरराज्यात लोकशाहीचा उदय झाल्याचे पुरावे सापडतात. त्या काळात ग्रीकांच्या नगरराज्यामधील शासन व्यवस्थेला 'लोकशाही' संबोधले जात असे. थोडक्यात लोकशाही पद्धतीने तेथील शासन पद्धतीचा राज्यकारभार चालत होता. म्हणून लोकशाहीचे प्रथम ध्येय सर्व नागरिकांना सारखेपणाने, समान हक्काने वागवणे हा आहे. लोकशाहीसंदर्भात विविध व्याख्या विविध राजकीय विचारवंतांनी पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

(अ) **अब्राहम लिंकन :** लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेले शासन होय. थोडक्यात, मला गुलाम म्हणून जसे जगण्यास आवडणार नाही, त्याचप्रमाणे मालक म्हणून राहण्यास आवडणार नाही या उद्गारातूनच लोकशाहीची संकल्पना व्यक्त होते.

(आ) **लॉर्ड ब्राईस :** लोकशाही म्हणजे शासनाचा असा प्रकार की ज्यामध्ये राज्याची सत्ता एक किंवा अनेक वर्गाच्या हातात दिलेली नसते तर ती संपूर्ण लोक समूदायाकडे दिलेली असते.

(इ) **प्रोफेसर मोरीयस :** लोकशाही म्हणजे काही ठरावीक सूत्र व संघटनेचा आराखडा नव्हे तर समान इच्छेनुसार निर्माण करावयाच्या कल्याणकारी समाजाकडे वळलेला विचार प्रवाह व कृतीचा मार्ग होय.

(ई) **पंडित जवाहरलाल नेहरू :** लोकशाही म्हणजे केवळ मतदानाच्या हक्कासंबंधीची राजकीय समता नव्हे, तर राजकीय समतेबरोबर आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे होय.

(उ) **हर्नशॉ :** ज्या शासन पद्धतीमध्ये सार्वभौम सत्ता जनतेच्या हाती असते व जनतेचे संपूर्ण नियंत्रण शासन कारभारावर असते ती लोकशाही होय.

(ऊ) **प्रा. आशीर्वादम् :** लोकशाही हे मानवतेसाठीच्या प्रत्यक्ष किंवा व्यावहारिक उत्साहाचे प्रगटीकरण असून समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत.

वरील राजकीय विचारवंतांच्या विविध व्याख्यांचा परामर्श घेतला असता असे लक्षात येते की, लोकशाही ही शासनाची अशी पद्धती आहे की, ज्यामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांचा आधार घेऊन व्यक्तीस्वातंत्र्य आणि व्यक्तिविकास यांना महत्त्व दिलेले असते. तसेच लोकशाहीचा कारभार लोकांच्या संमतीतून आणि टीकेतून चालतो.

## १.२.२ लोकशाहीचा उदय व विकास

पाश्चिमात्य देशातील समाजामध्ये लोकशाही कशी उदयास आली व विस्तारली याचा खोलवर अभ्यास झालेला दिसून येतो. त्यामुळे सर्वांत पहिली आदर्श लोकशाही म्हणून अथेन्समधील ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात अस्तित्वात असलेल्या समाजव्यवस्थेकडे बोट दाखविले जाते. अथेन्स ह्या ग्रीक नगर राज्यात पेरिक्लीसचा काळ इ.स. पूर्व ४६१ ते ४२९ हा काळ लोकशाहीचा सुवर्ण काळ मानला जातो. त्या काळात अथेन्सचे लोक आपल्या कर्तव्य आणि हक्कांबद्दल जागरूक होते. अथेन्सची लोकशाही प्रत्यक्ष, दक्ष व उत्साही अशी तयार करण्यात पेरिक्लीसचे व्यक्तिमत्त्व उपयोगी ठरले होते. म्हणून लोकशाहीची बीजे अथेन्समध्ये रुजलेली आढळतात. लोकशाही राज्याचा हा उच्चांक पूर्वी कधीही आणि आज कोणत्याही लोकशाहीने ओलांडलेला नाही.

रोममध्ये सुरुवातीला लोकशाहीच होती, नंतर क्रमाने ती मावळत जाऊन रोममध्ये एकतंत्री राजवट आलेली दिसते, परंतु राज्यकारभारात लोकांना फारशी किंमत दिली जात नव्हती. लोकशाहीला २५०० ते ३००० हजार वर्षांचा इतिहास आहे, असे

म्हणता येते. लोकशाहीचा उल्लेख हिरोडोटस यांनी कायद्यासमोर समानता यासंदर्भात केला आहे. ही भारतीय लोकशाहीची परंपरा गुप्तांच्या काळात येऊन समाप्त झाली. गुप्तांच्या काळापासून म्हणजेच इ.स. ५व्या शतकापासून पुढे १९४७ पर्यंत म्हणजे २०व्या शतकापर्यंत पुन्हा भारतात लोकशाही दिसत नाही. कारण प्राचीन भारतात लोकशाहीचे तत्त्व काही राज्यांनी स्वीकारले होते, परंतु राजाकडे अमर्याद सत्ता होती. त्यामुळे प्रजेला अधिकार प्राप्त करता आले नाही. प्राचीन भारतात लोकशाहीचा विकास झालेला नव्हता. मध्ययुगात सरंजामशाही होती. सरंजामदारांना सर्वाधिकार होते. प्रजेला कोणताही अधिकारी दिलेला नव्हता.

विशेषतः १७व्या शतकापासून लोकशाहीचा खरा विकास झाला. इंग्लंडमध्ये राजा आणि प्रजा यांच्यात संघर्ष सुरू झाले. प्रजेने स्टुअर्ट घराण्यातील राजाविरुद्ध बंड पुकारले. दुसरा चार्लस (१६६०-१६८५) च्या कारकिर्दीत रक्तहीन क्रांतीनंतर झालेल्या बिल ऑफ राईट्स (१६८९) या सनदेने प्रजेला अधिकार प्राप्त होऊन इंग्लंडमध्ये लोकशाही विकसित झाली. त्यानंतर फ्रान्स, अमेरिका या देशात राज्यक्रांत्या होऊन लोकशाहीचा विकास झाला. त्यामुळे आधुनिक काळात विसाव्या शतकाला लोकशाहीचा सुवर्ण म्हणले जाते. फ्रान्समध्ये १७८९ मध्ये क्रांती होऊन राजेशाही संपुष्टात आली आणि अनियंत्रित राजेशाहीची जागा प्रातिनिधिक लोकशाहीने घेतली. या क्रांतीत समता, स्वातंत्र्य, बंधुता ही मूल्ये महत्त्वाची ठरली. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकेत लोकशाही तत्त्वांचा विकास झाला. आरंभापासून समता व व्यक्तींच्या स्वातंत्र्यावर भर दिला होता. सर्व मानव समान आहेत, ही कल्पना अमेरिकन देशात प्रभावी ठरली. दुसऱ्या युद्धानंतर आशिया, आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. त्यांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला. भारतामध्ये औपचारिकरित्या २६ जानेवारी १९५० रोजी संसदीय लोकशाहीची राज्यघटना स्वीकारून प्रातिनिधिक लोकशाहीचा प्रारंभ झाला.

## १.२.३ लोकशाहीचे प्रकार

### (१) प्रत्यक्ष लोकशाही

लोकशाहीच्या कारभारात लोकांचा सहभाग कोणत्या रितीने होतो, यावरून लोकशाहीचे प्रकार पडतात. कारण प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये जनता राज्यकारभारामध्ये स्वतः भाग घेत असते. म्हणून शासनाचा जनतेशी प्रत्यक्ष संबंध येत असतो. प्रत्यक्ष लोकशाहीचे आदर्श स्वरूप ग्रीक नगरराज्यामध्येच अस्तित्वात होते. अथेन्स नगरराज्यात प्रत्येक प्रौढ ग्रीक नागरिकाला राज्यकारभारात भाग घेता येत असे, परंतु स्त्रिया, गुलाम, परकीय यांना राज्यकारभारात भाग घेता येत नव्हता. प्रत्यक्ष लोकशाही ही स्वित्झर्लंड देशातच काही प्रमाणात आढळते. तिथल्या नागरिकांना कायद्याचा मसुदा मांडण्याबाबत पुढाकार घेता येतो.

आधुनिक काळात अनेक देशांमध्ये अप्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात असली तरी त्या लोकशाहीला व्यापक स्वरूप देण्यासाठी प्रत्यक्ष लोकशाहीस पूरक काही मार्ग वापरले जातात. स्वित्झर्लंड देशात प्रत्यावहन अधिकार जनतेला दिलेला आहे. म्हणजेच प्रत्यक्ष लोकशाहीमध्ये राज्यातील शासन व सरकार हे जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फत स्थापन होत नसून ते स्वत: जनतेकडून स्थापन केले जाते. म्हणून प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे लोकांना प्रत्यक्षपणे राज्यकारभारात सक्रिय सहभागी होऊन निर्णय घेणे म्हणजे प्रत्यक्ष लोकशाही होय.

### (२) अप्रत्यक्ष/प्रातिनिधिक लोकशाही

आधुनिक काळात वाढती लोकसंख्या आणि क्षेत्रफळ या दृष्टीने मोठ्या देशात प्रत्यक्ष लोकशाही राबविणे अशक्य झाल्यामुळे अप्रत्यक्ष लोकशाही (प्रातिनिधिक लोकशाही) निर्माण करण्यात आली. अप्रत्यक्ष लोकशाहीत जनतेला प्रौढ मताधिकाराचा अधिकार असतो. राज्यातील नागरिक राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग न घेता प्रतिनिधी निवडून देतात. त्या निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत राज्यकारभार चालतो. या प्रकारात जनता सार्वभौम असते. अप्रत्यक्ष किंवा प्रातिनिधिक लोकशाहीचे दोन प्रकार पडतात.

#### (अ) संसदीय लोकशाही

पहिल्या प्रकारात संसदीय लोकशाहीत कार्यकारी मंडळ विधीमंडळाला उत्तरदायी असते आणि त्याचा विश्वास असेपर्यंत सत्तेवर राहू शकते. ही व्यवस्था भारत आणि इंग्लंड या देशात आढळते. नागरिक सार्वत्रिक निवडणुकीच्या माध्यमातून ज्या पक्षाला स्पष्ट बहुमत असेल त्याच पक्षाचे मंत्रीमंडळ स्थापन होत असते. म्हणूनच मंत्रीमंडळ हे विधीमंडळाला जबाबदार असून विधीमंडळाच्या इच्छेनुसार ते कार्य करीत असते. म्हणूनच संसदीय लोकशाहीमध्ये जनता आपल्या निवडणुकीमधून निवडून दिलेल्या प्रतिनिधींमार्फतच शासनावर नियंत्रण ठेवतात. थोडक्यात कार्यकारी मंडळ (मंत्रीमंडळ) आणि संसद यांच्या परस्पर

संबंधावर आधारित अशा शासनाच्या संघटनांचा हा प्रकार आहे. बहुमतातील पक्षाचा नेता या मंडळाचा प्रमुख (पंतप्रधान) असतो. याशिवाय कॅनडा, ऑस्ट्रेलिया आदी देशात ही पद्धत रूढ आहे.

**भारतीय संसदीय लोकशाहीची लक्षणे**

(०१) भारतातील राष्ट्रपती तसेच राज्यपाल हे नाममात्र घटनात्मक प्रमुख असतात.

(०२) प्रधानमंत्री किंवा मुख्यमंत्री हे वास्तवात प्रमुख असतात.

(०३) कार्यकारी मंडळावर कायदेमंडळाचे नियंत्रण असते.

(०४) प्रधानमंत्री किंवा मुख्यमंत्री हे शासनाचे (राजकीय) व प्रशासनाचे (प्रशासकीय) नेतृत्व करतात.

(०५) मंत्रीमंडळ सामूहिकरित्या कायदेमंडळाला जबाबदार असते.

(०६) शासन (सर्व मंत्री) व प्रशासन (सर्व सनदी सेवक) यांना भारतीय संविधान व कायद्यानुसार कार्ये करावी लागते.

(०७) मंत्रीमंडळ हे कायदेमंडळाचा विश्वास असेपर्यंतच सत्तेवर राहू शकते.

(०८) प्रत्येक खात्याचा मंत्री राजकीय प्रमुख म्हणून तर सचिव हे प्रशासकीय प्रमुख म्हणून सर्व जबाबदारी स्विकारतात.

(०९) मंत्रीमंडळाने घेतलेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सनदी सेवकांवर (प्रशासनावर) असते.

(१०) सनदी सेवकांना (प्रशासनाला) मंत्र्यांचा सल्ला घ्यावा लागतो, त्यांच्या आदेशाचे पालन करावे लागते, परंतु राजकीय विचारणापासून अलिप्त राहून तटस्थपणे प्रशासकीय कार्ये करावे लागते.

**(आ) अध्यक्षीय लोकशाही**

या प्रकारात राजकीय सत्तेचे विभाजन केलेले असते. अध्यक्षीय शासनपद्धतीत मंत्रीमंडळ संसदेपासून अलिप्त असते. अध्यक्षाची जनतेकडून सरळ निवड केली जाते. या पद्धतीत संसदीय पद्धतीप्रमाणे कार्यकारी मंडळ संसदेतील बहुमतावर अवलंबून नसते. कार्यकारी प्रमुख हाच राष्ट्राध्यक्ष असतो. ही पद्धत प्रामुख्याने अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात आढळते. थोड्याफार फरकाने फ्रान्स, श्रीलंका या देशांतूनही ती प्रचलित आहे. अध्यक्षीय लोकशाहीत कार्यपालिका म्हणजे राष्ट्रप्रमुख किंवा राष्ट्राध्यक्ष हा विधीमंडळाला जबाबदार नसतो. म्हणून विधीमंडळ राष्ट्राध्यक्षावर अविश्वास व्यक्त करू शकत नाही, तसेच तेथील राष्ट्राध्यक्षाचा कार्यकाल हा निश्चित असतो.

## १.२.४ लोकशाहीची वैशिष्ट्ये

### (०१) सत्तेचे विकेंद्रीकरण / सत्ता विभाजन

लोकशाही शासनात सत्तेचे विकेंद्रीकरण महत्त्वाचे असते. कारण केंद्रीकरणामध्ये सर्वोच्च स्तरावर सत्तेची सूत्रे ही एका व्यक्तीकडे असतात, तर सत्तेच्या विकेंद्रीकरणामध्ये सत्तेचे सर्वोच्च स्तरावरील सूत्रे हे अनेक व्यक्तींकडे असतात. म्हणून शासनव्यवस्थेतही सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. सत्ता ही राज्यातील व समाजातील सर्व व्यक्तींपर्यंत पोहोचते. लोकशाहीत कोणत्याही घटकाकडून सत्तेचा गैरवापर होऊ नये यासाठी सत्ता विभाजन आवश्यक असते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ यांच्यात अधिकारांची विभागणी केलेली असते. त्याचबरोबर केंद्रीय पातळीपासून ते ग्रामपातळीपर्यंत सत्तेच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करून सर्वसामान्य नागरिकांनाही राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी दिली जाते.

### (०२) खुल्या, निर्भय वातावरणात सार्वत्रिक निवडणुका

लोकशाहीमध्ये खुल्या, निर्भय वातावरणात सार्वत्रिक निवडणुका हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. कारण जनता आपल्या प्रतिनिधीमार्फत शासन करीत असून प्रतिनिधी हे प्रत्यक्षात जनतेचे प्रतिनिधी व्हावेत यासाठी स्वतंत्र निवडणुका होणे आवश्यक असते. निवडणुकीची प्रक्रिया किंवा यंत्रणा ही पूर्णपणे सरकारी नियंत्रणापासून स्वतंत्र असणे गरजेचे आहे. परिणामी जनता अप्रत्यक्षपणे आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून शासन चालविते. जनतेपुढे विविध राजकीय पर्याय उपलब्ध असणे गरजेचे आहे. निवडणुकांमुळे जनतेला केवळ आपले प्रतिनिधी निवडण्याचीच संधी मिळत नाही तर अस्तित्वात असलेले शासन बदलण्याचीही संधी मिळते.

### (०३) नागरिकांचा प्रौढ मताधिकार

वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना 'एक व्यक्ती एक मत' या तत्त्वाप्रमाणे मत देण्याचा अधिकार

म्हणजे प्रौढ मताधिकार होय. धर्म, वंश, जात, इत्यादींचा विचार न करता सर्व मतदारांना समान लेखले जाते, हे लोकशाहीचे वैशिष्ट्ये आहे. लोकशाहीत जात व सांप्रदायिक घटक याऐवजी व्यक्ती हा घटक विचारात घ्यावा लागतो. लोकशाहीचे साधन म्हणून राजकीय समतेसाठी प्रौढ मताधिकाराचे तत्त्व घटनासमितीत जवळपास एकमताने स्वीकारण्यात आले आहे.

## (०४) अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व / हितसंबंधी गटाला प्रतिनिधित्व

समाजातील विशिष्ट जाती आपल्या जमातीचे प्रतिनिधी आपल्यामधूनच निवडून देणे ही त्या-त्या समाजाचे प्रतिनिधित्वाची कल्पना आहे. अमेरिकेत निग्रो, गोरे, ज्यू प्रोटेस्टंट, रोमन कॅथलिक, भांडवलदार, मजूर, जमीनदार, स्त्री-पुरुष अशा प्रकारे सामाजिक वांशिक भेद व त्यावरून तयार झालेले वर्ग तेथे आहेत. आधुनिक भारतात अल्पसंख्याकांवर अन्याय होऊ नये याची काळजी घटनाकारांनी घेतली आहे हे एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल.

## (०५) कायद्याचे अधिराज्य

लोकशाहीच्या वैशिष्ट्यामधील कायद्याचे अधिराज्य हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कारण लोकशाही शासनपद्धतीत कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान मानल्या जातात. लोकशाही राज्यात कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नसते. समाजातील त्या व्यक्तीचे स्थान, दर्जा विचारात न घेता सर्वांना एकच कायदा व एकच न्याय लागू केला जातो. व्यक्तीला कायद्याच्या आधाराशिवाय शिक्षा दिली जात नाही. कायद्याच्या अधिराज्यामुळे नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण होते.

## (०६) बहुपक्ष पद्धती

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष हे असतातच. याच लोकशाही शासनव्यवस्थेत राजकीय पक्षपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. म्हणून लोकशाहीत राजकीय पक्षांना महत्त्व आहे. स्पर्धात्मकता हे लोकशाहीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. विविध राजकीय पक्ष सत्ताप्राप्तीसाठी निवडणुकांच्या रिंगणात असतात. निवडणुकांच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करण्यासाठी त्यांच्यात चढाओढ असते. या बहुपक्ष पद्धतीमुळे नागरिकांनाही पर्याय उपलब्ध होतात. भारतात बहुपक्ष पद्धतीमुळे राजकीय स्पर्धात्मकतेत वाढ झाली आहे.

## (०७) मुक्त वृत्तपत्रे

जनमत हा लोकशाहीचा आधार आहे. लोकशाहीचे यशापयश योग्य लोकमतावर अवलंबून असते. जनमत घडविण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. वृत्तपत्रे हे जनमत घडविण्याचे प्रभावी साधन मानले जाते. जनतेच्या मागण्या शासनापर्यंत नेणे आणि शासनाच्या कल्याणकारी योजना कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचविणे असे दुहेरी कार्य वृत्तपत्र पार पाडीत असतात. थोडक्यात वृत्तपत्राची भूमिका म्हणजे, अयोग्य असेल तर टीका करणे हे वृत्तपत्राचे काम असते, म्हणून लोकशाहीच्या यशासाठी मुक्त व नि:पक्षपातीपणे कार्य करणारी वृत्तपत्रे भारतीय लोकशाहीला समृद्ध करीत असतात.

## (०८) स्वातंत्र्य व मूलभूत हक्क

लोकशाही शासन व्यवस्थेत प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती/मत मांडणे किंवा टीकाटिप्पणी करण्याचे स्वातंत्र्य असते म्हणजेच व्यक्तीला विचार, संचार, व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असते. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीला काही मूलभूत हक्क किंवा अधिकार देण्यात येतात किंवा प्राप्त होत असतात.

## (०९) सार्वजनिक पद प्राप्त करण्याची संधी

लोकशाही शासन प्रकारामध्ये प्रत्येक व्यक्तीला निवडणुकीच्या माध्यमातून कोणतेही सार्वजनिक पद प्राप्त करण्याची संधी असते किंवा पद प्राप्त करता येते. कोणत्याही आधारावर किंवा कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला लोकशाहीमध्ये स्थान नसते.

## (१०) शांततेच्या व सनदशीर मार्गाचा अवलंब

लोकशाहीमध्ये जनता किंवा व्यक्तीसमूह आपल्या मागण्या शासनदरबारी मांडताना शांततेच्या व सनदशीर मार्गाचा अवलंब करतात. विशेष म्हणजे आपला विरोध दर्शवताना उपोषण, मोर्चे, धरणे, बंद शांतता व सनदशीर मार्गाने करण्यावर विश्वास ठेवतात.

## १.२.५ लोकशाही निर्मितीचे आधारभूत घटक

लोकशाही संकल्पना अत्यंत व्यापक आहे. आधुनिक काळात लोकशाही शासन पद्धती न राहता एक जीवन पद्धती बनलेली आहे. लोकशाही व्यवस्थेत जनता सार्वभौम असून जनतेला अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार आहे. जगातील अनेक देशांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केला आहे, परंतु लोकशाही निर्मितीसाठी काही आधारभूत/महत्त्वपूर्ण घटक आवश्यक आहेत ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### (०१) व्यक्ती व जनता सार्वभौम

प्रत्येक व्यक्ती समान असणे, याचाच अर्थ प्रत्येक व्यक्तीच्या मताला/विचाराला महत्त्व देणे होय. व्यक्ती कितीही मोठ्या पदावर (दर्जा) व अधिकार प्राप्त असो त्यांनी राज्यातील सर्वसामान्य कायद्याचे पालन केले पाहिजे. त्यातून कायद्याचे सार्वभौमत्व स्पष्ट होते. म्हणजेच सामान्य व्यक्ती असो अथवा उच्च दर्जा प्राप्त व्यक्ती असो या सर्वांना समान महत्त्व असते. तसेच लोकशाहीमध्ये जनता ही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सार्वभौम किंवा सर्वश्रेष्ठ असते.

### (०२) लिखित संविधान (राज्यघटना)

लोकशाहीमध्ये लिखित संविधानास (राज्यघटनेस) अधिक महत्त्व असते. कारण लोकशाही स्वीकारलेल्या प्रत्येक राष्ट्राचा राज्यकारभार राज्यघटनेतील नियमांनुसार चालतो. संविधानातील विविध नियम कलमांच्या मर्यादेत राहूनच शासनातील विविध घटक, उपघटकांना कार्य पार पाडावे लागते. या संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य तसेच शासनाचे अधिकार व कार्यांचा समावेश करण्यात आलेला असतो. नागरिकांना शासन कारभार व्यवस्थित सुरू आहे का याची लिखित संविधानाच्या माध्यमातून पडताळणी करता येते. लिखित राज्यघटनेमध्ये शासन व्यवस्था, सत्तेचे विभाजन सत्ता विकेंद्रीकरणासंदर्भात माहिती असते.

### (०३) कायदेमंडळ

कायदेमंडळ लोकशाहीचे प्रमुख अंग असून कायदे जनतेचेच प्रतिनिधी असून ते प्रतिनिधी सरकारच्या कार्यपद्धती, कामकाजावर तसेच आर्थिक कार्यावरही नियंत्रण ठेवतात. नियमबाह्य कार्याबद्दल शासनास जाब विचारणे, जनतेच्या तक्रारी, प्रश्न मांडणे, जनहिताचे प्रश्न मांडून चर्चेत सहभागी होणे असे अनेक कार्ये कायदेमंडळाचे सदस्य करीत असतात. लोकशाही व्यवस्थेत जनप्रतिनिधीचे व्यक्ती स्वातंत्र्य, मूलभूत हक्क व लोकशाही मूल्ये टिकवून ठेवणे व ती रुजवण्यात कायदेमंडळाची भूमिका महत्त्वाची आहे.

### (०४) नि:पक्ष व स्वतंत्र न्यायमंडळ

लोकशाहीची यशस्विता नि:पक्ष व स्वतंत्र न्यायमंडळावर अवलंबून असते. व्यक्तिस्वातंत्र्य, मूलभूत हक्क रक्षण, लोकशाही शासनव्यवस्था कार्यक्षम व नि:पक्ष चालवण्यासाठी न्यायपालिकेस स्वातंत्र्य असणे महत्त्वपूर्ण आहे. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळाने बनविलेले घटनाबाह्य कायदे यांचा पुनर्विलोकनाचा अधिकार न्यायालयास असला पाहिजे. तसेच न्यायाधीशांना नि:पक्ष, राजकीय दबावरहित कार्य करता आले पाहिजे. न्यायपालिका व कायदेमंडळ यांच्या अधिकारावरून वाद होऊ नये यासाठी राज्यघटनेने संरक्षक तरतुदी केल्या पाहिजे.

### (०५) स्वतंत्र व नि:पक्ष वृत्तपत्रे/माध्यमसमूह

लोकशाहीचे यशापयश हे लोकमतावर अवलंबून असते. कारण लोकमत हे लोकशाहीचे प्रमुख साधन आहे. वृत्तपत्र/माध्यमसमूहात जनतेच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचविणे व शासन जनतेसाठी राबवीत असलेले विकास कार्यक्रम, योजना यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचण्याची दुहेरी भूमिका पार पाडावी लागते. शासनाची धोरणे उत्कृष्ट असतील तर त्याचा पुरस्कार, प्रशंसा करणे व अयोग्य असतील तर त्यावर टीका करणे हे कार्य वृत्तपत्राचे असते. त्यासाठी त्यांना स्वातंत्र्य प्राप्त होणे गरजेचे आहे. जर वृत्तपत्रे व माध्यमसमूह शासनाच्या दबावाखाली कार्य करीत असतील तर जनतेला योग्य माहिती प्राप्त होत नाही. वृत्तपत्रे नि:पक्षपणे कार्य करू शकत नाहीत. म्हणून लोकशाहीच्या यशस्वितेसाठी स्वतंत्र व नि:पक्षपातीपणे कार्य करणारे वृत्तपत्र व माध्यमसमूहाची आवश्यकता आहे. ते तसे कार्य करीत असतील तरच लोकशाही रुजेल.

### (०६) राजकीय पक्ष व बहुमताचे शासन

प्रातिनिधिक लोकशाहीच्या यशस्वितेसाठी राजकीय पक्ष असणे आवश्यक आहे. जनहित साधण्याच्या हेतूने प्रेरित होऊन राजकीय पक्षांची स्थापना केली जाते. लोकशाहीच्या यशासाठी द्विपक्ष अथवा बहुपक्ष पद्धती महत्त्वाची असते. हे राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळात आपल्या पक्षाचे ध्येय-धोरण व जाहीरनामे जनतेसमोर मांडून बहुमत मिळवण्याचा प्रयत्न करतात. बहुमत प्राप्त झाल्यास शासन स्थापन करून आपले धोरणे व जाहीरनामा अमलात आणण्यास कटिबद्ध असतात. हे करीत असताना प्रत्येक वेळेत एकमत होईलच असे नसते. त्यामुळे बहुमतानुसार निर्णय होऊन शासन कार्य करते. सार्वजनिक हिताचे निर्णय घेताना बहुमताला प्राधान्य दिले जाते. अल्पमतप्राप्त शासन लोकशाहीत मान्य नाही व ते आपला कार्यकाळ पूर्ण करेल याची शाश्वती नसते.

### (०७) स्थानिक स्वराज्य संस्था

स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाहीचे प्रशिक्षण देणाऱ्या उत्कृष्ट संस्था आहेत. या संदर्भात लॉर्ड ब्राईसचे मत महत्त्वपूर्ण आहे, ते यासंदर्भात म्हणतात 'लोकशाही शिक्षणाची उत्कृष्ट शाळा आणि लोकशाहीच्या यशाची निश्चित खात्री म्हणजेच स्थानिक स्वशासन होय'. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून लोकशाही राज्यकारभाराचे नागरिकांना शिक्षण व कार्याचा अनुभव प्राप्त होतो. नवीन नेतृत्व निर्मिती होते. ठराव मांडणे, मंजूर करून घेणे, निर्णय, धोरणांची अंमलबजावणीची संधी प्राप्त होते. कारण नोकरशाही व्यवस्थेत सत्तेचे जेवढे विकेंद्रीकरण जास्त होईल त्या प्रमाणात लोकशाही यशस्वी होते. याच दृष्टीने भारतामध्ये शहरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण स्थानिक स्वराज्यसंस्थाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

### (०८) अंतिम निर्णय घेण्याची सत्ता जनतेकडे

लोकशाही व्यवस्थेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अंतिम निर्णय घेण्याची सत्ता जनतेकडे आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी 'लोकांचे, लोकांकडून आणि लोकांसाठी शासन चालविले जाते, त्याला लोकशाही असे म्हटले आहे'. याचा अर्थ जनतेला केंद्रस्थानी ठेवून कार्य करणारी ही व्यवस्था आहे. राज्यातील सर्वोच्च सत्ता जनतेच्या हाती असल्यामुळे अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा जनतेकडेच असतो. लोकशाहीमध्ये जनता ही आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून शासन चालवत असते. हे प्रतिनिधी जनतेकडून निवडून गेले असल्यामुळे त्यांनी घेतलेले निर्णय हे जनतेचे निर्णय असतात.

### (०९) सामाजिक समता व न्याय

मानवनिर्मित भेदभाव आणि विषमता नष्ट करून सर्वांनी समान संधी, कायद्यापुढे सर्व समान असतील अशी परिस्थिती लोकशाही व्यवस्थेमध्ये असते. तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय निर्माण केल्याशिवाय खऱ्या अर्थाने लोकशाही कार्यान्वित होऊ शकत नाही. म्हणजेच सामाजिक समता व सामाजिक न्याय हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य लोकशाही शासनव्यवस्थेत दिसून येते.

### (१०) जागरूक नागरिक

प्रत्येक राजकीय व्यवस्थेत नागरिकांना विशेष महत्त्व असते. कारण नागरिकांशिवाय शासनव्यवस्था अस्तित्वात येऊ शकत नाही. तसेच ती कार्ये करू शकत नाही, परंतु इतर राजकीय व्यवस्थेपेक्षा लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना विशेष महत्त्व असून नागरिक हा लोकशाहीचा केंद्रबिंदू किंवा आत्मा असतो. जर जागरूक नागरिक नसतील तर लोकशाही व्यवस्था ठरावीक लोकांच्या हाती जाईल. किंवा काही लोकांची ती मक्तेदारी बनेल त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत जागरूक नागरिक असणे महत्त्वाचे आहे.

वरील महत्त्वपूर्ण आधारभूत घटकांची प्रभावी भूमिका लोकशाही शासन निर्मितीमध्ये दिसून येते. त्याचबरोबर सृजन व जागरूक नागरिक असणे, सामाजिक समता व न्यायाला, चारित्र्याला महत्त्व देऊन व्यक्तिपूजेऐवजी लोकशाही मूल्य व शासनाची निर्मिती होऊन यशस्वी होईल.

## १.२.६ लोकशाहीचे गुण

आधुनिक युग हे लोकशाहीचे युग मानले जाते. त्या दृष्टीने राज्याचे शासन लोकशाही तंत्रानुसार असले पाहिजे अशी अपेक्षा केली जाते. लोकशाहीत अनेक चांगले गुण आहेत, म्हणून लोकशाही शासनाची जोपासना लोकशाहीवादी देशांमध्ये

झाली आहे. जगातील अनेक राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केलेला दिसतो. इतर शासन प्रणालीपेक्षा लोकशाहीत जास्त गुण दिसून येतात, ते पुढीलप्रमाणे आहेत.

(०१) लोकशाहीत नागरिकांना समान संधी मिळते, प्रत्येक नागरिकाला सुरक्षितता प्राप्त होते.

(०२) मतदानाच्या अधिकारामुळे समाजातील प्रौढ स्त्री-पुरुषांना राज्यकारभारविषयक अधिकार मिळतो.

(०३) लोकशाहीमध्ये ठरावीक मुदतीनंतर निवडणुका घेतल्या जातात.

(०४) लोकशाही विचारप्रणालीत व्यक्तिस्वातंत्र्याला प्राधान्य अथवा शाश्वती (हमी) मिळते.

(०५) मतदान, निवडणुका, शासनाला प्रतिकार करणे, राजकीय संघटना, राजकीय पक्ष, दबाव गट अशा विविध माध्यमातून राजकीय शिक्षण मिळते.

(०६) लोकशाहीत सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्वीकारल्यामुळे राजकीय व शासकीय सत्ता केंद्र सरकारपासून स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत विकेंद्रित होत जाते.

(०७) लोकशाहीमुळे स्वातंत्र्य, समता, न्याय मिळत असतो.

(०८) लोकशाहीमधून जनतेचे सार्वभौमत्व निर्माण होते.

(०९) लोकशाहीमुळे व्यक्तीच्या सामाजिक व नैतिक गुणांचा विकास घडून येतो.

(१०) लोकहिताचे शासन, राजकीय शिक्षण, नि:पक्ष न्यायव्यवस्था, इत्यादी गुण लोकशाहीत असतात.

## १.२.७ लोकशाहीचे दोष

जगातील अनेक राष्ट्रांनी लोकशाहीचा स्वीकार केलेला असल्याचे दिसून येत आहे. ही लोकशाही काही राष्ट्रात यशस्वी ठरली तर काही राष्ट्रांत अयशस्वी ठरली. त्यातून हुकूमशाही निर्माण झाली. लोकशाहीच्या गुणांबरोबरच त्यामध्ये काही दोषही दिसून येतात.

(०१) लोकशाहीमध्ये बहुपक्ष पद्धती असल्यामुळे सत्तेवर येण्यासाठी बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करतात.

(०२) लोकशाही शासनपद्धतीत राज्यातील सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला गेल्यामुळे अशिक्षित, अडाणी लोकांकडून लोकप्रतिनिधींची निवड होते.

(०३) लोकशाहीत अनेक पक्ष पद्धती असणाऱ्या देशात अस्थिर शासन निर्माण होऊ शकते.

(०४) लोकशाही हा एक अत्यंत अकार्यक्षम असा राज्यप्रकार आहे.

(०५) लोकशाही हा एक अत्यंत खर्चीक राज्यकारभाराचा प्रकार आहे.

(०६) लोकशाहीमध्ये गुणांपेक्षा जास्त महत्त्व संख्येला दिले जाते.

(०७) लोकशाहीत शासक आपली जबाबदारी एकमेकांवर ढकलत असतात.

(०८) लोकशाही शासन पद्धती बऱ्याच वेळेस युद्ध आणि संकटकाळी कुमकुवत असलेली दिसून येते.

(०९) भ्रष्टाचार, काळाबाजार, लाचलुचपत, वेळ, पैशांचा अपव्यव, इत्यादी दोष लोकशाही राष्ट्रांत आढळतात.

(१०) लोकशाहीत राष्ट्रहितापेक्षा पक्षहिताला अधिक महत्त्व प्राप्त होते.

(११) लोकशाहीमध्ये बहुमताच्या नावाखाली घराणेशाही किंवा हुकूमशाही निर्माण होते.

(१२) लोकशाहीमध्ये पक्ष बदलला की धोरण बदलते, म्हणजेच धोरणात सातत्य नसते.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) अब्राहम लिंकन यांची लोकशाहीची व्याख्या सांगा.

(२) लोकशाहीचे प्रकार सांगा.

(३) लोकशाही निर्मितीचे आधारभूत घटक सांगा.

(४) लोकशाहीची वैशिष्ट्ये सांगा.

(५) भारतामध्ये कोणत्या प्रकारची लोकशाही शासनपद्धत आहे?

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

(१) **लोकशाही :** लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांसाठी लोकांनी चालविलेले शासन होय.

(२) **सत्तेचे विकेंद्रीकरण :** सत्तेची सुत्रे हे सर्वोच्च ठिकाणीच असत नाहीत तर ते समाजातील अनेक व्यक्तींपर्यंत पोहचलेले असते.

(३) **कायद्याचे अधिराज्य :** कायद्यासमोर सर्व समान. कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नसते.

(४) **संसदीय लोकशाही :** संसदीय लोकशाहीमध्ये राष्ट्रपती व राज्यपाल हे नाममात्र प्रमुख असतात. प्रधानमंत्री, मुख्यमंत्री हे वास्तविक प्रमुख असतात. कार्यकारी मंडळावर कायदेमंडळाचे नियंत्रण असते.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेले शासन होय.

(२) (१) संसदीय लोकशाही (२) अध्यक्षीय लोकशाही

(३) कायद्याचे राज्य, लिखित संविधान, कायदेमंडळ, स्वतंत्र न्यायमंडळ, स्वतंत्र व नि:पक्ष वृत्तपत्रे/माध्यमे, राजकीय पक्ष व बहुमताचे शासन, स्थानिक स्वराज्य संस्था.

(४) सत्तेचे विकेंद्रीकरण, खुल्या सार्वत्रिक निवडणुका, नागरिकांना प्रौढ मताधिकार, कायद्याचे राज्य, अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधीत्व, बहुपक्ष पद्धती.

(५) संसदीय शासनपद्धत/संसदीय लोकशाही.

## १.५ सारांश

भारतीय लोकशाही व्यवस्था या घटकामध्ये लोकशाहीची संकल्पना, अर्थ याचा अभ्यास करण्यात आला. तसेच लोकशाहीचा उदय व विकासाची माहिती घेण्यात आली. तसेच लोकशाहीचे प्रकार, वैशिष्ट्ये, लोकशाही निर्मितीचे आधारभूत घटक, लोकशाहीचे गुण-दोषांचा अभ्यास केला. यावरून आपणास असे दिसून येते की, भारतातील संसदीय लोकशाही व्यवस्था प्रशासनाच्या दृष्टीने किती महत्त्वपूर्ण आहे; हे स्पष्ट होते, कारण संसदीय लोकशाहीच्या वैशिष्ट्यावरूनच त्याचे महत्त्व समजून येते. तसेच लोकशाही मधील सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे लोकशाहीत नागरिकांना समान संधी निर्माण होते. तसेच स्वातंत्र्य, समता, न्याय मिळतो. तर लोकशाहीतील एक दोष म्हणजे पक्ष बदलला की, धोरण बदलतात; म्हणजेच धोरणात सातत्य नसते.

लोकशाही शासन व्यवस्थेत सामाजिक विषमता, वर्णद्वेष, जाती व्यवस्था, आर्थिक विषमता, धार्मिक मतभेद इत्यादी बाबींमुळे लोकशाहीला बाधा पोहोचत आहे. विपरीत परिस्थितीतही लोकशाही टिकून राहावी यासाठी लोकशाही मजबूत करू शकणाऱ्या संस्थांची जोपासना केली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिविकास, मानवता, शांतता या दृष्टीने लोकशाही शासनप्रणालीचे महत्त्व इतर शासन पद्धतींपेक्षा अधिक आहे हे सर्वमान्य झाले आहे. आज आपण २१ व्या शतकात पदार्पण केले असून जगातील २/३ पेक्षा अधिक राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. यावरून लोकशाही विकासाची वाटचाल समजून येते.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) लोकशाही म्हणजे काय?

(२) प्रातिनिधिक लोकशाहीचे प्रकार सांगा?

(३) लोकशाहीचे गुण-दोष सांगा?

(४) लोकशाही निर्मितीतील आधारभूत घटक कोणते आहेत?

(५) लोकशाही शासन पद्धतीची वैशिष्ट्ये सांगा?

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) पाटील, बी. बी. (२०१७). *लोकशाही निवडणूका व सुशासन.* कोल्हापूर, फडके प्रकाशन.

(२) सोनवणे, म. (२०१७). *लोकशाही जिंदाबाद.* अनुवादक, पुणे, समकालीन प्रकाशन.

(३) मेहेंदळे, ली. (२००३). *लोकशाहीचे ऐंशी प्रश्न आणि उत्तरे.* नवी दिल्ली, अनुवादक नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया.

ज्ञानगंगा घरोघरी

# घटक २ : राष्ट्रपती व उपराष्ट्रपती

*अनुक्रमणिका*


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय-विवेचन

- २.२.१ राष्ट्रपती
- २.२.२ राष्ट्रपतीचे अधिकार व कार्य
- २.२.३ उपराष्ट्रपती
- २.२.४ उपराष्ट्रपतींचे अधिकार व कार्य

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- भारतातील लोकशाही व्यवस्थेतील सर्वोच्च शासक याबद्दल माहिती सांगता येईल.
- राष्ट्रपतींचा कार्यकाळ व पदत्याग याची माहिती घेता येईल.
- राष्ट्रपतींच्या संकटकालीन अधिकारांचे विश्लेषण करता येईल.
- भारताच्या राष्ट्रपतीचे घटनात्मक आणि वास्तविक स्थान स्पष्ट करता येईल.
- अनुमोदन व सूचक यासंदर्भात माहिती सांगता येईल.

## २.१ प्रास्ताविक

भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केल्यामुळे राज्यव्यवस्थेत घटनात्मक सत्ताप्रमुख राष्ट्रपती, तर वास्तविक सत्ताप्रमुख पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळ असते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५२मध्ये राष्ट्रपती पदाची निर्मिती केली आहे. केंद्राची सर्व कार्यकारी सत्ता राष्ट्रपतीच्या नावानेच चालते. राष्ट्रपतींपेक्षा कोणतेही पद भारतामध्ये श्रेष्ठ मानले जात नाही. राष्ट्रपती हा भारताचा पहिला नागरिक आहे, परंतु ते नाममात्र प्रमुख असतात, खरी सत्ता म्हणजेच निर्णय घेण्याचे अधिकार पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या हातात असतात. राष्ट्रपती हे पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानेच राज्यकारभार करतात. भारतामधील राष्ट्रपती हे पद ब्रिटन व फ्रान्स या देशांकडून घेण्यात आले आहे, परंतु ब्रिटनप्रमाणे भारतामध्ये राष्ट्रपतीपदाची वंशपरंपरेने निवड

न होता अप्रत्यक्षपणे जनतेमार्फत केली जाते. तसेच भारताचा राष्ट्रपती हा भारतीय कायदेमंडळाचा अविभाज्य घटक म्हणून ओळखला जातो.

# २.२ विषय–विवेचन

## २.२.१ राष्ट्रपती

### (१) राष्ट्रपती पदासाठीची पात्रता

(१) व्यक्ती भारतीय नागरिक असावा.

(२) व्यक्तीने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावी.

(३) लोकसभेचा सदस्य म्हणून निवडून येण्याची पात्रता त्यांच्या अंगी असावी.

(४) केंद्र व राज्यविधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाची सभासद नसावी.

(५) व्यक्ती भारत सरकार, घटकराज्ये किंवा स्थानिक सरकारांमध्ये नोकरीला असू नये.

### (२) राष्ट्रपतींची निवड प्रक्रिया

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी अप्रत्यक्ष निवडणूक, एकल संक्रमणीय मतपद्धती व प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे तत्त्व स्विकारले आहे. निर्वाचन मंडळाच्या सर्व सभासदांच्या मतांचे मूल्य सारखे नसते. विविध विधानसभेच्या प्रत्येक सदस्यांच्या मतांचे मूल्य पुढील सूत्रानुसार काढले जाते.

$$\text{सूत्र : विधानसभा सदस्यांच्या मतांचे मूल्य} = \frac{\text{घटकराज्यांची लोकसंख्या}}{\text{विधानसभेची सदस्यसंख्या}} \times \frac{१}{१०००}$$

वरील सूत्राद्वारे प्रत्येक घटकराज्याची लोकसंख्या व विधानसभेची सदस्यसंख्या विचारात घेऊन तेथील सदस्यांच्या मतांचे मूल्य ठरविले जाते.

$$\text{सूत्र : लोकसभा/राज्यसभा सदस्यांच्या मतांचे मूल्य} = \frac{\text{सर्व राज्यांच्या विधानसभा सदस्यांच्या मतांची एकूण मूल्य}}{\text{सर्व राज्यांच्या विधानसभा सदस्यांच्या मतांची एकूण मूल्य}}$$

वरील सूत्राद्वारे संसदेच्या निर्वाचित सदस्यांच्या मतांचे मूल्य ठरविली जाते. राष्ट्रपती निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाधारे एकल संक्रमणीय मतदानपद्धतीने केली जात असल्यामुळे मतांची विभागणी टळते. निवडून येणारा उमेदवार निर्विवाद बहुमताने निवडून येतो. राष्ट्रपती म्हणून निवडून येण्यासाठी उमेदवाराला विशिष्ट मतसंख्येचा कोटा मिळविणे आवश्यक असते.

$$\text{सूत्र : } \frac{\text{एकूण मतांची संख्या}}{\text{निवडावयाच्या प्रतिनिधींची संख्या}} + १ = \text{कोटा}$$

याचा अर्थ निवडून येणाऱ्या उमेदवाराला निम्म्यापेक्षा एक मत अधिक म्हणजे स्पष्ट बहुमत मिळवावेच लागते.

**(अ) अनामत रक्कम**

राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढू इच्छिणाऱ्या खुला प्रवर्गाच्या उमेदवारास २५,००० रु. तर अ.जा.व. अ.ज. उमेदवारास १२,५०० रु. इतकी अनामत रक्कम म्हणून भरावी लागते.

**(आ) अनुमोदक व सूचक**

राष्ट्रपती पदाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या प्रत्येक उमेदवारास ५० अनुमोदक व ५० सूचक अशा एकूण १०० सदस्यांचा/खासदारांचा लेखी पाठिंबा आवश्यक असतो.

### (इ) निर्वाचन मंडळ

राष्ट्रपतींच्या निर्वाचन मंडळामध्ये लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य व सर्व राज्यातील विधानसभेच्या सदस्यांचा समावेश होतो. विधान परिषद सदस्यांना मतदानाचा अधिकार नसतो.

### (ई) शपथविधी

भारतीय राज्यघटनेच्या कलम ६० मध्ये राष्ट्रपतींनी घ्यावयाची शपथ स्पष्ट केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश राष्ट्रपतींना आपल्या कार्याची व गोपनीयतेची शपथ देतात.

### (३) कार्यकाल

भारताच्या राष्ट्रपतीचा कार्यकाल साधारण पाच वर्षाचा असतो. राष्ट्रपती पुन्हा निवडणूक लढवू शकतात. आतापर्यंत फक्त डॉ. राजेंद्रप्रसाद हेच दुसऱ्यांदा राष्ट्रपती म्हणून निवडून आले होते; कार्यकाल संपण्यापूर्वी राष्ट्रपती आपल्या पदाचा राजीनामा भारताच्या उपराष्ट्रपतीकडे देऊ शकतात व राष्ट्रपतीचे पद रिक्त झाल्यास उपराष्ट्रपती हे राष्ट्रपतीपदाचा पदभार सांभाळतात.

### (४) महाभियोग (राष्ट्रपतींची बडतर्फी)

राष्ट्रपतींना पदच्युत किंवा बडतर्फ करण्याच्या तरतुदीला महाभियोग असे म्हणतात. या तरतुदीनुसार संसदेचे कोणतेही सभागृह राष्ट्रपती विरुद्ध प्रस्ताव मांडू शकते. घटनाबाह्य वर्तन केले या एकाच कारणासाठी त्यांच्याविरुद्ध हा अधिकार संसदेला वापरता येतो. त्यानुसार राष्ट्रपतींना आपल्या पदावरून दूर केले जाऊ शकते. हा ठराव मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींना १४ दिवसांची पूर्वसूचना द्यावी लागते. हा ठराव मांडताना किमान १/४ सभासदांनी त्यावर सूचक म्हणून संमती द्यावी लागते. शेवटी चौकशीअंती राष्ट्रपतींचे एखादे वर्तन घटनाबाह्य आहे असे सिद्ध झाले आणि तो ठराव २/३ बहुमताने मंजूर झाला तर तो दुसऱ्या सभागृहात जातो. तेथे जर तो ठराव २/३ बहुमताने मंजूर झाला तरच राष्ट्रपतींना बडतर्फ केले जाते. आतापर्यंत महाभियोगाद्वारे कोणत्याही राष्ट्रपतींना बडतर्फ केले गेलेले नाही.

### (५) वेतन व भत्ते

२०१९च्या बदलानुसार भारताच्या राष्ट्रपतींना दरमहा रु. ५ लाख एवढे वेतन मिळते. राष्ट्रपतींना राहण्यासाठी मोफत सरकारी निवासस्थान मिळते. त्यांच्या दिल्ली येथील निवासस्थानाला 'राष्ट्रपती भवन' असे म्हणतात. सिमला येथील निवासस्थानाला राजभवन आणि हैद्राबादजवळील बोलाराम येथील निवासस्थानाला 'निलायम' असे म्हणतात. याशिवाय मोफत वैद्यकीय सवलती मिळतात. राष्ट्रपतींचे वेतन देशाच्या संचित निधीमधून दिले जाते. सध्या राष्ट्रपतींना मासिक निवृत्तिवेतन १.५ लाख रुपये मिळते. निवृत्तीनंतर राष्ट्रपतींना निवासस्थान व इतर सुविधा दिल्या जातात.

## २.२.२ राष्ट्रपतींचे अधिकार व कार्य

राष्ट्रप्रमुख या नात्याने राष्ट्रपतींना अनेक व्यापक स्वरूपाचे अधिकार प्राप्त झाले आहेत. ४२ व्या घटनादुरुस्तीने असे बंधन घालण्यात आले आहे की, राष्ट्रपती जी कार्ये करतात ती सर्व कार्य पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानेच करावी. राष्ट्रपती नाममात्र प्रमुख असतो. त्यामुळे राष्ट्रपतींना असणारे अधिकार हेदेखील नाममात्र आहेत. राष्ट्रपतींना मिळालेल्या अधिकारांचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

### (१) प्रशासनविषयक अधिकार

भारतातील सर्व केंद्रशासित प्रदेशांचा कारभार राष्ट्रपतींमार्फत चालतो. याशिवाय प्रशासन चालविण्यासाठी वेगवेगळ्या पदावरील व्यक्तींची नेमणूक राष्ट्रपती करतात. त्यामध्ये पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळातील सहकारी मंत्री, भारताचा महान्यायवादी, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक, राज्यपाल व नायब राज्यपाल, मुख्य व अन्य निवडणूक आयुक्त, तिन्ही सेनाचे सेनापती व अन्य प्रमुख अधिकारी तसेच वित्त आयोग, संघ आणि संयुक्त लोकसेवा आयोग, अनुसूचित जाती व जमाती आयोग, अध्यक्ष, मागासवर्ग आयोग अध्यक्ष, इत्यादी अनेक महत्त्वाच्या नेमणुका राष्ट्रपती करतात. वरीलपैकी त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्याचा अधिकारदेखील राष्ट्रपतींना असतो.

## (२) कायदेमंडळविषयक अधिकार

भारतीय राज्यघटनेनुसार राष्ट्रपती हे संसदेचा भाग असतात. त्यामुळे त्यांना कायदेमंडळविषयक अधिकार असतात. हे अधिकार मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार वापरतात.

### (अ) संसदेचे अधिवेशन बोलावणे/तहकूब करणे/विसर्जित करणे

संसदेच्या दोन्ही सभागृहांना वर्षातून किमान दोन वेळा निमंत्रित करणे, तहकूब करणे आणि लोकसभा विसर्जित करणे हे अधिकार राष्ट्रपतींना आहेत. दोन अधिवेशनांच्या मधील काळ सहा महिन्यांपेक्षा जास्त असता कामा नये, अशी घटनात्मक तरतूद आहे. निवडणूक पार पडल्यानंतर सहा महिने पूर्ण होण्याअगोदर अधिवेशन बोलावे लागते. तसेच लोकसभा मुदतपूर्व बरखास्त करावी लागते व नवीन निवडणुका घ्याव्या लागतात. दोन्ही सभागृहांमध्ये मतभेद झाल्यास संयुक्त बैठक घ्यावी लागते.

### (आ) अभिभाषण करणे

लोकसभा निवडणुकीनंतरचे पहिले अधिवेशन आणि संसदेच्या दोन्ही सभागृहांचे वर्षातील पहिले अधिवेशन याप्रसंगी दोन्ही सभागृहाना उद्देशून अभिभाषण करतात. सभागृहांना वेळोवेळी संदेश पाठवणे, गरज भासेल त्यानुसार विशेष किंवा संयुक्त अधिवेशन बोलावणे त्यांच्या अखत्यारीत असते.

### (इ) नियुक्ती

साहित्य, कला, विज्ञान आणि समाजसेवा या क्षेत्रांमध्ये विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या १२ व्यक्तींची नेमणूक राष्ट्रपती राज्यसभेवर करू शकतात. तसेच जर लोकसभेत ॲंग्लो इंडियन समाजाचे पुरेसे प्रमाणात प्रतिनिधित्व नसेल तर त्या समाजातील दोन सदस्यांची नियुक्ती राज्यसभेवर करतात.

### (ई) विधेयकाला मंजुरी

जेव्हा एखादे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांकडून मंजूर होते तेव्हा ते राष्ट्रपतींकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविले जाते. अर्थविषयक विधेयक, संचित निधीसंबंधी खर्च विधेयक, राज्याची सीमा बदलणारे विधेयक व नव्या राज्याची निर्मिती करणारे विधेयक सभागृहापुढे मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींची पूर्वसंमती घ्यावी लागते. संसदेने पारित केलेल्या प्रत्येक विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाल्याशिवाय विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही. राज्याच्या राज्य विधिमंडळामध्ये पारित केलेले विधेयक राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे संमतीसाठी पाठविल्यास त्यावर निर्णय घेणे.

### (उ) वटहुकूम

घटनेच्या कलम १२३ नुसार राष्ट्रपतींना अध्यादेश (वटहुकूम) काढण्याचा अधिकार आहे. अशा वटहुकूमाला सहा आठवड्यांच्या आत संसदेची परवानगी घेणे आवश्यक असते. थोडक्यात कायद्याची तातडीची गरज लक्षात घेऊन राष्ट्रपती तसा वटहुकूम जारी करतात. कायदेमंडळाने मंजुरी दिली की वटहुकूमाचे कायद्यात रूपांतर होते.

## (३) न्यायविषयक अधिकार

राष्ट्रपती घटनात्मक प्रमुख असतात. त्यामुळे त्यांना न्यायविषयक अधिकार घटनेने दिले आहेत. हे अधिकार पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार ते वापरत असतात. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नेमणुका राष्ट्रपती करतात. मात्र सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांमधून ज्येष्ठता क्रमाने ही नेमणूक केली जाते. याशिवाय न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला दिलेली शिक्षा रद्द करणे किंवा कमी करणे हे अधिकार राष्ट्रपतींना असतात. मात्र, यासाठी संबंधिताचे नातेवाईक यासाठी अर्ज करू शकतात. केवळ मानवतेच्या भूमिकेतून हा अधिकार वापरला जातो.

(अ) भारताच्या राज्यघटनेच्या कलम १२४ नुसार राष्ट्रपती सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नेमणुका करतात.

(आ) कलम १४३ नुसार संघराज्य शासनाच्या शासन कारभारात एखादा विवाद निर्माण झाला असेल किंवा सार्वजनिक हिताचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असेल अशा प्रसंगी राष्ट्रपती कोणत्याही कायदेविषयक किंवा वस्तुस्थितीविषयक प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून मत मागवू शकतात. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला पाळणे राष्ट्रपतींवर बंधनकारक नाही.

(इ) कलम ७२ नुसार एखाद्या व्यक्तीला लष्करी न्यायालयाने दिलेल्या शिक्षेबद्दल किंवा संघ कायद्याविरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला मृत्युदंडाची किंवा इतर गंभीर स्वरूपाची शिक्षा दिली असेल आणि त्या व्यक्तीने राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज सादर केला असेल, तर राष्ट्रपती त्या व्यक्तीला क्षमादान, शिक्षा तहकूब, शिक्षेत विश्राम, शिक्षादेश निलंबित किंवा सौम्य करण्याचा, शिक्षेत सुट देण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.

(ई) सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांवर महाभियोग खटला सिद्ध झाल्यास अशा प्रसंगी त्यांना राष्ट्रपती बडतर्फ करतात.

## (४) अणीबाणीविषयक अधिकार

भारतीय राज्यघटनेच्या १८ व्या भागात कलम ३५२ ते ३६० मध्ये अणीबाणीविषयक तीन प्रकारचे अधिकार दिलेले आहेत.

### (अ) राष्ट्रीय अणीबाणी

राज्यघटना कलम ३५२ नुसार बाह्य आक्रमण किंवा युद्धाच्या परिस्थितीत राज्याची सुरक्षा धोक्यात आल्यास राष्ट्रपती राष्ट्रीय अणीबाणी घोषित करू शकतात. ही अणीबाणी संसदेच्या परवानगीशिवाय दोन महिने व परवानगीने सहा महिन्यांपर्यंत लागू करता येते. अशाप्रसंगी राज्यातील सत्तेसह सर्व सत्ता केंद्राच्या हाती जाते.

### (आ) घटकराज्य अणीबाणी

राज्यघटना कलम ३५६ नुसार एखाद्या घटकराज्यात राजकीय स्थिरता निर्माण झाल्यास किंवा घटनेनुसार राज्यातील शासन चालविणे अशक्य झाल्यास राष्ट्रपती तेथे घटकराज्य अणीबाणी घोषित करतो. त्यालाच राष्ट्रपती राजवटसुद्धा म्हणतात. अशी अणीबाणी राज्यातील उच्च न्यायालय सोडून राज्यातील सर्व सत्ता केंद्राच्या नियंत्रणात येते. अणीबाणी कालावधी सहा महिने असू शकतो. आवश्यकता भासल्यास त्यामध्ये वाढ करता येते.

### (इ) आर्थिक अणीबाणी

राज्यघटना कलम ३६० नुसार संपूर्ण देशात किंवा विशिष्ट घटकराज्यात आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास व त्यामुळे देशाला आर्थिक संकटात जावे लागत असेल, अशा वेळी देशाला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रपती तेथे आर्थिक अणीबाणी घोषित करतात.

## (५) लष्करविषयक अधिकार

भारताचे राष्ट्रपती हे देशाचे सरसेनापती असतात. प्रत्यक्षात लष्कराचे सर्व कार्य कायद्यानुसारच चालत असते. मात्र शासन प्रमुख या नात्याने त्यांना हा दर्जा मिळाला आहे. राष्ट्रपतींना तिन्ही सेनादलाच्या प्रमुखांची नेमणूक करण्याचा अधिकार आहे. तसेच संसदेच्या मान्यतेनंतर युद्ध व शांततेसंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार राष्ट्रपतींनाच आहे.

## (६) परराष्ट्रविषयक अधिकार

राष्ट्रपती आंतरराष्ट्रीय मंचावर भारताचे प्रतिनिधित्व करतात. परराष्ट्राचे सर्व व्यवहार, करार राष्ट्रपतींच्या नावाने केले जातात. हे करार करण्यापूर्वी संसदेची संमती आवश्यक असते. याशिवाय विदेशात भारताचे राजदूत व राजनैतिक अधिकारी यांच्या नेमणुका तसेच विदेशी राजदूतांना आपल्या देशात राजनैतिक अधिकारी म्हणून स्वीकृती देतात.

## (७) अर्थविषयक अधिकार

राष्ट्रपतींना अर्थविषयक अधिकार आहेत. त्यात पुढील अधिकारांचा समावेश होतो.

(अ) कोणतेही धनविधेयक व अर्थसंकल्प संसदेत सादर करण्यापूर्वी राष्ट्रपतींची पूर्वपरवानगी घ्यावी लागते म्हणजे राष्ट्रपतींच्या सहमतीशिवाय कोणताही कर लावता येत नाही.

(आ) केंद्र सरकारच्या उत्पन्नाची केंद्र व राज्य सरकार यांच्यात वाटणी करण्यासाठी शिफारशी करणारा वित्त आयोग स्थापन करण्याचा अधिकार राष्ट्रपती यांनाच आहे.

(इ) देशातील महापूर, दुष्काळ यासारख्या संकटकाळात भारताच्या आकस्मिक निधीतून पैसा खर्च करण्यापूर्वी राष्ट्रपतीची पूर्वपरवानगी घ्यावी लागते.

### (८) इतर विशेष अधिकार

राष्ट्रपती हे भारतामधील सर्वोच्च पद असल्यामुळे त्यांना पुढील काही विशेष अधिकार आहेत.

(अ) कलम ७४ (२) नुसार मंत्रीमंडळाने राष्ट्रपतींना कोणता सल्ला दिला असे कोणत्याही न्यायालयाद्वारे विचारता येणार नाही.

(ब) कलम ३६१(१) नुसार राष्ट्रपतींना त्यांच्या कार्याबाबत कोणतेही न्यायालय विचारणा करू शकणार नाही.

(क) कलम ३६१(२) नुसार राष्ट्रपतींना पदावर असेपर्यंत कोणताही दंड आकारता येत नाही, तसेच कलम ३६१(३) नुसार न्यायालयाला अटक वारंट आदेश देता येणार नाही.

## २.२.३ उपराष्ट्रपती

भारतात राष्ट्रपती पदानंतर दुसऱ्या क्रमांकाचे पद म्हणजे उपराष्ट्रपती पद होय. राष्ट्रपती हे देशाबाहेर असतील किंवा आजारी असतील तर तात्पुरत्या काळासाठी राष्ट्रपतीपद सांभाळण्यासाठी उपराष्ट्रपती पदाची तरतूद कलम ६३मध्ये करण्यात आली आहे.

#### (१) पात्रता

(अ) ती व्यक्ती भारतीय नागरिक असावी.

(ब) त्यांनी वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(क) ती व्यक्ती सरकारी नोकर किंवा कोणत्याही आर्थिक पदावर कार्यरत नसावी.

(ड) सदर व्यक्ती राज्यसभेवर निवडून येण्याची पात्रता पूर्ण करणारा असावा.

(इ) संसद किंवा राज्यविधीमंडळाचा सदस्य नसावा.

#### (२) निवडणूक

उपराष्ट्रपतींच्या निवडणूकीसाठी निर्वाचन मंडळ असून त्यात लोकसभा व राज्यसभेच्या निर्वाचित सदस्यांचा समावेश असतो. उपराष्ट्रपतींची निवड गुप्त मतदान व प्रमाणशीर एकल पद्धतीने केली जाते. (कलम ६६(१))

#### (३) शपथविधी

भारतीय संविधानाच्या कलम ६९नुसार राष्ट्रपती हे उपराष्ट्रपतींना पदाची शपथ देतात.

#### (४) कार्यकाल

उपराष्ट्रपतींचा कार्यकाल हा शपथ घेतल्यापासून पुढील ५ वर्षांचा असतो. हा कार्यकाल संपण्यापूर्वी ते राजीनामा देऊ शकतात तसेच त्यांना राज्यसभेने पुढाकार घेऊन महाभियोग ठराव पास केल्यास व त्यास लोकसभेने मंजुरी दिल्यास कलम ६७(ब) नुसार उपराष्ट्रपतींना पदच्युत करता येते.

#### (५) वेतन

उपराष्ट्रपतींचा वेतन ठरविण्याचा अधिकार संसदेला आहे. २०१९च्या बदलानुसार सध्या उपराष्ट्रपती यांना दरमहा ४ लाख रुपये वेतन दिले जाते.

## २.२.४ उपराष्ट्रपतींचे अधिकार व कार्ये

(१) उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात, त्यामुळे त्यांना कलम ६४नुसार राज्यसभेचे कार्ये करावे लागते.

(२) राष्ट्रपती काही कारणांमुळे देशात उपलब्ध नसल्यास किंवा आजारी किंवा राष्ट्रपतींचा राजीनामा, मृत्यू या कारणांमुळे पद रिक्त असल्यास उपराष्ट्रपती कमाल ६ महिन्यांपर्यंत राष्ट्रपती म्हणून कार्ये करू शकतात. (कलम ६५ (२)).

(३) राज्यसभेचा अध्यक्ष म्हणून सभागृहात शांतता, शिस्त निर्माण करणे, विधेयकावर चर्चा घेणे व ठराव पारीत करून घेणे. आवश्यकता पडल्यास निर्णायक मत करणे, इत्यादी कार्ये करावी लागतात.

(४) देशातील विविध परिषदा, मेळावे, कार्यक्रमाचे उद्‌घाटन, इत्यादी कार्यक्रमांना उपस्थित राहू शकतात.

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**रिकाम्या जागा भरा.**

(१) राष्ट्रपती पदाच्या पात्रतेसाठी वयाची...........वर्षे पूर्ण केलेली असावी.

(२) राष्ट्रपती आपला राजीनामा.............कडे देतात.

(३) राष्ट्रपतींच्या बडतर्फ करण्याच्या प्रक्रियेला............असे म्हणतात.

(४) राष्ट्रपती राष्ट्रीय अणीबाणी..................चा कलमानुसार घोषित करू शकतात.

(५) राष्ट्रपतींना अध्यादेश (वटहुकूम) काढण्याचा अधिकार राज्यघटनेतील................या कलमानुसार प्राप्त झाला आहे.

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

(१) **कोटा :** राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीमध्ये निवडणुक येण्यासाठी विशिष्ट कोटा (संख्या) पूर्ण करावी लागते.

(२) **सुचक आणि अनुमोदक :** सुचक म्हणजेच नावाची शिफारस करणारे तर अनुमोदक म्हणजे त्या नावाला सहमती देणारी व्यक्ती

(३) **महाभियोग :** राष्ट्रपतींना बडतर्फ करण्याच्या पद्धतीला महाभियोग म्हणतात.

(४) **वटहुकूम :** एखाद्या कायद्याची नितांत गरज असते अशावेळी राष्ट्रपती व राज्यपाल (अधिवेशन जेव्हा चालू नसते) त्यावेळी वटहुकूम काढू शकतात. यालाच अध्यादेशदेखील म्हटले जाते.

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) ३५

(२) उपराष्ट्रपती

(३) महाभियोग

(४) ३५२

(५) १२३

## २.५ सारांश

राष्ट्रपती व उपराष्ट्रपती या घटकामध्ये आपण राष्ट्रपती पदासाठीची पात्रता, त्याची निवडप्रक्रिया, कार्यकाल, त्यांना बडतर्फ करण्याची पद्धत, त्यांच वेतन व भत्ते, तसेच त्यांचे अधिकार व कार्य यांचा अभ्यास केला. तसेच उपराष्ट्रपती हे राष्ट्रपतीच्या अनुपस्थितीमध्ये हे कार्य पार पाडतात. यावर असे स्पष्ट होते की, भारताने संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे त्यानुसार देशाचे कार्यकारीप्रमुख म्हणून राष्ट्रपती असतात, तर वास्तविक प्रमुख म्हणून पंतप्रधान मंत्रिमंडळ कार्य करीत असते. असे जरी असले तरी संपूर्ण देशाचा राज्यकारभार पहाण्याचे कार्य राष्ट्रपतींनाच पार पाडावे लागत असते. म्हणूनच त्यांना देशाचे प्रथम नागरीक म्हणून ओळखले जाते. भारतातील हे पद ब्रिटन व फ्रान्सची देशांकडून घेण्यात आलेले आहे. परंतु ब्रिटनप्रमाणे वंशपरारेने निवड न होता अग्रत्यक्षपणे जनतेद्वारे निवड होत असते. या निवड मंडळामध्ये सर्व राज्याचे विदानसभा सदस्य तसेच लोकसेवा व राज्यसभा या सभागृहातील निर्वाचित सदस्य यांच्या मताद्वारे राष्ट्रपतींची निवड केली जाते. म्हणून आज राष्ट्रपतींची निवडप्रक्रिया अवघड जरी वाटत असली तरीदेखील ते महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे.

भारतीय राज्यघटनेमध्ये राष्ट्रपतींचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. राष्ट्रपती हे पद देशात सर्वांत श्रेष्ठ अधिकारपद आहे; परंतु या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत असे मत व्यक्त केले होते की, भारताच्या राष्ट्रपतींचे स्थान इंग्लंडच्या राजासारखे आहे. जरी घटनात्मक अनेक महत्त्वाचे अधिकार दिलेले असले तरी हे सर्व अधिकार पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसारच वापरावे लागतात. वास्तविकपणे हे सर्व कार्य पंतप्रधानाकडून पार पाडले जातात. म्हणून राष्ट्रपतींना नामधारी प्रमुख व पंतप्रधान हे वास्तविक कार्यकारी प्रमुख समजले जातात. उपराष्ट्रपती हे राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीमध्ये आपले कार्य पार पाडतात, तसेच राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून कार्य पार पाडतात.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) महाभियोग यावर टीप लिहा.

(२) भारताच्या राष्ट्रपती पदासाठीची पात्रता सांगा.

(३) भारताच्या राष्ट्रपतींचे अणीबाणीविषयक अधिकार लिहा.

(४) राष्ट्रपतींचे कायदेविषयक अधिकार सांगा.

(५) राष्ट्रपतींचे न्यायविषयक अधिकार स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) जाधव, तु., शिरापूरकर म., (२०११). *भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया खंड-१.* पुणे, युनिक अकॅडमी.

(२) कटारिया, सु., (२००८). *भारतीय लोकप्रशासन.* नवी दिल्ली, नेशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर, (हिंदी).

(३) घांगरेकर, चिं.ग., (२०१४). *भारतीय राज्यघटना स्वरूप व राजकारण* नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.

(४) वाघमारे, श्या., गजभारे, सु. (२००८). *भारतीय प्रशासनाची रूपरेषा.* लातूर, राजमुद्रा प्रकाशन.

ज्ञानगंगा घरोघरी

# घटक ३ : राज्यसभा

*अनुक्रमणिका*

३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय-विवेचन
 ३.२.१ राज्यसभेची रचना
 ३.२.२ राज्यसभा अध्यक्षांची कार्ये
 ३.२.३ राज्यसभेचे अधिकार व कार्ये
 ३.२.४ कायदे निर्मितीची प्रक्रिया
 ३.२.५ घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशनिहाय राज्यसभा मतदारसंघ किंवा सदस्यसंख्या
३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
३.५ सारांश
३.६ सरावासाठी स्वाध्याय
३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

- संसदेच्या दुसऱ्या वरिष्ठ सभागृहाचा परिचय होईल.
- राज्यसभेची रचना सांगता येईल.
- राज्यसभेचे पदाधिकारी यांची ओळख होईल.
- राज्यसभा सभागृहाच्या अध्यक्षांचे कार्ये सांगता येईल.
- राज्यसभेचे अधिकार व कार्ये लिहिता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

भारतीय राज्यघटनेच्या ७९ कलमात असे स्पष्ट केले की, भारतात एक संसद राहील. राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा यांची मिळून संसद बनते. भारताची संसद द्विगृही असून राज्यसभा हे वरिष्ठ सभागृह आहे, तर लोकसभा हे कनिष्ठ सभागृह आहे. १९५४ साली त्यास अनुक्रमे 'राज्यसभा' व 'लोकसभा' ही हिंदी नावे देण्यात आली. राज्यसभा हे भारतीय संसदेचे वरिष्ठ किंवा द्वितीय सभागृह आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही वातावरणात राज्यसभा या सभागृहाची निर्मिती ३ एप्रिल १९५२ यावर्षी करण्यात आली. या सभागृहाची पहिली बैठक १३ मे १९५२ रोजी पार पडली. त्यानंतर २३ ऑगस्ट १९५४ रोजी राज्यसभेचे तत्कालीन सभापती यांनी सभागृहात अशी घोषणा केली की, काउंन्सिल ऑफ स्टेट्स हे हिंदी भाषेमध्ये 'राज्यसभा' म्हणून संबोधले जाईल. भारतीय राज्यघटनेत संघराज्य पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे

संघराज्यातील घटकराज्यांना प्रतिनिधित्व देण्यासाठी वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता होती. त्यामुळे भारतीय संसदेत राज्यसभेची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्यघटनेच्या कलम ८०, ८३, ८४, ८९ ते ९२ मध्ये राज्यसभेची रचना, सभासद संख्या, सभासदांची पात्रता, अधिवेशन, कार्यकाळ, सभागृहाचे पदाधिकारी, गणसंख्या इत्यादींचे वर्णन करण्यात आले आहे.

## ३.२ विषय-विवेचन

### ३.२.१ राज्यसभेची रचना

#### (०१) राज्यसभेची सदस्यसंख्या

राज्यघटनेच्या कलम ८० नुसार राज्यसभेच्या सभासदांची संख्या जास्तीतजास्त २५० असू शकते. त्यापैकी १२ सदस्य कला, क्रीडा, समाजसेवा, साहित्य, विज्ञान-तंत्रज्ञान, इत्यादी क्षेत्रांतून राष्ट्रपतींकडून नियुक्त केले जातील आणि राहिलेले २३८ सदस्य घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशसंबंधी असतात. राज्यांच्या विधानसभेतील सदस्य राज्यसभेच्या प्रतिनिधींची निवड एकल संक्रमण प्रमाणशीर व गुप्त मतदान पद्धतीने करतात.

राज्यसभेत सदस्यसंख्या निश्चित करताना घटकराज्यांची लोकसंख्या किंवा घटकराज्याचा भौगोलिक विस्तार लक्षात घेण्यात आलेला नाही. यामुळे सर्व राज्यांना समान दर्जा मिळण्यास मदत झाली आहे.

#### (०२) राज्यसभा सभासदाची पात्रता

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८४ नुसार राज्यसभा उमेदवाराला निवडून येण्यासाठी पुढील पात्रता आवश्यक आहे.

(१) तो भारताचा नागरिक असावा.

(२) त्याचे वय किमान ३० वर्षे पूर्ण असावे.

(३) केंद्र व राज्य सरकारच्या नोकरीत आर्थिक लाभाच्या पदावर नसावा.

(४) संबंधित राज्यांच्या मतदारसंघाच्या यादीत नाव असावे.

(५) संसदेच्या अटींचे त्याने पालन केलेले असावे.

#### (०३) सभासदांचा कार्यकाळ

राज्यसभेच्या सभासदांचे कार्यकाळासंबंधीचे वर्णन राज्यघटनेच्या कलम ८३ मध्ये करण्यात आलेले आहे. राज्यसभा हे कायदेमंडळाचे स्थायी व कायमस्वरूपी सभागृह असून ते कधीही बरखास्त होत नाही. राज्यसभा सदस्यांचा कार्यकाळ हा ६ वर्षांचा असतो. दर दोन वर्षांनी सभागृहातील १/३ सदस्य निवृत्त होतात व त्यांच्या जागी तेवढ्याच नवीन सदस्यांची निवड केली जाते. अणीबाणीच्या काळात राज्यसभा हे सभागृह बरखास्त केले जात नाही.

#### (०४) अनामत रक्कम

राज्यसभेची निवडणूक लढू इच्छिणाऱ्या प्रत्येक उमेदवारास २५,०००/- रुपये इतकी अनामत रक्कम भरावी लागते. मतांच्या १/६ इतकी मते मिळाल्यास अनामत रक्कम परत मिळते.

#### (०५) निवडणूक प्रक्रिया

राज्यसभेच्या सदस्यांची निवड अप्रत्यक्ष प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या एकल संक्रमणीय मतदान पद्धतीद्वारे केली जाते. राज्यसभेच्या उमेदवारास मतदान करण्याचा अधिकार त्या-त्या राज्यातील विधानसभेच्या सदस्यांना असतो. राज्यसभा सदस्यांच्या निवडप्रक्रियेमध्ये विधानपरिषदेच्या सदस्यांना सहभाग घेता येत नाही. केंद्रशासित प्रदेशाबाबत राज्यसभेतील सभासदांची नियुक्ती कोणी करावी हे ठरविण्याचा अधिकार संसदेला असतो. भारतातील दिल्ली व पुडुचेरी या दोनच केंद्रशासित प्रदेशांतून राज्यसभेवर सदस्य निवडले जातात.

किमान मतसंख्या ठरविण्यासाठी एक सूत्र वापरले जाते ते सूत्र

किमान मते (कोटा) = एकूण वैध मते

------------------------+१

प्रतिनिधीसंख्या +१

= १००

----------+१

२

कोटा = ५० + १

### (०६) शपथविधी

राज्यसभा सदस्यांना राष्ट्रपतींमार्फत शपथ दिली जाते.

### (०७) राजीनामा

राज्यसभा सदस्य आपला राजीनामा राज्यसभा अध्यक्षांकडे देतात.

### (०८) अधिवेशन

राज्यसभेचे वर्षातून दोन अधिवेशन भरतात. दोन अधिवेशनामध्ये ६ महिन्यापेक्षा जास्त अंतर असू नये. दोन्ही अधिवेशन (हिवाळी व पावसाळी) दिल्ली येथे भरतात. अधिवेशन बोलावण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. अधिवेशनामध्ये अभिभाषण करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. अधिवेशन बरखास्त करण्याचा अधिकारसुद्धा राष्ट्रपतींना असतो.

### (०९) गणसंख्या

गणसंख्या म्हणजे अधिवेशन सुरू होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्यसंख्या होय.

सभागृहात गणसंख्या आहे किंवा नाही हे राज्यसभेचे अध्यक्ष पाहतात. सभागृहात गणसंख्या पूर्ण नसेल तर सभागृहाचे कामकाज काही काळासाठी स्थगित केले जाते आणि गणसंख्या पूर्ण झाल्यावर सभागृहाचे कामकाज सुरू केले जाते.

#### (१०) राज्यसभेचे पदाधिकारी

भारतीय राज्यघटनेच्या पाचव्या भागात कलम ८९ मध्ये राज्यसभा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यसभेचे कामकाज अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या नियंत्रणाखाली चालते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ६४ नुसार उपराष्ट्रपती हा राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष असतो; परंतु राज्यसभा या सभागृहाचा सदस्य असत नाही. उपराष्ट्रपती राज्यसभेचे सभासद नसल्यामुळे त्यांना सभागृहात मतदान करण्याचा अधिकार नसतो, परंतु एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास राज्यघटनेतील कलम १०० नुसार त्या विधेयकावर निर्णायक मत देऊ शकतात. राज्यसभेचे सर्व सदस्य आपल्यामधून फक्त उपाध्यक्षांची निवड करतात. राज्यसभा अध्यक्षांचा कार्यकाळ साधारण ५ वर्षांचा असतो. राज्यसभा अध्यक्षांना शपथ राष्ट्रपतींमार्फत दिली जाते. अध्यक्ष आपला राजीनामा मंजुरीसाठी राष्ट्रपतींकडे देतात.

## ३.२.२ राज्यसभा अध्यक्षांची कार्ये

उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. उपराष्ट्रपती ह्या नात्याने कोणतेही विशेष अधिकार नाहीत, परंतु राज्यसभेच्या कामकाजावर नियंत्रण, शिस्त ठेवण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्य पार पाडतात.

(०१) कलम ६४ नुसार उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.

(०२) सभागृहाच्या कामकाजाचे नियम व उपनियम तयार करणे.

(०३) सभागृहामध्ये शांतता व नियंत्रण प्रस्थापित करून सदस्यांना मार्गदर्शन करणे.

(०४) सभागृहात एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास स्वत:चे निर्णायक मत देणे.

(०५) राज्यसभेतील सभांचे अध्यक्षस्थान भूषविणे.

(०६) सभागृहाच्या कामकाजाबाबतच्या नियमांचा अर्थ लावण्याचे काम अध्यक्ष करतात.

(०७) गणसंख्या पूर्ण नसेल तर सभा तहकूब करणे.

(०८) विधेयक सादर करणे, प्रश्न विचारणे, ठराव मांडणे या गोष्टींसाठी अध्यक्षांची औपचारिक संमती लागते.

(०९) सर्व सभासदांना भाषणाची संधी देणे.

(१०) निरनिराळ्या समित्यांवर सभासदांच्या नेमणुका करणे.

(११) एखाद्या सदस्याने पक्षांतर केल्यास पक्षांतरबंदी कायद्यानुसार त्या सभासदाचे राज्यसभेचे सदस्यत्व रद्द करणे इत्यादी.

## ३.२.३ राज्यसभेचे अधिकार व कार्ये

राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे आणि त्या नात्याने राज्यसभेला अनेक प्रकारचे अधिकार आहेत. राज्यसभेला आपले अधिकार लोकसभेच्या बरोबरीने वापरावे लागतात. तसेच राज्यसभेचे अधिकार काही बाबतीत लोकसभेच्या अधिकारांपेक्षा कमी आहेत. राज्यसभेला पुढील प्रकारचे अधिकार आहेत.

### (१) कायदेविषयक अधिकार

राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. त्यामुळे कायदा तयार करताना या सभागृहाचा विचार आणि मान्यता घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने कोणतेही विधेयक राज्यसभेत मांडता येते, याला अपवाद म्हणजे आर्थिक विधेयक हे होय. अर्थविषयक विधेयक फक्त लोकसभेतच मांडावे लागते. राज्यसभेला लोकसभेसारखे अधिकार असले तरी कोणत्याही विधेयकाला कायमस्वरूपात विरोध किंवा नामंजूर करता येत नाही. याचे कारण म्हणजे लोकसभेत राज्यसभेपेक्षा दुपटीने जास्त सदस्य आहेत आणि हे सर्व सदस्य प्रत्यक्ष लोकांकडून निवडून आलेले असतात. त्यामुळे असा विरोध करता येत नाही. लोकसभेने एखादे विधेयक मंजूर करून राज्यसभेकडे पाठविल्यास राज्यसभा असे विधेयक सहा महिन्यांपर्यंत आपल्याकडे संमती न देता ठेवून घेऊ शकते; परंतु ६ महिन्यांनंतरदेखील न पाठविल्यास पेचप्रसंग निर्माण होतो. अशा वेळी राष्ट्रपतींकडून संयुक्त बैठक बोलावली जाऊ शकते म्हणजेच राज्यसभेशिवाय कायदे बनविण्याचे कार्य पूर्ण होऊ शकत नाही.

### (२) अर्थविषयक अधिकार

अर्थविषयक अधिकाराच्या बाबतीत राज्यसभेचे स्थान दुय्यम स्वरूपाचे आहे. अर्थविषयक विधेयक हे प्रथम लोकसभेतच मांडता येते व लोकसभेत मंजूर झाल्यानंतर राज्यसभेकडे मंजुरीसाठी पाठवले जाते. राज्यसभेला ते १४ दिवसांच्या आत मंजुरी देऊन परत पाठवावे लागते. अन्यथा ते राज्यसभेला मंजूर आहे असे समजले जाते. राज्यसभा फार तर त्यामध्ये दुरुस्त्या सुचवून ते अर्थविषयक विधेयक लोकसभेकडे पाठवू शकते आणि त्या सूचना लोकसभेने स्वीकारल्याच पाहिजे असे बंधन नाही. अशा प्रकारे अर्थविषयक अधिकाराबाबत लोकसभाच श्रेष्ठ व शक्तिशाली असते.

### (३) प्रशासनविषयक अधिकार

प्रशासनविषयक प्रश्न उपप्रश्न विचारणे, चर्चा घडवून आणणे, स्थगन प्रस्ताव आणणे, निंदाव्यंजक ठराव आणणे, अविश्वासाचा ठराव आणणे हे मार्ग राज्यसभेच्या सदस्यांना प्रशासनावर नियंत्रण करण्यासाठी उपलब्ध असतात. त्यामुळे प्रशासनाला योग्य वळण देण्याचे कार्य केले जाऊ शकते. त्यामुळे मंत्री आपले कार्ये चोखपणे व्हावे, सभागृहामध्ये आपला निष्काळजीपणा सिद्ध होऊ नये म्हणून काळजी घेतात. अशा प्रकारे प्रशासनावर राज्यसभेचा अंकुश राहू शकतो. थोडक्यात, मंत्रीमंडळावर प्रभाव आणि परिणाम टाकण्याचे कार्य राज्यसभा करीत असते.

### (४) घटनादुरुस्तीविषयक अधिकार

घटनादुरुस्तीसंबंधी राज्यसभेला लोकसभेबरोबरच अधिकार प्राप्त झालेले आहेत. घटनादुरुस्तीचे विधेयक राज्यसभेत मांडता येते. तेथे एकूण सदस्यसंख्येच्या उपस्थित मतदान करणाऱ्या २/३ बहुमताने मंजूर व्हावे लागते. राज्यसभेत मंजूर झालेले हे विधेयक नंतर लोकसभेत पाठविले जाते. लोकसभेतदेखील ते तशाच प्रकारे स्वतंत्रपणे पास व्हावे लागते. जर ते लोकसभेत पास झाले नाही तर घटनादुरुस्ती होऊ शकत नाही. दोन्ही सभागृहांत मतभेद होऊन पेचप्रसंग निर्माण झाल्यास संयुक्त बैठक बोलावता येत नाही. त्यामुळे राज्यसभेचा अधिकार महत्त्वाचा समजला पाहिजे.

### (५) निवडणुकीसंबंधीचे अधिकार

राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांना निवडून देण्याचे अधिकार लोकसभेबरोबर राज्यसभेलाही प्राप्त झाले आहेत. या ठिकाणी राज्यसभा ही लोकसभेइतकीच महत्त्वाची असते. राज्यसभेतील राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या सभासदांना मतदानात भाग घेता येत

नाही. तसे पाहिले असता लोकसभेमध्येदेखील राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले दोन सभासद असतात. त्यांनादेखील राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांत भाग घेता येत नाही.

## (६) महाभियोगाच्या खटल्यासंबंधी अधिकार

राष्ट्रपतींवर चालविला जाऊ शकणारा हा महाभियोग खटला प्रथम जर लोकसभेने आरोपपत्र ठेवून मान्य केला तर त्या खटल्यासंबंधीचे कामकाज राज्यसभेला चालवावे लागते. या सभागृहात राष्ट्रपतींना आपली बाजू मांडण्याचा अधिकार असतो. त्यामुळे राज्यसभेतील या खटल्यासंबंधीचे कामकाज अत्यंत महत्त्वाचे समजले जाते. या सभागृहाने महाभियोगाचा खटला मान्य केला तर राष्ट्रपतींना पदच्युत केले जाते. भारताच्या राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, उपराष्ट्रपती, निर्वाचन आयुक्त, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष, इ. संरक्षण दिलेले आहे. त्यांना बडतर्फ करण्याचे अधिकार लोकसभेप्रमाणे राज्यसभेला प्राप्त झालेले आहेत.

## (७) घटकराज्यासंबंधीचा अधिकार

राज्यसभा घटकराज्यांचे प्रतिनिधित्व करते. भारतीय संघराज्यात घटकराज्यांना आपला कारभार करण्यासंबंधीचे अधिकार राज्यसूचीमध्ये ६६ विषयांचा समावेश करून दिलेला आहे. राज्यसूचीमध्ये असलेल्या विषयावर संसदेने कायदा करावा अशी आवश्यकता निर्माण झाल्यास प्रथमतः राज्यसभेने अशा प्रकारचा ठराव मंजूर करणे आवश्यक असते. राज्यसभेने मान्यता दिल्यावर लोकसभेत तो ठराव पास झाल्यास व राष्ट्रपतींनी संमती दिल्यावर तो कायदा बनतो; परंतु अशा प्रकारचा कायदा फक्त एक वर्षासाठी अमलात राहू शकतो. यातून राज्यसभा दोन्ही गोष्टी साध्य करते. एक राष्ट्रीय हित जोपासणे व दुसरे राज्याची स्वायतत्ता कायम राखणे.

## (८) इतर अधिकार

वरील अधिकारांशिवाय राज्यसभेला इतर काही अधिकार प्राप्त झाले आहेत.

### (अ) अणीबाणीविषयीचे अधिकार

कोणत्याही कारणाने अणीबाणी जाहीर झाल्यास अशा ठरावाला राज्यसभेची स्वतंत्र मान्यता असणे आवश्यक आहे. काही कारणाने लोकसभा विसर्जित झाली असल्यास राज्यसभेची संमती पुरेशी ठरते.

### (आ) अखिल भारतीय सेवा निर्माण करणे

राज्यसभा २/३ बहुमताने नवीन अखिल भारतीय सेवा निर्माण करू शकते. म्हणजे तसा ठराव राज्यसभा बहुमताने मान्य करते आणि नंतर संसद तसा कायदा तयार करते.

### (इ) सुट्ट्या मंजूर करण्याचा अधिकार


सदस्यांना सुट्ट्या मंजूर करण्याचा राज्यसभेला अधिकार आहे. कोणत्याही सदस्याला ६० दिवसांपैकी अधिक गैरहजर राहता येत नाही. अशा वेळी त्याला परवानगी देणे गरजेचे आहे. या अधिकाराचा उपयोग गरज म्हणून केला जातो.

### (ई) राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीत भाग घेणे.

राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांची निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधीत्त्वाच्या तत्त्वाधारे एकल संक्रमणीय मतपद्धतीने केली जाते. राज्यसभा यांच्यातील निर्वाचित सदस्य मतदानात भाग घेऊन आपला हक्क बजावतात.

# ३.२.४ कायदे निर्मितीची प्रक्रिया

धनविधेयक प्रथम लोकसभेत मांडावे लागते. म्हणजेच धनविधेयक सोडून इतर कोणतेही विधेयक कोणत्याही सभागृहात प्रथम मांडता येते. कोणतेही विधेयक दोन्ही किंवा प्रत्येक सभागृहात खालील प्रक्रियेतून जाते.




## ३.२.५ घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशनिहाय राज्यसभा मतदारसंघ किंवा सदस्यसंख्या

| अ.क्र. | घटकराज्य व केंद्रशासित प्रदेश | एकूण जागा |
|---|---|---|
| (०१) | आंध्रप्रदेश | ११ |
| (०२) | अरुणाचल प्रदेश | ०१ |
| (०३) | आसाम | ०७ |
| (०४) | बिहार | १६ |
| (०५) | छत्तीसगड | ०५ |
| (०६) | गोवा | ०१ |
| (०७) | गुजरात | ११ |
| (०८) | हरियाणा | ०५ |
| (०९) | हिमाचल प्रदेश | ०३ |
| (१०) | झारखंड | ०६ |
| (११) | कर्नाटक | १२ |
| (१२) | केरळ | ०९ |

| | | |
|---|---|---|
| (१३) | मध्यप्रदेश | ११ |
| (१४) | महाराष्ट्र | १९ |
| (१५) | मणिपूर | ०१ |
| (१६) | मेघालय | ०१ |
| (१७) | मिझोराम | ०१ |
| (१८) | नागालँड | ०१ |
| (१९) | ओडिशा | १० |
| (२०) | पंजाब | ०७ |
| (२१) | राजस्थान | १० |
| (२२) | सिक्किम | ०१ |
| (२३) | तामिळनाडू | १८ |
| (२४) | तेलंगणा | ०७ |
| (२५) | त्रिपूरा | ०१ |
| (२६) | उत्तरप्रदेश | ३१ |
| (२७) | उत्तराखंड | ०३ |
| (२८) | पश्चिम बंगाल | १६ |
| (१) | दिल्ली | ०३ |
| (२) | पुडुचेरी | ०१ |
| (३) | चंदीगड | ०० |
| (४) | अंदमान निकोबार | ०० |
| (५) | दादर व नगर हवेली आणि दमन व दीव | ०० |
| (६) | लक्षद्वीप | ०० |
| (७) | जम्मू व काश्मीर | ०४ |
| (८) | लडाख | ०० |
| | राष्ट्रपती नियुक्त | १२ |
| | **एकूण** | **२४५** |

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**चूक किंवा बरोबर ते सांगा.**

(१) भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह म्हणून राज्यसभेला ओळखले जाते.

(२) राज्यसभेच्या सभासदाची संख्या जास्तीतजास्त ५५२ असू शकते.

(३) राज्यसभेच्या सदस्याचा कार्यकाल ६ वर्षांचा असतो.

(४) राज्यसभा सभागृह नवीन अखिल भारतीय सेवा निर्माण करू शकते.

(५) महाराष्ट्रातून राज्यसभा सभागृहामध्ये १९ सदस्य निवडून जातात.

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

(१) **गणसंख्या :** गणसंख्या म्हणजे अधिवेशन सुरू होण्याआधी आवश्यक असलेली सदस्यसंख्या.

(२) **द्विगृही :** दोन सभागृह असलेली.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) बरोबर

(२) चूक

(३) बरोबर

(४) बरोबर

(५) बरोबर

## ३.५ सारांश

राज्यसभा या घटकामध्ये राज्यसभेची रचना, राज्यसभा अध्यक्षांची कार्ये, राज्यसभेचे अधिकार व कार्य तसेच कायदे निर्मितीची प्रक्रिया, घटक राज्य व केंद्रशासित प्रदेशनिहाय राज्यसभा सदस्य संस्था याचा आपण अभ्यास केला. या अभ्यासाअंती आपणास असे दिसून येते की, लोकसभा हे सभागृह जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे. परंतु राज्यसभा हे सभागृह जनतेचे प्रतिनिधीत्व करत नसून ते घटक राज्याचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे हे स्पष्ट होते. राज्यसभा हे सभागृह भारतीय संसदेचे वरिष्ठ सभागृह असून ते द्वितीय सभागृह आहे. या सभागृहामध्ये अनुभवी, ज्ञानी विचारवंतांची निवड ही (१२ सदस्यांची) राष्ट्रपतींद्वारे केली जाते. तसेच अधिकाराच्या बाबतीत लोकसभेच्या तुलनेत मात्र काही बाबतीत कमी अधिकार असल्याचे दिसून येते.

भारताचे राज्यसभा सभागृह इंग्लंडच्या लॉर्डस सभागृहापेक्षा श्रेष्ठ आहे; परंतु ती अमेरिकेच्या सिनेटपेक्षा अधिकार दृष्ट्या कनिष्ठ दर्जाची आहे. लोकसभेचे महत्त्वपूर्ण विषयावर लक्ष आकर्षित करणे, लोकसभेचे विसर्जन झाल्यास अपुऱ्या राहिलेल्या विधेयकावर चर्चा करून नवीन निवडून येणाऱ्या लोकसभेचे लक्ष केंद्रित करणे, अणीबाणीत लोकसभा विसर्जित झाल्यास राष्ट्रपतींवर नियंत्रण ठेवणे इत्यादी याशिवाय अनुभवी, ज्ञानी व विचारवंतांना निवडणूक प्रक्रियेत यश मिळेलच असे सांगता येणार नाही. म्हणून अशांना प्रतिनिधी म्हणून संधी देण्यासाठी समाजातील विविध घटकांना सामावून घेण्यासाठी व प्रत्येक राज्याचे हित जपण्यासाठी संविधानकर्त्यांनी राज्यसभेची आवश्यकता आणि महत्त्व जाणून राज्यसभा हे सभागृहाची निर्मिती केली.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) द्वितीय सभागृह या दृष्टीने राज्यसभेचे अधिकार स्पष्ट करा.

(२) राज्यसभेचा अध्यक्ष यावर टीप लिहा.

(३) राज्यसभेच्या सदस्यांची पात्रता सांगा.

(४) राज्यसभेची रचना व निवडणूक प्रक्रिया यासंबंधीची माहिती द्या.

(५) राज्यसभा सभागृह व राज्यसभा सदस्यांचा कालावधी स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) कुलकर्णी, बी. वाय., (२०१३) *भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया*, औरंगाबाद, एज्युकेशन पब्लिशर्स.
(२) मेहता, एस. सी., (२००७) *भारतीय शासन*, जयपूर, हिंदी ग्रंथ अकादमी.
(३) पाटील, प्र. आणि आरगडे अं. (२०१२) *भारतीय प्रशासन*, लातूर, आदित्य प्रकाशन.
(४) वाघमारे, श्यामसुंदर, गजभारे सुरेश (२००८) *भारतीय प्रशासनाची रूपरेषा*, लातूर, राजमुद्रा प्रकाशन.

ज्ञानगंगा घरोघरी

# घटक ४ : लोकसभा

*अनुक्रमणिका*

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
    ४.२.१ लोकसभेची रचना
    ४.२.२ लोकसभेचे सभापती व उपसभापती
    ४.२.३ सभापतींचे अधिकार व कार्ये
    ४.२.४ लोकसभेचे अधिकार व कार्ये
    ४.२.५ संसदीय समित्या
    ४.२.६ घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशनिहाय लोकसभा सदस्यसंख्या
४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास,

- लोकसभा सभागृहाचे महत्त्व व स्थान स्पष्ट होईल.
- सभापतींचे अधिकार व कार्ये सांगता येतील.
- लोकसभेची गणसंख्या, अधिवेशन, सभासदांची निवडणूक या संकल्पना स्पष्ट होतील.
- संयुक्त अधिवेशन याचा अर्थ सांगता येईल.
- लोकसभेचे अधिकार स्पष्ट करता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ नुसार देशासाठी कनिष्ठ सभागृह असेल असे नमूद केले आहे. लोकसभा हे भारतीय संसदेचे प्रथम परंतु कनिष्ठ सभागृह आहे. ह्या सभागृहामध्ये लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. म्हणून ह्या सभागृहाला लोकसभा किंवा लोकनियुक्त सभागृह असे म्हणतात. ब्रिटिश तथा कॅनडाच्या कॉमपन्स सभागृहाच्या आधारावरच तिची निर्मिती केली आहे. संपूर्ण देशामध्ये लोकसंख्येच्या आधारावर निरनिराळे मतदारसंघ बनविले जातात व प्रत्येक मतदारसंघातून एक प्रतिनिधी निवडला जातो. त्यामुळेच संसदीय शासनप्रणालीमध्ये लोकसभेस व्यापक व प्रभावी अधिकार देण्यात आले आहेत. या सभागृहात ज्या पक्षाला बहुमत असते अशाच पक्षाचा नेता पंतप्रधानपदी विराजमान होतो व लोकसभेचा विश्वास

असेपर्यंत पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ सत्तेवर राहते. सरकारने लोकसभेतील आपले बहुमत गमावल्यास सत्तेपासून वंचित राहावे लागते. त्यामुळे लोकसभा हे शक्तिशाली सभागृह मानले जाते.

## ४.२.१ लोकसभेची रचना

लोकसभेत सार्वत्रिक निवडणुकीत प्रत्यक्ष जनतेद्वारे निवडलेले प्रतिनिधी या सभागृहात असतात. त्यांना 'खासदार' असे म्हणतात. लोकसभेत जनतेचे प्रतिनिधित्व असते. लोकसभेची रचना, सभासद संख्या, सभासदांची पात्रता, निवडणुका, सभासदांचा कार्यकाल, सभागृहाचे अधिवेशन आणि लोकसभेचा सभापती इत्यादी संबंधी वर्णन राज्यघटनेच्या विविध कलमांत करण्यात आलेले आहे.

### (१) सभासद संख्या

लोकसभेच्या सभासदांची संख्या किती असावी यासंबंधीचे वर्णन राज्यघटनेच्या कलम ८१ मध्ये करण्यात आले आहे. लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह असल्यामुळे लोकसभेच्या सभासदांची संख्या वेळोवेळी बदललेली आहे. सुरुवातीला लोकसभेची सभासद संख्या ५०० इतकी होती. कालांतराने त्यात वाढ होत गेली. १९७६ मधील ४२व्या घटनादुरुस्तीनुसार ही सभासद संख्या ५४५ इतकी झाली. ती कमाल ५५२पर्यंत जाऊ शकते. त्यानुसार इ.स. २०००मध्ये संसदेने कायदा करून ही मर्यादा इ.स. २०२६ पर्यंत कायम केली. ५४५ सभासदांपैकी ५२५ सभासद घटकराज्यांतून तर २० सभासद केंद्रशासित प्रदेशातून निवडण्यात येतात. लोकसभेत ॲंग्लो-इंडियन समाजाचे प्रतिनिधी निवडून न आल्यास त्यांचे दोन प्रतिनिधी नियुक्त करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.

### (२) सभासदांची निवडणूक

लोकसभेचे सभासद निरनिराळ्या मतदारसंघातून निवडलेले असतात. साधारणतः एक प्रतिनिधी ५ लाख ते ८ लाख लोकसंख्येच्या मागे निवडला जातो. लोकसभेच्या निवडणुकीसाठी भारतात प्रत्यक्ष निवडणूक पद्धतीचा अवलंब केला जातो. १९८९च्या ६१ व्या घटनादुरुस्तीनुसार वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला कोणताही भेदभाव न करता मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. लोकसभेच्या प्रत्येक मतदारसंघात अनेक उमेदवार निवडणुका लढवू शकत असले, तरी सर्वांत जास्त मते मिळविणारा एकच उमेदवार निवडून येतो, त्याला 'खासदार' असे म्हणतात.

### (३) सभासदांची पात्रता

लोकसभा सदस्यांची निवड प्रत्यक्ष निवडणुकीने होते. ही निवडणूक गुप्त मतदान, प्रौढ मतदान व साधे बहुमत पद्धतीने होते. असे असले तरी संसदेचा सदस्य म्हणून पात्र ठरविण्यासाठी कलम ८४ नुसार व्यक्तीच्या अंगी पुढील पात्रता असाव्यात.

(१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असावा.
(२) वयाची २५ वर्षे पूर्ण केलेली असावी.
(३) संसदेने वेळोवेळी विहित केलेल्या अटी त्याने पूर्ण केलेल्या असाव्यात.
(४) केंद्र किंवा राज्य शासनाच्या नोकरीत नसावा.
(५) राखीव जागेवरून निवडणूक लढविणारा उमेदवार त्याच जातीचा असावा.

### (४) अनामत रक्कम

लोकसभेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या प्रत्येक उमेदवारास निश्चित अशा स्वरूपाची अनामत रक्कम भरावी लागते. खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी २५,०००/- रुपये व अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारासाठी १५,०००/- रुपये एवढी रक्कम भरावी लागते.

### (५) लोकसभेचा कार्यकाळ

लोकसभेच्या कार्यकाळासंबंधीचे वर्णन राज्यघटनेच्या कलम ८३ मध्ये करण्यात आलेले आहे. त्यानुसार लोकसभेचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. अणीबाणीच्या काळात संसद कायदा करून लोकसभेचा कार्यकाळ एकावेळी जास्तीतजास्त एक वर्षापर्यंत वाढवू शकते. मात्र आणीबाणी काळ संपल्यानंतर लोकसभेचा कार्यकाळ सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ वाढविता

येत नाही. सभासद कार्यकाळ संपण्यापूर्वी सभासदांना स्वेच्छेने लोकसभा सभापतींकडे राजीनामा देता येऊ शकतो, तसेच एखादा सभासद सलग ६० दिवस सभागृहाच्या कामकाजात गैरहजर राहिल्यास त्याचे सभासदत्व रद्द होते.

### (६) लोकसभेचे अधिवेशन

राज्यघटनेतील कलम ८५ नुसार भारताचे राष्ट्रपती पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार लोकसभेचे अधिवेशन बोलवितात. लोकसभेचे अधिवेशन वर्षातून दोन वेळा बोलावले जाते. दोन अधिवेशनातील (पावसाळी व हिवाळी अधिवेशन) काळ सहा महिन्यापेक्षा जास्त असू शकत नाही. राज्यघटनेतील कलम ८६ नुसार लोकसभेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर आणि दरवर्षीच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक होत असते. या संयुक्त बैठकीत भारताच्या राष्ट्रपतींचे भाषण होत असते, त्याला राष्ट्रपतींचे अभिभाषण असे म्हटले जाते.

### (७) लोकसभेची गणसंख्या

भारतीय राज्यघटनेतील कलम १०० नुसार लोकसभेचे कामकाज सुरू करण्यासाठी एकूण सभासदांपैकी १/१० सभासद उपस्थित असणे आवश्यक असते. सभागृहातील योग्य ती गणसंख्या पाहण्याची जबाबदारी सभापतींची असते. सभागृहात गणसंख्या पूर्ण नसेल तर सभागृहाचे कामकाज स्थगित ठेवण्याचा अधिकार सभापतींना असतो.

## ४.२.२ लोकसभेचे सभापती व उपसभापती

भारतीय राज्यघटनेच्या ९३ व्या कलमानुसार भारतामध्ये लोकसभेच्या अध्यक्षपदाची निर्मिती केली. लोकसभा अध्यक्षाला 'स्पीकर' असे म्हणतात. लोकसभेचे सभासद आपल्यातून एकाची सभापती म्हणून तर दुसऱ्या एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. सभापतींच्या गैरहजेरीत उपसभापती लोकसभेचे कामकाज पाहतात. सभापती व उपसभापतींच्या गैरहजेरीत लोकसभेचे कामकाज पाहण्यासाठी सहा सभासदांचे एक सभापती मंडळ सभापतींने नेमलेले असते. ते ज्येष्ठता क्रमानुसार 'सभागृहाचे अध्यक्ष' म्हणून कार्य पाहतात. सभापती हे सभागृहाचे प्रमुख असतात. त्यांना कोणत्याही पक्षाची बाजू न घेता निपक्षपतीपणे भूमिका पार पाडावी लागते. सभापती व उपसभापती सर्वसाधारणपणे सभागृहाची मुदत असेपर्यंत पदावर राहतात, मात्र मुदतपूर्व काही कारणांनी त्यांचे पद रिक्त होऊ शकते. ते पुढीलप्रमाणे,

(१) जर त्यांचे सभागृहाचे सभासदत्व रद्द झाले असेल.
(२) त्यांनी जर आपला राजीनामा दिला असेल.
(३) सभागृहातील सभासदांनी काढून टाकण्याचा ठराव बहुमताने संमत केला असेल
(४) जर त्यांचा मृत्यू झाला असेल.

वरील कारणांनी सभापतींचे पद रिक्त होऊ शकते. सभापतींविरुद्धचा ठराव मांडला जाणार आहे अशी पूर्वसूचना किमान १४ दिवस आधी द्यावी लागते. असा ठराव मांडला जात असताना सभापती सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषवू शकत नाही. मात्र त्यांना सभागृहात भाषण करता येते आणि सभागृहाच्या कामकाजात भागदेखील घेता येतो. सभापतींचे वेतन व भत्ते निश्‍चित असते. एकदा निश्‍चित केलेले वेतन व भत्ते सभापतींच्या कार्यकाळात कमी केले जात नाही.

## ४.२.३ सभापतींचे अधिकार व कार्ये

(१) सभागृहाचे अध्यक्षस्थान भूषविणे व कामकाजाचे नियम, उपनियम तयार करणे.
(२) सभागृहाची शिस्त व सन्मान यांची हमी देणे.
(३) संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविणे.
(४) सभागृहामध्ये विधेयक सादर करणे, प्रश्न विचारणे, ठराव मांडणे, चर्चेचा प्रस्ताव मांडणे, दुरुस्त्या, लक्षवेधी सूचना व कामकाज तहकुबीची सूचना मांडणे याला सभापतींची औपचारिक संमती आवश्यक आहे.
(५) राष्ट्रीय हितासाठी कोणत्या प्रश्नांना अग्रक्रम द्यायचा हे सभापती ठरवितात व सभागृहातील प्रत्येक वक्तव्य सभापतींना उद्देशून केले जाते.
(६) लोकसभा सदस्यांना इंग्रजी अथवा हिंदी भाषा येत नसल्यास सभागृहामध्ये आपल्या मातृभाषेतून बोलण्याची परवानगी देणे.
(७) एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास स्वत:चे निर्णायक मत देणे.

(८) सभागृहाचे कामकाज सुरू करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गणपूर्तीची शहानिशा करणे. गणपूर्ती नसल्यास सभागृहाचे कामकाज तहकूब करणे.

(९) लोकसभेच्या सर्व समित्यांच्या सभापतींच्या नियुक्त्या करून त्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवून लोकसभेच्या कामकाजात मध्यवर्ती भूमिका पार पाडणे.

लोकसभेची प्रतिष्ठा आणि गौरव सभापतींवरच अवलंबून असते. त्या अनुषंगाने पुढील प्रकारे कार्य पार पाडतो. लोकसभा सभापतींची विस्तारलेली भूमिका व्यापक असल्याने सभापतींच्या बदलणाऱ्या भूमिकांमध्ये महत्त्वाची बाब म्हणजे सरकार आणि विरोधक यांच्यात दुव्याची भूमिका, अंतिम अधिसत्ता, विचारल्या जाणाऱ्या विविध प्रश्नांवर नियंत्रण ठेवणारे पद आहे. ती सभापती म्हणून आपली भूमिका पार पडतो.

## ४.२.४ लोकसभेचे अधिकार व कार्ये

संसदीय शासन प्रणालीमध्ये कायदेमंडळाचे लोकनियुक्त गृह हे लोकांच्या सार्वभौमत्व प्रतिनिधित्व करणारे गृह असते. त्यामुळे जनतेचे प्रश्न, इच्छा-आकांक्षा आणि समस्या यावर विचारविनिमय करून ते सोडविण्याचा प्रयत्न करत असते. त्यासाठी कायदे करणे, कायद्यात बदल करणे, शासनाच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे तसेच शासनासाठी आवश्यक असणाऱ्या कायद्यांची निर्मिती करणे यांसारखी कार्ये लोकसभेला करावी लागतात. लोकसभेचे अधिकार व कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### (१) कायदेविषयक अधिकार

देशाच्या शासन व प्रशासनासंबंधी आवश्यक असणारे नवीन कायदे तयार करणे, जुन्या कायद्यात दुरुस्त्या करणे किंवा ते रद्द करणे हा कायदेविषयक अधिकार संसदेचा अविभाज्य घटक म्हणून लोकसभेला आहे. केंद्रसूचीतील १००, समवर्तीसूचीतील ५२ आणि शेष अधिकारावर कायदे करण्याचा अधिकार लोकसभेला असतो. शिवाय या सूचीत जे विषय नाहीत, त्यासंबंधी कायदे करण्याचा अधिकार लोकसभेला आहे. एखाद्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू असल्यास किंवा राज्यघटनेने २/३ बहुमताने ठराव संमत करून राज्यसूचीतील विषयावर कायदा करण्याचा अधिकार लोकसभेला प्राप्त होतो. लोकसभेने संमत केलेल्या विधेयकांचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी राज्यसभा व राष्ट्रपतींची संमती आवश्यक असते.

सर्वसाधारणतः सर्व विधेयक लोकसभेत मांडले जातात, परंतु विधेयके राज्यसभेत मांडून त्यांनी ते मंजूर केलेले असल्यास ते लोकसभेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येते. लोकसभेने मंजूर केल्यानंतर त्यांचे रूपांतर कायद्यात करण्यासाठी राष्ट्रपतींकडे पाठविले जाते. लोकसभेने संमत केलेले विधेयक राज्यसभेच्या संमतीसाठी पाठवले जाते. या विधेयकाला संमत करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राज्यसभेला असतो. जेव्हा राज्यसभा नकार देते तेव्हा दोन्ही सभागृहांतील मतभेद सोडविण्यासाठी राष्ट्रपती संसदेचे संयुक्त अधिवेशन बोलवितात. लोकसभेची सदस्यसंख्या जास्त असल्याने त्यांचाच मतदान प्रक्रियेत विजय होतो. वरील माहिती लक्षात घेतल्यास आपण असे म्हणू शकतो की, लोकसभेला कायदेविषयक व्यापक अधिकार प्राप्त झालेले आहेत.

### (२) अर्थविषयक अधिकार

संसदीय शासनप्रणालीत लोकांचे प्रतिनिधित्व करण्याऱ्या सभागृहाला खरा आर्थिक अधिकार प्राप्त होतो. भारतात तो लोकसभेला प्राप्त झाला आहे. अर्थविषयक विधेयक किंवा धन विधेयक प्रथम सभागृहात मांडण्याचा अधिकार लोकसभेलाच असतो. धनविधेयकात शासनाच्या उत्पन्न व खर्चासंबंधी नवीन कर लावणे अथवा जुने कर रद्द करण्यासंबंधी संचित निधी व आकस्मित निधीतील खर्चासंबंधीचे अंदाज असतात, म्हणून त्याला अंदाजपत्रक म्हणूनही ओळखले जाते. या अंदाजपत्रकाला लोकसभेची संमती असल्याशिवाय शासनाला एक पैसादेखील खर्च करता येत नाही किंवा कोणत्याही मार्गाने कर वसूल करता येत नाही. यामुळे लोकसभेचा हा अधिकार महत्त्वाचा ठरतो.

लोकसभेने संमत केलेले अंदाजपत्रक राज्यसभेच्या संमतीसाठी पाठविले जाते. या अंदाजपत्रकीय विधेयकाला १४ दिवस रोखून धरणे एवढाच अधिकार राज्यसभेला असतो. १४ दिवसांत ते विधेयक राज्यसभेने परत पाठविले नाही तर ते संमत झाले असे गृहीत धरून लोकसभा राष्ट्रपतींच्या संमतीला पाठविते. शासनाने केलेल्या खर्चाचा हिशोब व त्याची कायदेशीरता तपासणे आणि देशाच्या सर्व आर्थिक बाबींवर नियंत्रण करणे हा अधिकार लोकसभेला असतो.

## (३) शासनविषयक अधिकार

लोकसभेचे प्रशासकीय अधिकार म्हणजे शासन यंत्रणेवर कशा पद्धतीने नियंत्रण ठेवते, यासंबंधीचे कामकाज होय. लोकसभा सदस्य वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करून शासन कार्यावर नियंत्रण ठेवते. यासाठी पुढील मार्गाचा अवलंब केला जातो.

(१) मंत्रीमंडळातील मंत्र्यांना त्यांच्या खात्यातील धोरण व कामकाजासंबंधी प्रश्न व उपप्रश्न विचारणे या प्रश्नांची उत्तरे देणे मंत्र्यांवर बंधनकारक असते.

(२) एखाद्या महत्त्वपूर्ण प्रश्नावर चर्चा घडवून आणण्यासाठी 'काम रोको प्रस्ताव' मांडणे. शासन व जनता यांचे लक्ष एखाद्या प्रश्नाकडे केंद्रित करणे हा याचा उद्देश असतो.

(३) प्रशासकीय घटनेसंबंधी खुलासा मागविणे, याचा उद्देश सरकारची भूमिका जाणून घेण्याचा असतो.

(४) सरकारच्या अनावश्यक खर्चाला प्रतिबंध करण्यासाठी कपात सूचना मांडणे, अंदाजपत्रकीय मागण्या मंजूर करताना विरोधी कपात सूचना मांडतात.

(५) राष्ट्रपतींच्या अभिभाषण ठरावावरील चर्चेच्या वेळी शासनाच्या धोरणातील चुका निदर्शनास आणणे व धन्यवाद ठरावाला असंमती दर्शविणे.

(६) मंत्र्यांच्या बेकायदेशीर कृत्यांबद्दल त्यांच्यावर किंवा संपूर्ण मंत्रीमंडळावर निंदा-व्यंजक ठराव मांडणे. हा ठराव पास झाल्यास मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

(७) शासनाचे चुकीचे धोरण व अयोग्य कार्यपद्धतीवर टीका करणे, आवश्यकता भासल्यास अविश्वासाचा ठराव मांडणे, हा ठराव मंजूर झाल्यावर मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

## (४) घटनादुरुस्ती संबंधीचा अधिकार

केंद्र शासनाला बदलत्या परिस्थितीनुसार शासन व प्रशासनात बदल करावे लागतात. लोकसभा संसदेतील महत्त्वाचा घटक असल्याने घटनादुरुस्ती विधेयक एकूण २/३ बहुमताने संमत करून राज्यसभेच्या संमतीसाठी पाठविणे तसेच राज्यसभेने संमत करून आपल्याकडे पाठविलेल्या घटनादुरुस्ती विधेयकात दुरुस्ती सुचविणे, त्याला संमती अथवा नकार दर्शविणे हा अधिकार लोकसभेला असतो.

लोकसभा आणि राज्यसभा या दोन सभागृहांत घटना दुरुस्ती विधेयकावर मतभेद निर्माण झाले असतील तर ते विधेयक तेथेच सोडून द्यावे लागते. कारण या विधेयकावर दोन्ही सभागृहाचे संयुक्त अधिवेशन बोलवण्याची तरतूद घटनेत नाही. उदा. श्रीमती इंदिरा गांधींनी २४ वी घटनादुरुस्ती लोकसभेत मंजूर करून घेतली होती. पण राज्यसभेत ही घटनादुरुस्ती अमान्य झाली. संसदेने संमत केलेल्या घटनादुरुस्ती विधेयकाला राष्ट्रपतींची संमती आवश्यक असते.

## (५) निर्वाचनविषयक अधिकार

निर्वाचनविषयक अधिकारांत लोकसभेला निवडणुका घेण्याचा अधिकार नाही. राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निर्वाचन मंडळात त्यांचा समावेश असल्यामुळे राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीत भाग घेण्याचा म्हणजेच त्यांना मतदान करण्याचा अधिकार लोकसभेच्या सभासदांना असतो. याशिवाय सभापती व उपसभापतीला मतदान करण्याचा अधिकार लोकसभेच्या सदस्यांना असतो.

## (६) महाभियोग संबंधीचा अधिकार

देशातील महत्त्वाच्या शासकीय पदावरील व्यक्तींवर महाभियोग खटला १/४ बहुमताने सभागृहात मांडण्याचा व २/३ बहुमताने संमत करून राज्यसभेकडे संमतीसाठी पाठविण्याचा अधिकार लोकसभेला आहे. देशातील राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, निर्वाचन आयोग व संघलोकसेवा आयोगाचे अध्यक्ष यांसारख्या महत्त्वपूर्ण व्यक्तींना पदावरून दूर करण्यासंबंधी महाभियोगाचा ठराव मांडण्याचा अधिकार लोकसभेला आहे. तो ठराव संमत करण्याचा किंवा राज्यसभेने मांडलेल्या महाभियोग खटल्याची चौकशी करून त्याला संमती देण्याचा अथवा नकार देण्याचा अधिकार लोकसभेला आहे. महाभियोग ठरावाला संसदेच्या दोन्ही सभागृहांची संमती आवश्यक आहे.

### (७) न्यायविषयक अधिकार

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, उच्च न्यायालायाचे न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि इतर वरिष्ठ आणि महत्त्वाच्या व्यक्तींविरुद्ध न्यायनिवाडा करण्याचे अधिकार लोकसभेला आहेत. दोन्ही सभागृहापैकी सभागृह एक आरोप ठेवतो व दुसऱ्या सभागृह त्यासंबंधी विचार-विनिमय करते. ठराव बहुमताने मान्य झाल्यास संबंधित व्यक्तीला पदावरून बडतर्फ केले जाते.

### (८) इतर अधिकार

राज्यघटनेतील कलम १२३ नुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या वटहुकूमाला मान्यता अथवा नकार देणे.

(अ) राज्यघटनेतील कलम ३५२, ३५६ व ३६० नुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या अणीबाणीच्या ठरावाला ६० दिवसांत संमती अथवा नकार देणे.

(आ) राज्यघटनेतील कलम १६९ नुसार एखाद्या घटक राज्याच्या मागणीवरून नवीन विधानपरिषद निर्माण करणे अथवा विधानपरिषद रद्द करणे.

(इ) लोकसभेच्या कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या स्थायी किंवा अस्थायी स्वरूपाच्या समित्यांची निर्मिती करणे.

(ई) नवीन घटकराज्यांची निर्मिती, राज्यांच्या नावात बदल व सीमा बदलांसंबंधी राज्याकडून आलेल्या विधेयकांना संमती अथवा नकार देणे इत्यादी.

## ४.२.५ संसदीय समित्या

समितीमधील सर्व सदस्यांची निवड संसदेच्या सदस्यांमधून केली त्या समित्यांना संसदीय समित्या असे म्हणतात. म्हणजे संसदीय समितीचे सदस्य हे लोकसभा व राज्यसभा सभागृहाचे सदस्य असतात.

### (१) संसदीय समित्यांचे प्रकार

संसदीय समित्या दोन प्रकारच्या असतात. त्यामध्ये तदर्थ/अस्थायी समित्या व स्थायी समित्यांचा समावेश होतो.

#### (अ) तदर्थ/अस्थायी समित्या

अस्थायी समित्यांची निर्मिती संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या अध्यक्षांकडून केली जाते. समितीने आपला अहवाल दिला की, समिती संपुष्टात येते. म्हणून अशा समित्यांना हंगामी/अस्थायी समित्या म्हटले जाते.

#### (आ) स्थायी समित्या

स्थायी समित्यांची निर्मिती निश्चित कालावधीकरिता करण्यात येते. त्या कालावधीत समितीला कार्ये करून आपला अहवाल सादर करावा लागतो. उदा. सार्वजनिक लेखा समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, सार्वजनिक अंदाज समिती, इत्यादी.

ज्या संसदीय समितीमध्ये संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य असतात अशा स्थायी समितीला संयुक्त संसदीय समिती म्हटले जाते.

संसदेच्या एकूण ४५ संसदीय समित्यांपैकी २४ समित्या ह्या संयुक्त समित्या आहेत, तर उर्वरित समित्यांमध्ये लोकसभेच्या सदस्यांच्या १२ समित्या आणि केवळ राज्यसभेच्या सदस्यांच्या ९ समित्या आहेत.

सर्व २४ संयुक्त समित्यांमध्ये एकूण सदस्य समान असून प्रत्येक संयुक्त समितीमध्ये एकूण ४५ सदस्य असून त्यात ३० सदस्य लोकसभेचे, तर १५ सदस्य राज्यसभेचे असतात.

२४ संयुक्त समित्यांपैकी १७ समित्या ह्या विविध खात्यांशी संबंधित असतात, तर उर्वरित ७ समित्या ह्या पुढील विषयाशी संबंधित असतात.

सार्वजनिक लेखा समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समिती, महिला सबलीकरण समिती, लाभांच्या पदासंबंधी संयुक्त समिती, संसद सदस्यांचे वेतन व भत्त्यांसंबंधी संयुक्त समिती, ग्रंथालय समिती

**(इ) राज्यसभा सदस्य असलेल्या ९ समित्या**

कामकाज सल्लागार समिती, नियम समिती, सामान्य प्रयोजन समिती, विशेषाधिकार समिती, याचिका समिती, सरकारी आश्वासन समिती, अधिनस्थ विधी विधानसंबंधी समिती, सभा पटलावर ठेवलेल्या पत्रासंबंधी समिती, आवास समिती.

**(ई) लोकसभा सदस्य असलेल्या १२ समित्या**

कामकाज सल्लागार समिती, नियम समिती, सामान्य प्रयोजन समिती, विशेषाधिकार समिती, याचिका समिती, सरकारी आश्वासन समिती, अधिनस्थ विधी विधानसंबंधी समिती, सभा पटलावर ठेवलेल्या पत्रासंबंधी समिती, आवास समिती, अंदाज समिती, सभागृहात अनुपस्थित असलेल्या सदस्यांसंबंधी समिती, गैरसरकारी सदस्यांच्या विधेयकासंबंधी व ठरावासंबंधी समिती.

थोडक्यात, लोकसभा व राज्यसभा सभागृहामध्ये ९ समित्या दोन्ही सभागृहात सारख्या/समान असून फक्त लोकसभा सभागृहात तीन समित्या ह्या जास्तीच्या आहेत.

## ४.२.६ घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशनिहाय लोकसभा मतदारसंघ किंवा सदस्यसंख्या

| अ.क्र. | घटकराज्य व केंद्रशासित प्रदेश | एकूण जागा |
|---|---|---|
| (०१) | आंध्रप्रदेश | २५ |
| (०२) | अरुणाचल प्रदेश | ०२ |
| (०३) | आसाम | १४ |
| (०४) | बिहार | ४० |
| (०५) | छत्तीसगड | ११ |
| (०६) | गोवा | ०२ |
| (०७) | गुजरात | २६ |
| (०८) | हरियाणा | १० |
| (०९) | हिमाचल प्रदेश | ०४ |
| (१०) | झारखंड | १४ |
| (११) | कर्नाटक | २८ |
| (१२) | केरळ | २० |
| (१३) | मध्यप्रदेश | २९ |
| (१४) | महाराष्ट्र | ४८ |
| (१५) | मणिपूर | ०२ |
| (१६) | मेघालय | ०२ |
| (१७) | मिझोराम | ०१ |
| (१८) | नागालँड | ०१ |
| (१९) | ओडिशा | २१ |
| (२०) | पंजाब | १३ |
| (२१) | राजस्थान | २५ |
| (२२) | सिक्किम | ०१ |
| (२३) | तामीळनाडू | ३९ |
| (२४) | तेलंगणा | १७ |
| (२५) | त्रिपूरा | ०२ |
| (२६) | उत्तरप्रदेश | ८० |
| (२७) | उत्तराखंड | ०५ |
| (२८) | पश्चिम बंगाल | ४२ |
| (१) | दिल्ली | ०७ |
| (२) | पुडुचेरी | ०१ |

| | | |
|---|---|---|
| (३) | चंदीगड | ०१ |
| (४) | अंदमान निकोबार | ०१ |
| (५) | दादर व नगर हवेली आणि दमन व दीव | |
| (६) | लक्षद्वीप | ०१ |
| (७) | जम्मू व काश्मिर | ०५ |
| (८) | लडाख | ०१ |
| | राष्ट्रपती नियुक्त | ०२ |
| | **एकूण** | **५४५** |

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) लोकसभा सभागृहाची सदस्यसंख्या जास्तीतजास्त किती असते?

(२) लोकसभेच्या कामकाजासाठी गणसंख्या किती असावी लागते?

(३) लोकसभेच्या सदस्य म्हणून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारास किती अनामत रक्कम जमा करावी लागते?

(४) लोकसभेचे अधिकार व कार्य सांगा?

(५) लोकसभेचे अधिवेशन कोण बोलावू शकतो?

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

(१) **ॲंग्लो इंडियन :** लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ॲंग्लो इंडियन समाजाचे प्रतिनिधी निवडणून न आल्यास या समाजाचे प्रतिनिधित्त्व लोकसभेत असावे यासाठी राष्ट्रपतींद्वारा नियुक्त करण्यात येत होते.

(२) **स्पीकर :** लोकसभेच्या अध्यक्षांनाच स्पीकर असे म्हणतात. म्हणून त्यांना मराठीत आपण सभापती या नावने ओळखतो.

(३) **धनविधेयक :** शासनाच्या उत्पन्न व खर्चासंबंधी नवीन कर लावणे, जुने कर रद्द करणे, इत्यादी अधिकारांसंबंधीचे दस्ताऐवज होय.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) ५५२

(२) १/१० (एक दशांश)

(३) खुला - २५,०००/- एस.सी./एस.टी.साठी १२,५००/-

(४) कायदेविषयक अधिकार, अर्थविषयक अधिकार, शासनविषयक अधिकार, घटनादुरुस्तीविषयक अधिकार, निवार्चनविषयक, महाभियोगासंबंधी, न्यायविषयक अधिकार

(५) राष्ट्रपती

## ४.५ सारांश

या घटकामध्ये आपण लोकसभा या सभागृहाची रचना तसेच लोकसभेचे सभापती व उपसभापती यांचे अधिकार व कार्य, लोकसभेचे अधिकार आणि कार्य, संसदीय समित्या तसेच घटकराज्य व केंद्रशासित प्रदेशनिहाय लोकसभा सदस्य संख्या, इत्यादींचा अभ्यास केला. यावरून आपणास लोकसेवा या सभागृहाचे महत्त्व व स्थान स्पष्ट होते. लोकसभा हे सभागृह जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह असल्यामुळे त्यास लोकनियुक्त सभागृह असे म्हणतात. ब्रिटिश तथा कॅनडाच्या कॅम्पस सभागृहाच्या आधारावरच या सभागृहाची निर्मिती झालेली आहे. संसदीय शासन पद्धतीमध्ये लोकसभा या सभागृहास व्यापक व अधिक अधिकार देण्यात आले आहेत. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या पक्षाला बहुमत असते त्याच पक्षाचा नेता पंतप्रधानपदी विराजमान होतो व त्यांचा विश्वास असेपर्यंत सत्तेवर असतो. म्हणूनच हे लोकसभा सभागृह राज्यसभेच्या तुलनेत अधिक व्यापक व शक्तीशाली असल्याचे दिसून येते.

भारतात संसदेच्या दोन सभागृहांपैकी लोकसभा हे सभागृह अधिक लोकप्रिय आहे. कारण याची निर्मितीचा आधार जनता आहे. लोकसभेतील सदस्य जनतेद्वारे निवडून येत असल्यामुळे लोकसभेचे कायदेविषयक, अर्थविषयक व शासनविषयक नियंत्रणाच्या बाबतीत वर्चस्व दिसून येते. यासंदर्भात एम.पी. शर्मा म्हणतात की, जर संसद देशाचे सर्वोच्च अंग आहे तर लोकसभा हे संसदेचे सर्वोच्च अंग आहे. यावरून लोकसभेचे स्थान लक्षात येते. परंतु राज्यसभा हे वरिष्ठ व द्वितीय सभागृह असल्याने त्यांचे महत्त्वसुद्धा नाकारता येत नाही.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) लोकसभेचे इतर कार्ये सांगा.

(२) लोकसभा सभापतींचे अधिकार व कार्ये लिहा.

(३) लोकसभेचे अधिकार व कार्ये लिहा.

(४) लोकसभेची रचना व सदस्य यावर टिप लिहा.

(५) लोकसभा सदस्यांची पात्रता सांगा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) बंग के. आर., (२०११) *भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया,* औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स

(२) जोशी सुधाकर, (२०१२) *भारतीय शासन आणि राजकारण*, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स

(३) वीर गौतम, (२००८) *भारतीय प्रशासनिक व्यवस्था*, नागपूर, विश्वभारती प्रकाशन

(४) वाघमारे श्यामसुंदर, गजभारे सुरेश (२००८) *भारतीय प्रशासनाची रूपरेषा*, लातूर, राजमुद्रा प्रकाशन

# घटक ५ : पंतप्रधान व मंत्रीमंडळ

*अनुक्रमणिका*


५.० उद्दिष्टे
५.१ प्रास्ताविक
५.२ विषय-विवेचन
    ५.२.१ पंतप्रधान
    ५.२.२ पंतप्रधानांचे अधिकार व कार्ये
    ५.२.३ पंतप्रधानांचे स्थान व भूमिका
    ५.२.४ प्रधानमंत्री कार्यालय (पी.एम.ओ.)
    ५.२.५ मंत्रीमंडळ पद्धतीची वैशिष्ट्ये
    ५.२.६ केंद्रीय मंत्रीमंडळाची संरचना
    ५.२.७ केंद्रीय मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्य
    ५.२.८ मंत्रिपरिषद/मंत्रीमंडळ व कॅबिनेटमधील फरक
५.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
५.५ सारांश
५.६ सरावासाठी स्वाध्याय
५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ५.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस,

- पंतप्रधानाचे अधिकार व कार्याची व्याप्ती लक्षात येईल.
- मंत्रीमंडळाची निर्मिती व खातेवाटप प्रक्रिया समजेल.
- पंतप्रधानाचे स्थान व दर्जा यासंबंधी माहिती मिळेल.
- मंत्रीमंडळाची आवश्यकता सांगता येईल.
- मंत्र्यांचे प्रकार सांगता येतील.

## ५.१ प्रास्ताविक

भारतामध्ये संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. संसदीय शासनव्यवस्थेत पंतप्रधान हे पद केंद्रबिंदू असल्यामुळे संघराज्य प्रशासनातील त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेमध्ये वास्तविक सत्ताप्रमुख म्हणून पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळ कामकाज पाहते. ४२व्या घटनादुरुस्तीने मंत्रीमंडळाचा सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक करण्यात आल्यामुळे व पंतप्रधान मंत्रीमंडळाचे प्रमुख असल्यामुळे तो खरे वास्तविक कार्यकारी प्रमुख

म्हणून ओळखले जातात. कायदेमंडळाने तयार केलेल्या ध्येयधोरणांची व कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मंत्रीमंडळाचीच असते. लोकसभेचा विश्वास असेपर्यंतच मंत्रीमंडळ सत्तेवर राहते. संपूर्ण खात्याची जबाबदारी विविध मंत्र्यांमध्ये विभागून देऊन त्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पंतप्रधान पार पाडतात. भारतामध्ये इंग्लंडसारख्या संसदीय शासनप्रणालीचा अवलंब केला आहे, परंतु भारतातील पंतप्रधानांचे पद इंग्लंडसारखे योगायोग आणि विवेकबुद्धीचे अपत्य नाही. या पदाची निर्मिती भारतीय राज्यघटनेच्या कलम ७४ नुसार झाली आहे. यासाठी मंत्रीमंडळाची सामुदायिक जबाबदारी आणि पंतप्रधानांची मंत्रीमंडळातील विशेष भूमिका या गोष्टी आपण पाहणार आहोत.

## ५.२ विषय–विवेचन

### ५.२.१ पंतप्रधान

#### (१) पंतप्रधान पदाची पात्रता

(अ) व्यक्ती भारताचा नागरिक असावी.

(आ) वयाची २५ वर्षे पूर्ण केलेली असावी.

(इ) संसदेने वेळोवेळी ठरविलेल्या अटी त्यांनी पूर्ण केलेल्या असाव्यात.

(ई) ती व्यक्ती लोकसभा किंबा राज्यसभा या दोन्हीपैकी एका सभागृहाची सदस्य असावी. नसल्यास सहा महिन्यांच्या आत संसदेच्या दोन्ही सभागृहांपैकी एका सभागृहाचे सदस्यत्व प्राप्त करणे आवश्यक आहे.

#### (२) पंतप्रधानांची निवड व नियुक्ती

पंतप्रधानाची निवड प्रत्यक्ष मतदान पद्धतीने होते. पंतप्रधान होणारी व्यक्ती पंतप्रधान म्हणून निवडून येत नाही. तर केवळ लोकसभेचा किंवा राज्यसभेचा सभासद म्हणून निवडून येते. त्यानंतर लोकसभेतील ज्या पक्षाला बहुमत मिळते त्या पक्षाचा नेता पंतप्रधान बनतो. राज्यघटनेतील कलम ७५ (१) नुसार पंतप्रधानांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून केली जाते. राष्ट्रपतींनी पंतप्रधानांची निवड कशी करावी हे मात्र घटनेत स्पष्ट करण्यात आलेले नाही. त्यामुळे पक्ष पुढाऱ्यांची पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली जाते. लोकसभेतील बहुमतवाल्या पक्षाचा पक्षपुढारी कोण हेसुद्धा राष्ट्रपती ठरवू शकत नाही. कारण बहुमतवाल्या पक्षाचा पुढारी कोण हे त्या पक्षाकडून ठरविले जाते. पक्षपुढाऱ्याचे नाव राष्ट्रपतींना कळविले जाते आणि त्याची राष्ट्रपतींकडून पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली जाते. पंतप्रधान हा संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाचा सभासद असलाच पाहिजे असेही राज्यघटनेत स्पष्ट करण्यात आलेले नाही; परंतु राजकीय संकेतानुसार तो संसदेचा व त्यातल्या त्यात लोकसभेचा सभासद असावा लागतो.

#### (३) शपथ

पंतप्रधानांना आपल्या कार्याची व गोपनीयतेची शपथ राष्ट्रपती देतात. पंतप्रधानांना मात्र पंतप्रधान या नात्याने वेगळी शपथ न देता केवळ केंद्रीय मंत्री म्हणूनच शपथ दिली जाते.

#### (४) कार्यकाळ

पंतप्रधानांचा कार्यकाळ अनिश्चित स्वरूपाचा असतो. लोकसभेचा विश्वास असेपर्यंत पंतप्रधान व त्यांचे मंत्रीमंडळ यांना राष्ट्रपती काढू शकत नाही. याचाच अर्थ असा की, मंत्रीमंडळ जास्तीतजास्त पाच वर्षांपर्यंत अधिकार पदावर राहील. संसदीय शासन पद्धतीमध्ये संपूर्ण मंत्रीमंडळ लोकसभेचा विश्वास असेपर्यंत अधिकार पदावर राहू शकते. लोकसभेत जर मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव मंजूर केला तर पंतप्रधानांसहित संपूर्ण मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. पंतप्रधानांच्या विरोधात अविश्वासाचा ठराव मांडण्यापूर्वी ५० संसद सदस्यांच्या शिफारशीनेच हा प्रस्ताव मांडला जातो व लोकसभा या सभागृहामध्ये पंतप्रधानास बहुमत न मिळाल्यास त्यांना पंतप्रधानपद सोडावे लागते.

#### (५) पगार व भत्ते

पंतप्रधानांचे पगार व भत्ते संसदेद्वारे, कायद्याद्वारे वेळोवेळी निश्चित केले जातात. पंतप्रधानांना संसदेच्या सदस्याइतकाच

पगार व भत्ते प्राप्त होतात. त्याव्यतिरिक्त, त्यांना खाजगी खर्च, भत्ता, मोफत निवास, प्रवास भत्ता, वैद्यकीय भत्ता, इत्यादी सुविधा प्राप्त होतात. २०१९च्या बदलानुसार सध्या पंतप्रधानांना दरमहा २,८०,०००/- रुपये पगार प्राप्त होतो.

## ५.२.२ पंतप्रधानांचे अधिकार व कार्य

संसदीय शासन प्रणालीत पंतप्रधान हा वास्तविक शासक किंवा कार्यकारी प्रमुख म्हणून कार्य करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय पंतप्रधानांविषयी आपले मत व्यक्त करताना असे म्हटले आहे की, भारतीय घटनेने निर्माण केलेल्या एखाद्या पदाधिकाऱ्याची तुलना करायची असेल तर ती केवळ अमेरिकन राष्ट्राध्यक्षाशीच करता येईल. यावरून भारताच्या पंतप्रधानाचे वास्तविक स्वरूप लक्षात येते. यावरून पंतप्रधानांचे कार्ये व अधिकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### (०१) मंत्रीमंडळाची निर्मिती

पंतप्रधान हा मंत्रीमंडळरूपी कमानीचा प्रमुख स्तंभ आणि मंत्रीमंडळाचा प्रमुख असल्यामुळे मंत्रीमंडळाची निर्मिती करण्याची वास्तविक जबाबदारी तोच पार पाडतो. घटनात्मक दृष्ट्या मंत्रीमंडळाची नेमणूक राष्ट्रपती करतो. असे म्हटले असले तरी लोकसभेत बहुमत धारण करणाऱ्या पक्षाच्या नेत्याची पंतप्रधानपदी नेमणूक राष्ट्रपती करतो आणि पंतप्रधानाने सुचविलेल्या व्यक्तींचीच राष्ट्रपती मंत्रीमंडळात सदस्य म्हणून नेमणूक करतो. मंत्रीमंडळाचा कार्यकाळ हा पंतप्रधानांच्या विश्वासावर अवलंबून असतो. आपल्या विरोधी वर्तन करण्याऱ्या मंत्र्याला तो केव्हाही राजीनामा द्यायला सांगू शकतो. शिवाय पंतप्रधानाचा राजीनामा हा सर्व मंत्रीमंडळाचा राजीनामा मानला जातो. प्रधानमंत्री अशा विरोधी वर्तन करणाऱ्या मंत्र्याकडे त्यागपत्र मागू शकतो. त्याने त्यागपत्र न दिल्यास राष्ट्रपतींना विनंती करून त्याची मंत्रीमंडळातून हकालपट्टी पंतप्रधानच करतो. उदा. श्री. के. डी. मालवीय, श्री. जगन्नाथ पहाडिया, डॉ. राम सुभगसिंग, श्री. टी.टी. कृष्णम्माचारी, श्री. श्यामप्रसाद मुखर्जी यांनी पंतप्रधानांशी झालेल्या मतभेदामुळेच राजीनामे दिले होते.

### (०२) मंत्रीमंडळाचे खातेवाटप

शासनाच्या सोयीसाठी खाते किंवा विभागाची निर्मिती करून मंत्र्यांमध्ये खातेवाटप करण्याचे कार्य पंतप्रधान करीत असतो. खातेवाटप करण्यापूर्वी कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री अशा मंत्र्यांच्या श्रेणी व मंत्र्यांची संख्या निश्चित करण्याचे कार्य पंतप्रधानांना करावे लागते. कॅबिनेट मंत्र्याकडे प्रथम दर्जाची तर राज्यमंत्र्याकडे दुय्यम दर्जाची, खाती दिली जातात. उपमंत्र्यांना स्वतंत्र खाते नसतात. ते केवळ राज्यमंत्र्यांना मदत करीत असतात. खातेवाटपाबरोबर खातेबदल करण्याचा अथवा एखाद्या मंत्र्याकडून खाते काढून घेण्याचा अधिकार पंतप्रधानांना असतो.

### (०३) मंत्रीमंडळाचा अध्यक्ष

पंतप्रधान मंत्रीमंडळाचा अध्यक्ष असतो. मंत्रीमंडळात कोणते विषय चर्चेला घ्यावयाचे हे तो ठरवितो. शासनाच्या सुव्यवस्थित कारभारासाठी मंत्र्याकडे विविध कार्य सोपविण्याचे अधिकार त्यांनाच असतात. कोणत्या मंत्र्याकडे कोणते खाते सोपवावे हे पंतप्रधान ठरवितात. मंत्रीमंडळाचा विस्तार करण्याचा अधिकार त्यांनाच असतो. मंत्रीमंडळाच्या सर्व बैठकांचे अध्यक्षस्थान ते भूषवितात. मंत्रीमंडळ सदस्यांत निर्माण झालेले मतभेद दूर करणे यासारखी अनेक कार्ये अध्यक्ष म्हणून पंतप्रधानांना करावी लागतात. थोडक्यात भारताच्या संसदीय शासन पद्धतीत मंत्रीमंडळ हेच वास्तविक कार्यकारी आहेत आणि पंतप्रधान हा मंत्रीमंडळाचा प्रमुख असतो. या नात्याने पंतप्रधानांना केंद्र शासनाचे धोरण निश्चित करण्याचा व घोषणा करण्याचा अधिकार असतो.

### (०४) पक्षाचा नेता

पंतप्रधान हा संसदेतील सत्तारूढ पक्षाचा नेता असतो. आपल्या पक्षाने निश्चित केलेली ध्येयधोरणे व जनतेला दिलेली आश्वासने अमलात आणण्याचे कार्य त्यांना करावे लागते. पक्षात अनुशासन निर्माण करणे व निवडणूक काळात आपल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी तसेच पक्षाची ध्येयधोरणे लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जाहीर सभा घेण्याचे कार्य पंतप्रधानांना करावे लागते. खरे पाहिले असता सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आकर्षणाचा केंद्रबिंदू तेच असतात. पक्षसंघटनेची बांधणी मजबूत ठेवण्यासाठी पंतप्रधान सर्वस्वी जबाबदारी स्वीकारतात आणि त्या दृष्टीने कार्य करतात. पक्ष स्थिरावला तरच पंतप्रधान स्थिरावू शकतात, हे सूत्र ओळखून त्यांच्या पक्षासंबंधीच्या हालचाली होत असतात.

### (०५) संसद नेता

पंतप्रधान हा लोकसभेतील बहुमत प्राप्त करणाऱ्या पक्षाचा नेता असतो. शासनाचा वास्तविक प्रमुख म्हणून लोकसभेतील व राज्यसभेतील सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांना द्यावी लागतात. शासकीय ध्येयधोरणांना राज्यसभेचा पाठिंबा मिळविण्यासाठी राज्यसभेत जावे लागते. त्यामुळे ते संसदेचा नेता ठरतात. संसदेचा नेता म्हणून संसदेचे अधिवेशन बोलावणे, तहकूब करणे, स्थगिती करणे, लोकसभेचे विसर्जन करणे यासंबंधी राष्ट्रपतींना सल्ला देण्याचे आणि संसदीय कामकाजासंबंधी सभापतींना मदत व सहकार्य करण्याचे कार्य पंतप्रधानांना करावे लागते. थोडक्यात असे म्हणता येईल की, पंतप्रधान भारतीय कायदेमंडळाचे नेतृत्व करतात आणि कायदेमंडळावर आपले अधिकार चालवतात.

### (०६) राष्ट्रपती व मंत्रीमंडळातील दुवा

पंतप्रधान हा राष्ट्रपती आणि मंत्रीमंडळ यांना जोडणारा मुख्य दुवा असतो. राज्यघटनेतील कलम ७४ नुसार राष्ट्रपतींना सल्ला देणे व मदत करण्यासाठी मंत्रीमंडळात असतात. मंत्रीमंडळाच्या कोणत्याही सदस्याला वैयक्तिक राष्ट्रपतींना भेटता येत नाही. यामुळे मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाची माहिती राष्ट्रपतींना देणे आणि राष्ट्रपतींनी मंत्रीमंडळाला केलेल्या सूचना किंवा संदेश मंत्रीमंडळापर्यंत पोहोचविणे ही मध्यस्थाची भूमिका त्यांना पार पाडावी लागते. म्हणून पंतप्रधानांना राष्ट्रपती व मंत्रीमंडळ यांना जोडणारा दुवा म्हणून ओळखले जाते.

### (०७) नेमणुकासंबंधी सल्ला

प्रशासन कार्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण असे प्रशासकीय आणि राजकीय अधिकारी राष्ट्रपती नेमतात, परंतु अशी नेमणूक पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसारच राष्ट्रपती करतात. सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, घटकराज्याचे राज्यपाल, निर्वाचन आयोग, संघलोकसेवा आयोग, वित्त आयोग यांचे अध्यक्ष व सदस्य, महान्यायवादी, महालेखापरीक्षक, राजदूत, वाणिज्यदूत, संरक्षक दलाचे प्रमुख अशा सर्व महत्त्वाच्या नेमणुका पंतप्रधानांच्या सूचनेवरूनच राष्ट्रपतींना कराव्या लागतात.

### (०८) धोरण निर्धारण

पंतप्रधान हे वास्तविक कार्यकारी प्रमुख असल्यामुळे राष्ट्रीय व परराष्ट्रीय धोरण निश्चित करण्याचे कार्य त्यांना करावे लागते. देशाअंतर्गत राष्ट्रीय  धोरण निश्चित करताना देशाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व भौगोलिक विकासाला प्राधान्य देणे तसेच परराष्ट्रीय धोरण ठरविताना मैत्रीपूर्ण शांतता व सहकार्याला ते अग्रक्रम देत असतात. परराष्ट्राबरोबर सर्व व्यवहार नियंत्रण करतात. परराष्ट्राबरोबरचे युद्ध, तह, करार, वाटाघाटी, इ.संबंधी त्यांना अधिकार प्राप्त झालेले असतात. देशाचा विकास, चांगले धोरण निश्चित व यशस्वी अंमलबजावणी यावर अवलंबून असल्याने यासंदर्भात पंतप्रधानाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. ते मंत्रीमंडळाच्या सहकार्याने पार पाडतात.

### (०९) शासन विभागातील समन्वय

शासनाचे कार्ये अनेक खाते व विभागांतून चालत असते. प्रत्येक मंत्री आपल्या खात्याप्रती पंतप्रधान आणि लोकसभेला जबाबदार असतो. मंत्रीमंडळाचा प्रमुख व लोकसभेप्रती मंत्रीमंडळाची सामूहिक जबाबदारी आणि शासनाचा वास्तविक प्रमुख म्हणून शासन कार्यात योग्य समन्वय निर्माण करणे, खाते, विभागांना निर्देशन व मार्गदर्शन करणे, खात्यात किंवा खातेप्रमुखात निर्माण झालेले मतभेद मिटविणे, इत्यादी महत्त्वपूर्ण कार्य पंतप्रधानाला करावी लागतात.

### (१०) राष्ट्रीय संरक्षण व परराष्ट्र धोरण ठरविणे

देशात कायदा व सुव्यवस्था निर्माण करणे  आणि अंतर्गत व परकीय शत्रूंपासून देशाचे संरक्षण करणे ही घटनात्मक जबाबदारी राष्ट्राध्यक्षांची असली तरी प्रत्यक्षात पंतप्रधानांनाच ती पार पाडावी लागतात. राष्ट्रपतींना मिळालेल्या सर्व संकटकालीन अधिकारांचा वापर पंतप्रधानच करीत असतात. त्याबरोबर देशाचे परराष्ट्र धोरण प्रधानमंत्री यांनाच ठरवावे लागते.

## ५.२.३ पंतप्रधानांचे स्थान व भूमिका

पंतप्रधानांचे सर्व अधिकार आणि कार्ये यावर नजर टाकल्यास असे लक्षात येते की, भारताच्या पंतप्रधानाचे पद भारतीय शासनव्यवस्थेत अद्वितीय असे बनलेले आहे. देशाच्या अनेक धोरणाच्या निर्णयांचा तो उद्गाता आहे. देशातील प्रशासकीय व्यवस्थेचा तो मुख्य निर्देशक आहे. देशातील राजव्यवस्था त्यांच्या नावानेच ओळखली जाते. उदा. नेहरूंची राजवट, इंदिरा

गांधींची राजवट, इत्यादींवरून देशाच्या राज्यकारभाराचा गाडा चालविणारा तो चालक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंत्रीमंडळरूपी कमानीचा आधारभूत मध्यशीला म्हणून पंतप्रधानाचा उल्लेख केला होता. भारतीय शासनव्यवस्थेतील त्यांचे स्थान स्पष्ट करण्यासाठी विविध विचारवंतांनी त्यांना उपमा दिल्या आहेत. प्रधानमंत्री यांचे स्थान व भूमिका पुढील बाबींतून स्पष्ट करता येते.

**(१) नेतृत्व करणे**

प्रधानमंत्री यांना देशाचे, जनतेचे, पक्षाचे, मंत्रीमंडळाचे, संसदेचे योजना (नीती) आरोग्य, राष्ट्रीय विकास परिषद, आंतरराज्यीय परिषद, राष्ट्रीय सुरक्षा परिषद अशा विविध घटकांचे नेतृत्व करावे लागते. त्या अनुषंगाने इतर देश व आंतरराष्ट्रीय संघटनेच्या बैठकांना उपस्थित राहून देशाचे नेतृत्व करावे लागते.

**(२) मंत्रीमंडळाचा निर्माता व नष्टकर्ता**

प्रधानमंत्री हे मंत्रीमंडळाची निर्मिती करीत असतात तसेच मंत्र्यांना खातेवाटप करून त्यांच्याकडून कार्ये करून घेत असतात. तसेच अकार्यक्षम व मतभेद झाल्यास संबंधित मंत्र्यांना काढून टाकू शकतात आणि प्रधानमंत्री यांचा स्वत:चा राजीनामा म्हणजे पूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा समजला जात असल्याने प्रधानमंत्री हे मंत्रीमंडळाचे निर्माता व नष्टकर्ता या दोन्ही भूमिका अदा करू शकतात.

**(३) मार्गदर्शक व नियंत्रक**

प्रधानमंत्री यांना मार्गदर्शकाची भूमिका अदा करावी लागते. त्यासाठी त्यांना मंत्रीमंडळ, स्वत:चा राजकीय पक्ष, विविध प्रशासकीय विभागांत संसदेला योजना आयोग, राष्ट्रीय विकास परिषद आणि आवश्यकतेनुसार जनतेला मार्गदर्शन करावे लागते. तसेच ह्या सर्व यंत्रणांवर नियंत्रणसुद्धा ठेवावे लागते.

**(४) समन्वयक व सल्लागार**

प्रधानमंत्री यांना राष्ट्रपती व मंत्रीमंडळ यांच्यात समन्वय किंवा दुवा म्हणून कार्ये करावे लागते, तसेच राष्ट्रपतींना आवश्यक तेव्हा सल्ला देण्याचे कार्य करावे लागते. त्याशिवाय मंत्र्यांना, राज्य सरकारांना आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांना सल्ला द्यावा लागतो.

**(५) ध्येयधोरण व कल्याणकारी योजना ठरविणे**

देशाच्या परराष्ट्र धोरणासह इतर बाबींचे विविध धोरणे ठरविणे ही जबाबदारी प्रधानमंत्री यांना करावी लागते. विशेषत: परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार/निर्माते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. याशिवाय देशात विविध कल्याणकारी योजना ठरविणे किंवा जाहीर करण्याची जबाबदारी प्रधानमंत्री यांच्याकडेच असते.

## ५.२.४ प्रधानमंत्री कार्यालय (पी.एम.ओ.)

भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी गव्हर्नर जनरल यांच्या मदतीकरिता एक कार्यकारी परिषद होती. त्या परिषदेला १५ ऑगस्ट १९४७ रोजी पंडित नेहरू यांनी वैयक्तिक सचिवालयात रूपांतरित केले. तेव्हापासून ते प्रधानमंत्री सचिवालय म्हणून ओळखण्यात येत होते. पण १९७७ मध्ये मोरारजी देसाई यांनी त्यांचे नाव प्रधानमंत्री कार्यालय असे केले. भारतात प्रधानमंत्री यांच्याप्रमाणेच प्रधानमंत्री कार्यालयास शासन व प्रशासनात विशेष महत्त्व आहे.

**(१) रचना**

प्रधानमंत्री कार्यालयाचे राजकीय प्रमुख हे प्रधानमंत्री असतात. तसेच एक राज्यमंत्री व उपमंत्री यांना मदत करीत असतात, तर प्रशासकीय प्रमुखाची जबाबदारी प्रधान सचिवांकडे असते. प्रधान सचिवाला मदत करण्यासाठी अतिरिक्त सचिव, तीन ते चार संयुक्त सचिव व संचालक, एक विशेष अधिकारी याशिवाय इतर आवश्यक अधिकारी व कर्मचारी ह्या कार्यालयात कार्यरत असतात.

**(२) कार्ये**

(अ) प्रधानमंत्री यांचे आदेश, सूचना ह्या मंत्रीमंडळ सचिवालय विविध केंद्रीय मंत्रालये व राज्य सरकारांना पाठविणे.

(आ) राज्यपाल, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, विदेशी प्रतिनिधी यांच्याशी प्रधानमंत्री यांच्या वतीने संपर्क साधणे.

(इ) प्रधानमंत्री यांचे विदेश दौरे, कार्यक्रम, देशातील दौरे व कार्यक्रम ठरविणे.

(ई) प्रधानमंत्री यांच्याकडे येणारे विदेशी व देशी पाहुणे यांचे स्वागत करणे, त्यांच्या भोजन व निवासाची व्यवस्था करणे.

(उ) जनतेकडून आलेल्या तक्रारी/सूचना स्वीकारणे व त्या सोडविण्यासाठी प्रधानमंत्री यांना मदत करणे व त्यांच्या वतीने जनतेला उत्तर देणे.

(ऊ) प्रधानमंत्री यांचे महत्त्वपूर्ण भाषणे तयार करणे तसेच राष्ट्रीय व राज्यातील प्रशासकीय व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी प्रधानमंत्री यांना मदत करणे.

(ए) शासन व प्रशासनावरील प्रमुखांच्या व इतर सदस्यांच्या नेमणुकीबाबत प्रधानमंत्री यांना मदत करणे किंवा सल्ला देणे.

(ऐ) योजना (नीती) आयोग व इतर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संघटनेचे प्रमुख म्हणून यांना त्यांच्या कार्यात मदत करणे.

(ओ) प्रशासकीय सुधारणा व सार्वजनिक धोरणे व कार्यक्रम ठरविताना मदत करणे.

(औ) देशात येणारे महापूर, भूकंप, दुष्काळ, रोगराई अशा संकटकाळात प्रधानमंत्री मदतनिधीतून मदत करणे व त्यांचा हिशोब ठेवणे.

## ५.२.५ मंत्रीमंडळ (मंत्रीपरिषद) पद्धतीची वैशिष्ट्ये

भारतात मंत्रीमंडळ/मंत्रीपरिषद पद्धत ही इंग्लंडकडून घेतलेली आहे. संसदीय किंवा मंत्रीमंडळ पद्धतीमध्ये राष्ट्रप्रमुख हे घटनात्मक प्रमुख असतात व सर्व राज्यकारभार त्यांच्या नावानेच चालतो व हा राज्यकारभार चालविण्यासाठी प्रधानमंत्री प्रमुख असलेले एक मंत्रीमंडळ असते. विशेष म्हणजे प्रधानमंत्री हेच वास्तवादी प्रमुख असतात. भारतात १९४६ साली अंतरिम सरकार स्थापन झाले व पहिल्यांदा मंत्रीमंडळ निर्माण होऊन १९४७मध्ये पंडित नेहरू पहिले प्रधानमंत्री बनले. अशा महत्त्वपूर्ण व शक्तिशाली मंत्रीमंडळ पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

### (१) सर्व सत्ता राष्ट्रप्रमुखाच्या नावाने चालते

मंत्रीमंडळाने घेतलेले सर्व निर्णय हे राष्ट्रप्रमुखांच्या वतीने घेतले जातात. कारण ते घटनात्मक असतात. राष्ट्रप्रमुख हे मंत्रीमंडळामध्ये भाग घेत नसतात, परंतु मंत्रीमंडळाने घेतलेले सर्व निर्णय राष्ट्रप्रमुखाला/राष्ट्रपतींना सांगावे/कळवावे लागतात. थोडक्यात मंत्रीमंडळाचे प्रमुख प्रधानमंत्री असले तरी त्यांना राष्ट्रपतींच्या वतीने व नावाने कारभार करावा लागतो.

### (२) कायदेमंडळाला (लोकसभेला) जबाबदार

मंत्रीमंडळ हे कायदेमंडळ (लोकसभेला) सामूहिकपणे जबाबदार असते. लोकसभेत/कायदेमंडळात मंत्र्यांना/मंत्रीमंडळाला प्रश्न विचारले जातात. दुसरे महत्त्वाचे तत्त्व म्हणजे कायदेमंडळाचा पाठिंबा असेपर्यंत मंत्री किंवा सर्व मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. कायदेमंडळाचा अविश्वास म्हणजे मंत्रीमंडळाला सत्ता सोडावी लागते.

### (३) प्रधानमंत्र्यांचे नेतृत्व

मंत्रीमंडळ हे राष्ट्रप्रमुख/राष्ट्रपतींच्या नावाने चालत असले तरी खरी सत्ता प्रधानमंत्री यांची असते. मंत्रीमंडळाचे नेतृत्व हे प्रधानमंत्री करीत असतात. त्यांच्या सल्ल्यानुसार सर्व मंत्र्यांची नेमणूक, खातेवाटप व त्यांची बरखास्ती होत असते. त्याचबरोबर सर्व मंत्र्यांना मार्गदर्शनसुद्धा प्रधानमंत्रीच करीत असतात. थोडक्यात प्रधानमंत्री हे मंत्रीमंडळाचे कर्णधार असतात.

### (४) गोपनियता/गुप्तता

मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेले निर्णय, विचारविनिमय, प्रधानमंत्री जाहीर करेपर्यंत त्यावर बाहेर जाहीर चर्चा करता येत नाही. म्हणजेच गोपनियता/गुप्तता हे मंत्रीमंडळ पद्धतीचे खास लक्षण आहे. त्यासाठी मंत्रीमंडळाच्या प्रत्येक सदस्य मंत्र्यांना पद आणि गोपनियता शपथ दिली जाते.

### (५) एकवाक्यता

मंत्रीमंडळाचे निर्णय हे सर्वानुमते घेतले जातात. मंत्रीमंडळातील सर्वच मंत्री आपल्या विभागाचे/खात्याचे निर्णय घेतात. त्यावर मंत्रीमंडळात चर्चा होते व प्रधानमंत्री अंतिम निर्णय घेत असतात, ते सर्वांना मान्य करावे लागतात. सर्वांसाठी एक व एकासाठी सर्व या तत्त्वानुसार एकवाक्यता हे मंत्रीमंडळाचे वैशिष्ट्ये असते.

### (६) कायदेमंडळ व मंत्रीपरिषद यांचे घनिष्ठ संबंध

मंत्रीमंडळाची निर्मिती कादेमंडळाच्या सदस्यांमधून होत असते, तसेच मंत्रीमंडळाविरुद्ध कायदेमंडळात अविश्वास मांडता येतो. थोडक्यात कायदेमंडळाचा विश्वास असेपर्यंतच मंत्रीमंडळ सत्तेवर राहू शकते. कारण ते कायदेमंडळालाच जबाबदार असते. या सर्व बाबींवरून कायदेमंडळ व मंत्रीमंडळ यांची घनिष्ठता स्पष्ट होते.

### (७) सामूहिकता

मंत्रीमंडळ पद्धतीमध्ये सामूहिकता तत्त्वाला विशेष महत्त्व असते. मंत्रीमंडळ हे सामूहिकरित्या कायदेमंडळाला जबाबदार असते, तसेच एका मंत्र्याचा निर्णय म्हणजे सर्व मंत्रीमंडळाचा निर्णय मानला जातो. एका मंत्र्याविरुद्ध अविश्वास ठराव पास झाल्यास तो सर्व मंत्रीमंडळाला लागू होतो, तसेच मंत्रीमंडळातील सर्व निर्णय हेसुद्धा सामुहिकरित्या घेतले जातात. विशेष म्हणजे प्रधानमंत्री यांचा राजीनामा म्हणजे सर्व मंत्रीमंडळ बरखास्त होते. अशाप्रकारे सामूहिक जबाबदारी व सामूहिक निर्णय यातून सामूहिकता दिसून येते.

### (८) तीन श्रेणीचे/प्रकारचे मंत्री

मंत्रीमंडळात तीन श्रेणीचे किंवा तीन प्रकारचे मंत्री असतात. त्यामध्ये कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री ह्या तीन मंत्र्यांचा समावेश असतो. मंत्रीमंडळाचा आकार किंवा मंत्र्यांची संख्या ठरविण्याचा अधिकार मात्र प्रधानमंत्री यांचा असतो. थोडक्यात मंत्रीमंडळातील मंत्र्यांची संख्या कितीही असली तरी तीन श्रेणीचे/तीन प्रकारचे मंत्री असतात.

थोडक्यात, आपणास असे म्हणता येईल की, पक्षाचा नेता, संसदेचा नेता, कॅबिनेट नेता, मंत्रीमंडळाचा नेता, शासनाचा नेता व देशाचा नेता म्हणून पंतप्रधानांना असामान्य नेतृत्वाचे पद भूषविण्याचा मान व अधिकार प्राप्त होतो.

## ५.२.६ केंद्रीय मंत्रीमंडळाची संरचना

भारतातील संसदीय शासन पद्धतीत राष्ट्रपती हा नाममात्र कार्यकारी आहे. राज्यकारभार जरी राष्ट्रपतींच्या नावाने चालत असला तरी खरे निर्णय पंतप्रधान व मंत्रीमंडळच घेत असतात. पंतप्रधान व मंत्र्यांनी दिलेला सल्ला हा राष्ट्रपतींना बंधनकारक असतो. त्यामुळे सर्व अधिकार पंतप्रधान व मंत्रीमंडळाकडूनच वापरले जातात. राज्यघटनेच्या कलम ७४, ७५ व ७८ मध्ये केंद्रीय मंत्रीमंडळासंबंधीचे वर्णन केलेले आहे. राज्यघटनेतील कलम ७४ मध्ये स्पष्ट केलेले आहे की, भारताच्या राष्ट्रपतींना मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांचे नेतृत्व असलेले एक मंत्रीमंडळ असेल.

### (१) मंत्रीमंडळाची निर्मिती

मंत्रीमंडळाची निर्मिती दोन प्रसंगी केली जाते. पहिला प्रसंग म्हणजे लोकसभेच्या सार्वजनिक निवडणुकीनंतर नवीन मंत्रीमंडळ निर्माण करावे लागते आणि दुसरा प्रसंग म्हणजे अस्तित्वात असलेल्या मंत्रीमंडळाने राजीनामा दिला असेल तर अशावेळेस नवीन मंत्रीमंडळ निर्माण करावे लागते. मंत्रीमंडळ निर्माण करण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. प्रथम पंतप्रधानाची निवड व नेमणूक केली जाते. पंतप्रधानांची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. पंतप्रधानांची निवड लोकसभेतील बहुमतवाल्या पक्षाकडून केली जाते. त्यानंतर पंतप्रधान आपल्या मंत्रीमंडळातील सभासदांची एक यादी तयार करतात. ती राष्ट्रपतींना सादर करतात. त्यानुसार राष्ट्रपती मंत्रीमंडळाची निवड करतो. मंत्रीमंडळाच्या सभासदाची नेमणूक करताना ते बहुमतवाल्या पक्षाचे आहेत किंवा नाही आणि त्या संसदेचे सभासद आहे किंवा नाही याचा विचार केला जातो. अर्थात तसेच असेल तरच मंत्री म्हणून नेमणूक होते असे नाही. संसदेचे सभासद नसले तरी मंत्री म्हणून नेमणूक होऊ शकते, परंतु अशा मंत्र्यांना सहा महिन्यांच्या आत संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाचे सभासदत्व प्राप्त करावे लागते. अन्यथा मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागतो.

### (२) सदस्यांची पात्रता

(अ) सदर व्यक्ती भारताचा नागरिक असावी.

(आ) वयाची २५ वर्ष पूर्ण केलेली असावी.

(इ) ती व्यक्ती भारत सरकारच्या कोणत्याही लाभाच्या पदावर असू नये.

(ई) ती व्यक्ती लोकसभा व राज्यसभा या दोन्हीपैकी एका सभागृहाची सदस्य असावी. संसदेने वेळोवेळी विहित केलेल्या अटी त्याने पूर्ण केलेल्या असाव्यात.

### (३) नेमणूक

पंतप्रधानांच्या सल्ल्याने भारताचे राष्ट्रपती कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री अशा सर्व मंत्र्यांची नेमणूक करतात.

### (४) शपथ

केंद्रीय मंत्रीमंडळातील सर्व मंत्र्यांना आपल्या कार्याची व गोपनीयतेची शपथ भारताचे राष्ट्रपती देतात.

### (५) कार्यकाळ

राज्यघटनेमध्ये मंत्रीमंडळाचा कार्यकाळ निश्चित करण्यात आलेला नाही. राज्यघटनेतील कलम ७५ नुसार संपूर्ण मंत्रीमंडळाचा कार्यकाळ लोकसभेच्या इच्छेवर अवलंबून असतो. कारण राज्यघटनेतील तरतुदीनुसार संपूर्ण मंत्रीमंडळ लोकसभेला जबाबदार असते आणि लोकसभेचा विश्वास असेपर्यंत अधिकार पदावर राहतात.

### (६) राजीनामा

सर्व केंद्रीय मंत्री आपला राजीनामा भारताच्या राष्ट्रपतींकडे देतात. पंतप्रधानांचा राजीनामा म्हणजेच संपूर्ण मंत्रीमंडळाचा राजीनामा ग्राह्य धरला जातो.

### (७) मंत्र्यांचे प्रकार

संसदीय शासनातील मंत्रीमंडळामध्ये तीन प्रकारचे मंत्री आहेत.

#### (अ) कॅबिनेट मंत्री

कॅबिनेट मंत्री हे प्रथम दर्जाचे मंत्री असतात. यांच्याकडे सर्वांत महत्त्वाची व स्वतंत्र कार्यभार असलेली खाती असतात. पंतप्रधान अनुभवी, ज्येष्ठ, हुशार आणि आपल्या विश्वासातील व्यक्तींना कॅबिनेट मंत्रीपद देतो. या मंत्र्याकडे गृह, संरक्षण, परराष्ट्र, अर्थ अशी महत्त्वाची खाती दिली जातात. कॅबिनेट मंत्र्यांच्या बैठकीचा अध्यक्ष पंतप्रधान असतात. या मंत्र्यांची संख्या ३५ इतकी असते.

#### (आ) राज्यमंत्री

राज्यमंत्री दुसऱ्या दर्जाचे मंत्री असतात. राज्यमंत्र्यांना मंत्रालयाचा/विभागाचा स्वतंत्र कार्यभार दिला जाऊ शकतो किंवा कॅबिनेट मंत्र्याला सहायक म्हणून नेमले जाते. सहायक म्हणून नेमलेल्या त्या मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या विभागाचा कार्यभार त्यांच्याकडे दिला जातो. यात मंत्र्यांची संख्या २० ते २२ इतकी असते.

#### (इ) उपमंत्री

उपमंत्री हे तिसऱ्या दर्जाचे मंत्री असतात. मंत्रीमंडळातील शेवटच्या दर्जाचे मंत्री म्हणून ओळखले जाते. त्यांना कोणतेही स्वतंत्र खाते सोपविले जात नाही. राज्यमंत्र्यांना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी उपमंत्र्याची नेमणूक केली जाते. उपमंत्र्यांची संख्या १५ ते २० इतकी असते. शिवाय बिनखात्याचे मंत्री क्वचित प्रसंगी पंतप्रधानाच्या सल्ल्याने नेमले जातात. मंत्र्यांना व पंतप्रधानांना साहाय्य करण्यासाठी अशा मंत्र्यांची पद निर्मिती केल्या जाते. पंडित नेहरू यांच्या मंत्रीमंडळामध्ये लाल बहादूर शास्त्री बिनखात्याचे मंत्री होते. संसदीय सचिव हा अजून एक मंत्र्याचा प्रकार आहे. ते उपमंत्र्यासारखे मंत्री असतात. ते ज्येष्ठ मंत्र्यांना त्यांच्या संसदीय कामकाजात मदत करण्याचे कार्य करतात. मात्र १९६७ नंतर राजीव गांधी सरकारचा थोडा काळ वगळता अशा संसदीय सचिवांची नेमणूक करण्यात आलेली नाही.

## ५.२.७ केंद्रीय मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्ये

भारताच्या संसदीय शासन पद्धतीत मंत्रीमंडळाला पुढील व्यापक स्वरूपाचे आणि महत्त्वाचे अधिकार आहेत.

### (०१) राष्ट्रपतींना सल्ला देणे व मदत करणे

राष्ट्रपतींना सल्ला व मदत करण्यासाठी मंत्रीमंडळ असल्याने मंत्रीमंडळाचे पहिले कार्ये हे त्यांना सल्ला व मदत करण्याचे असते. राष्ट्रपतींनी मागितलेली माहिती व सल्ला देणे, त्यांच्या सूचनांचे पालन व मंत्रीमंडळाने घेतलेले निर्णय प्रधानमंत्री यांच्यामार्फत राष्ट्रपतींना कळविण्याचे कार्य मंत्रीमंडळाला करावे लागते.

## (०२) प्रशासनविषयक कार्य/प्रशासनाचे संचालन करणे

मंत्रीमंडळातील प्रत्येक मंत्र्याकडे एक विभाग/मंत्रालय असतो, त्या विभागाचे प्रशासन चालविणे, त्यांना सुचना देणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे, प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भरती, प्रशिक्षण, बढती, वेतन, सेवानिवृत्ती, इत्यादी निर्णय घेण्याचे कार्य मंत्रीमंडळाकडून केले जाते.

## (०३) विधीविषयक कार्ये

कायदे करण्यासाठी संसद/कायदेमंडळ असते. संबंधित खात्याचा मंत्री किंवा कायदेमंत्री हे कायद्याचे विधेयक संसदेत मांडतात. त्यासाठी विधेयकाचा कच्चा मसुदा तयार करणे, ते विधेयक संसदेत मांडून त्यावर चर्चा घडवून आणणे व ते मंजूर करून घेणे किंवा एखाद्या विषयावर अध्यादेश/वटहुकूम काढण्याची जबाबदारी मंत्रीमंडळाकडेच असते.

## (०४) वित्तीय कार्ये/अर्थविषयक कार्ये

प्रत्येक वर्षी देशाचा अर्थसंकल्प तयार करून तो संसदेला सादर करणे व तो मंजूर करून घेण्याचे कार्ये मंत्रीमंडळाला करावे लागते. अर्थमंत्र्याला हे प्रत्यक्ष कार्य करावे लागत असले तरी प्रत्येक खात्याचा अर्थसंकल्प किंवा आपली पैशाची मागणी व खर्चाची माहिती प्रत्येक मंत्र्याला द्यावी लागते. सर्व विभागाच्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजाच्या एकत्रीकरणातून देशाचा अर्थसंकल्प बनतो व हे सर्व कार्ये मंत्रीमंडळाला करावे लागते.

## (०५) नियुक्ती किंवा नेमणुकीविषयक कार्ये

राष्ट्रपतींना ज्या महत्त्वाच्या नेमणुका करण्याचा अधिकार आहे ज्यामध्ये राज्यपाल, लोकसभा व राज्यसभेतील नियुक्त सदस्य, सेनापती, विविध आयोगाचे अध्यक्ष व सदस्य इत्यादींचा समावेश होतो हे सर्व प्रधानमंत्री व मंत्रीमंडळाच करावे लागते किंवा त्यांच्याकडून केले जाते.

## (०६) देशाचे विविध धोरण ठरविणे

प्रत्यक्षात मंत्रीमंडळ हे धोरण ठरविणारी सर्वोच यंत्रणा आहे. देशाच्या विविध सार्वजनिक धोरणांमध्ये परराष्ट्र धोरण, औद्योगिक धोरण, आर्थिक धोरण, शैक्षणिक धोरण, संरक्षण धोरण, कृषी धोरण, क्रीडा धोरण, इत्यादी धोरणांची निश्चिती करणे, त्या अनुषंगाने विविध समित्या/आयोग नेमणे, त्याशिवाय विविध कल्याणकारी योजना/कार्यक्रमाची घोषणा करण्याचे कार्य मंत्रीमंडळाला करावे लागते.

## (०७) समन्वयाचे कार्ये

शासन व प्रशासनामध्ये तसेच केंद्र व राज्य, विविध मंत्रालये, विविध राष्ट्रीय संस्था व राज्य सरकारे, संसद, कार्यकारी मंडळ व न्यायपालिका यांच्यातील वाद, मतभेद, गैरसमज व समस्या दूर करून त्यांच्यामध्ये परस्पर समन्वय निर्माण करण्याची जबाबदारी प्रधानमंत्री व मंत्रीमंडळाची असते.

## (०८) विकासात्मक कार्ये

देशाचा सर्वांगीण विकास करण्याची अंतिम जबाबदारी ही केंद्र सरकार पर्यायाने केंद्रीय मंत्रीमंडळाची असल्याने देशातील गरिबी, बेरोजगारी, महागाई, गुन्हेगारी, दारिद्र्य, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, इत्यादी समस्यांचा अभ्यास करून त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना करण्याचे कार्ये मंत्रीमंडळालाच करावे लागते.

## (०९) नियंत्रणाचे कार्ये

देशातील शासन व प्रशासन यावर नियंत्रण ठेवणे, देशातील विघातक संघटना/कृत्ये, शेजारी राष्ट्रांच्या हालचाली, इत्यादी बाबींवर नियंत्रण ठेवणे/नजर किंवा देखरेख ठेवण्याचे कार्ये मंत्रीमंडळामार्फत केले जाते.

## (१०) तक्रार निवारण व अनुकूल जनमत निर्माण करणे

शासन व प्रशासन यांच्याबद्दलच्या जनतेच्या तक्रारी जाणून घेणे, त्या सोडविणे तसेच शासन, प्रशासन व मंत्रीमंडळांकडून जनतेच्या अपेक्षा, सूचना मागविणे व त्यावर विचार करणे, याशिवाय जनतेशी सतत संपर्क ठेवून त्यांना सरकारच्या कामाची/कार्याची माहिती देऊन अनुकूल असे जनमत निर्माण करण्याचे कार्ये मंत्रीमंडळाला करावे लागते. कारण कोणतेही शासन जनतेच्या पाठिंब्याशिवाय जास्त काळ सत्तेवर राहू शकत नाही किंवा पुन्हा सत्तेवर येऊ शकत नाही.

## ५.२.८ मंत्रीपरिषद आणि कॅबिनेटमधील फरक

मंत्रीपरिषद किंवा मंत्रीमंडळ आणि कॅबिनेटमध्ये फरक आहे. कॅबिनेट हा शब्द कबाल (Cabal) शब्दापासून बनला असून त्यांचा शब्दकोषांनुसार अर्थ हा गुप्त राजकीय परिस्थिती, गुप्त राजकीय समूह असा आहे. मंत्रीपरिषदेला Council of Ministers हा इंग्रजी शब्द वापरला जातो. मंत्रिपरिषद व कॅबिनेट ह्या समान/सारख्या नसून त्यामध्ये फरक असून तो पुढीलप्रमाणे आहे.

| **मंत्रिपरिषद** | **कॅबिनेट** |
| --- | --- |
| (१) मंत्रीपरिषदेत सर्व मंत्र्यांचा समावेश होतो. | (१) कॅबिनेटमध्ये फक्त कॅबिनेट मंत्र्यांचा समावेश होतो. |
| (२) मंत्रीपरिषदेचा आकार तुलनेने मोठा असतो. | (२) कॅबिनेटचा आकार तुलनेने लहान असतो. |
| (३) सर्व मंत्री मंत्रिपरिषदेच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. | (३) फक्त कॅबिनेट मंत्रीच कॅबिनेटच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. |
| (४) मंत्रीपरिषदेमध्ये कॅबिनेटचा समावेश होतो. | (४) कॅबिनेटमध्ये मंत्रीपरिषदेचा समावेश होत नाही. |
| (५) मंत्रीपरिषदेची बैठक केव्हातरी होत असते. | (५) कॅबिनेटची बैठक दर आठवड्याला होत असते. |

### *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**रिकाम्या जागा भरा.**

(१) पंतप्रधानांची नियुक्ती.............. कडून केली जाते.

(२) राज्यघटनेतील................... या कलमानुसार पंतप्रधानांची नियुक्ती केली जाते.

(३) मंत्रीमंडळाचा अध्यक्ष....................असतो.

(४) पंतप्रधान हा ...................व मंत्रीमंडळ यातील दुवा असतो.

(५) पंतप्रधानाचा राजीनामा हा सर्व............ चा राजीनामा मानला जातो.

## ५.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

(१) **संसदीय शासनपद्धत :** या शासन पद्धतीमध्ये राष्ट्रपती हे कार्यकारी व प्रमुख तर पंतप्रधान हे वास्तविक प्रमूख म्हणून कार्य करीत असतात.

(२) **कॅनिनेट मंत्री :** कॅबिनेट मंत्री म्हणजे असे मंत्री की ज्याच्याकडे महत्त्वाची व प्रथम दर्जाची खाते असतात.

(३) **मंत्रिपरिषद :** मंत्रिपरिषदेलाच मंत्रीमंडळेदेखील म्हटले जाते. मंत्रीमंडळात सर्वच मंत्र्यांचा समावेश होतो. त्यामध्ये कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री, इत्यादी

## ५.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) राष्ट्रपती

(२) ७५ (१)

(३) पंतप्रधान

(४) राष्ट्रपती

(५) मंत्रीमंडळ

## ५.५ सारांश

या घटकामध्ये आपण पंतप्रधान पदासाठीची पात्रता, नियुक्ती तसेच त्यांचे अधिकार व कार्याची व्याप्ती, मंत्रीमंडळ निर्मिती व खातेवाटप प्रक्रिया, पंतप्रधानांचे स्थान व दर्जा. पंतप्रधानांचे कार्यालय (PMO) मंत्रीमंडळ पद्धतीची वैशिष्ट्ये, केंद्रीय मंत्रीमंडळाची संरचना, केंद्रीय मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्य, मंत्रीमंडळ व कॅबिनेटमधील फरक, इत्यादींचा अभ्यास केला. यावरून आपणास असे दिसून येते की, पंतप्रधान व मंत्रीमंडळाच्या माध्यमातून संपूर्ण देशाचा राज्यकारभार पार पाडला जातो. संसदीय शासन व्यवस्थेत पंतप्रधान हे पद महत्त्वाचे दिसून येते. त्यामुळेच ते वास्तविक प्रमूख म्हणून कार्य करीत असतात. तसेच पंतप्रधानांच्या कार्यामध्ये मदत करण्यासाठी मंत्रीमंडळ कार्य करीत असते. मंत्रीमंडळाची सामुदायिक जबाबदारी आणि पंतप्रधानांची मंत्रीमंडळातील भूमिका अतिशय महत्त्वाच्या असल्याचे दिसून येते.

भारताच्या संसदीय शासन पद्धतीत मंत्रीमंडळाला महत्त्वाचे आणि श्रेष्ठ दर्जाचे स्थान आहे. कारण मंत्रीमंडळ हेच वास्तविक कार्यकारी मंडळ आहे. केंद्र सरकारची कार्यकारी सत्ता प्रत्यक्षात मंत्रीमंडळाकडूनच वापरली जाते. सत्तेच्या दृष्टीने मंत्रीमंडळ हे राष्ट्रपतींपेक्षा श्रेष्ठ दर्जाचे आहे. कारण राष्ट्रपती हा नाममात्र प्रमुख आहे. तसेच तत्त्वता लोकसभेचे मंत्रीमंडळावर नियंत्रण असले तरी प्रत्यक्षात मंत्रीमंडळच लोकसभेचे नियंत्रण ठेवीत असते. लोकसभेत बहुमताच्या जोरावर विरोधी पक्ष सदस्यांच्या विरोधालाही फारसे महत्त्व राहत नाही. मंत्रीमंडळावर अविश्वास ठराव मंजूर करून मंत्रीमंडळाला पदभ्रष्ट करण्याची पद्धती मान्य करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्षात त्याला महत्त्व नाही. जोपर्यंत सत्तारूढ पक्ष आपल्याच पक्षाच्या मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव आणत नाही आणि विरोधी पक्षाने आणलेला ठराव बहुमताने मंजूर होत नाही.

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) पंतप्रधानांचे अधिकार स्पष्ट करा.
(२) पंतप्रधान पक्षाचा नेता, संसदेचा नेता आहे हे विधान स्पष्ट करा.
(३) पंतप्रधानांची पात्रता व निवड प्रक्रिया स्पष्ट करा.
(३) मंत्र्यांचे प्रकार सांगा.
(४) भारताच्या मंत्रीमंडळाची निर्मिती यावर टिप लिहा.
(५) केंद्रीय मंत्रीमंडळाचे अधिकार, कार्ये लिहा.

## ५.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) चौधरी, रा. अ. (२०१०). *भारताचे संविधान.* पुणे, चौधरी लॉ पब्लिशर्स,
(२) कुलकर्णी, व्ही. गो. (२००४). *भारतीय संविधान : शासन आणि राजकरण.* औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन,
(३) बंग, के. आर. (२०११). *भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया.* औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.
(४) निकम, अ. (संपा. २००५). *भारतीय राज्यघटना व राज्यपद्धती.* औरंगाबाद, नक्षत्र पब्लिशर्स, औरंगपुरा.
(५) पाटील, व्ही. बी. (२०१८). *भारतीय प्रशासन.* पुणे, के. सागर पब्लिकेशन्स.

# घटक ६ : सर्वोच्च न्यायालय

***अनुक्रमणिका***


६.० उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ विषय-विवेचन

 ६.२.१ सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती, आवश्यकता व स्वातंत्र्य

 ६.२.२ सर्वोच्च न्यायालयाची रचना

 ६.२.३ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र

६.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

६.५ सारांश

६.६ सरावासाठी स्वाध्याय

६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ६.0 उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- न्यायालय व न्यायव्यवस्था या संकल्पना स्पष्ट होतील.
- न्यायव्यवस्थेसमोरील खटल्यांचे प्रकार सांगता येतील.
- भारतीय सर्वोच्च न्यायालयाची भूमिका स्पष्ट करता येईल.
- न्यायपालिकेचे स्वातंत्र्य याचा अर्थ सांगता येईल.
- भारतीय न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च न्यायालयाचे स्थान लक्षात येईल.

## ६.१ प्रास्ताविक

लोकशाहीप्रधान देशात न्यायसंस्थेची नितांत आवश्यकता असते. कारण स्वतंत्र निपक्ष आणि निर्भय न्यायव्यवस्थेशिवाय लोकशाहीचे अस्तित्वच असू शकत नाही. न्यायव्यवस्था हा लोकशाहीचा एक आधारस्तंभ आहे. म्हणून जगातील सर्व लोकशाहीप्रधान देश आपापल्या देशात स्वतंत्र आणि निपक्ष अशी न्यायव्यवस्था निर्माण करतात. या न्यायव्यवस्थेवर कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव, राजकीय वर्चस्व असता कामा नये म्हणून राजकीय हस्तक्षेपापासून न्यायव्यवस्थेला अलिप्त ठेवण्याचे कार्य जगातील अनेक देशांनी केलेले आहे. जागतिक पातळीवर ज्या देशांचा न्यायव्यवस्थेचा लौकिक आहे, उदा. अमेरिका, स्वित्झर्लंड त्यात भारताचाही समावेश आहे. भारतीय न्यायव्यवस्थेने आतापर्यंत जे निकाल दिले ते वरील गोष्टीची साक्ष आहे. ही न्यायव्यवस्था अनेक कारणांसाठी निर्माण केली जाते. उदा. नागरिकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी, नागरिकांच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी, दोन राज्यांतील संघर्ष मिटविण्यासाठी, नागरिका-नागरिकांतील संघर्ष मिटविण्यासाठी, फौजदारी आणि सिव्हिल खटल्यात निकाल देण्यासाठी, राज्यघटनेचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी इतकेच नव्हे तर राज्यघटनेचे संवर्धन व

संरक्षण करणे यासाठीदेखील न्यायव्यवस्थेची आवश्यकता आहे. याशिवाय कायदेमंडळाने केलेला एखादा कायदा हा राज्यघटनेशी विसंगत असेल तर अवैध घोषित करण्यासाठी आणि संघराज्याच्या अस्तित्वासाठी देशात न्यायव्यवस्था स्वतंत्र असणे आवश्यक आहे. भारताची न्यायव्यवस्था चार पातळीवर संघटित झालेली आहे. केंद्रस्तरावर सर्वोच्च न्यायालय, राज्य स्तरावर उच्च न्यायालय, जिल्हा स्तरावर जिल्हा न्यायालय आणि तालुका स्तरावर तालुका न्यायालय आहेत. या न्यायव्यवस्थेसमोर खालील प्रकारचे खटले चालतात.

**घटनात्मक खटले**

अशा प्रकारचे खटले की, ज्यामध्ये शासनाच्या एखाद्या निर्णयाचे भारताच्या राज्यघटनेतील कोणत्या तरी एका कलमाला धोका पोहोचत आहे याला घटनात्मक प्रकरण असे म्हणतात. अशी प्रकरणे केवळ उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयातच दाखल करावी लागतात.

**दिवाणी खटले**

मालमत्तेचा वाद असणारे खटले म्हणजे सिव्हिल खटले होत. ही मालमत्ता अनेक प्रकारची असते. उदा. जमिनीच्या वाटणीवरून झालेला वाद, घराच्या वाटणीवरून झालेला वाद किंवा उद्योगांच्या भागीदारीतून झालेला वाद.

**फौजदारी खटले**

या प्रकरणाचा संबंध गुन्ह्याशी आहे. यात प्रामुख्याने खून, मोठ्या प्रमाणात दरोडा, फसवाफसवी, अपहरण यांचा प्रामुख्याने समावेश होतो. हे खटले खालच्या स्तरावरील न्यायालयात चालवता येतात.

# ६.२ विषय-विवेचन

## ६.२.१ सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती, आवश्यकता व स्वातंत्र्य

### (१) न्यायालयाची निर्मिती

भारतीय न्यायव्यवस्थेला जसा ऐतिहासिक वारसा आहे, तशीच ब्रिटिश परंपरादेखील आहे. भारतात पहिल्यांदा ब्रिटिशांनी १८६१च्या कायद्यानुसार १८६२ मध्ये मुंबई, मद्रास, कोलकाता, अलाहाबाद, लाहोर आणि पाटणा या ठिकाणी उच्च न्यायालये स्थापन करण्यात आली होती. या न्यायालयांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध अपील करण्यासाठी इंग्लंडमधील प्रिव्ही कौन्सीलकडे जावे लागत असे. वरील ६ उच्च न्यायालय भारतातील सर्वांत जुनी न्यायालय होत. त्यानंतर क्रमाक्रमाने अनेक उच्च न्यायालय व त्याची खंडपीठे सुरू करण्यात आले. उदा. मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर, औरंगाबाद आणि पणजी ही तीन खंडपीठे आज कार्यरत आहेत. सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती भारतात थोडीशी विलंबाने झाली. इंग्लंडचे प्रिव्ही कौन्सिल हेच मंडळ भारतासाठी सर्वोच्च न्यायालय म्हणून कार्यरत होते. भारतात १९३५ च्या कायद्याने फेडरल कोर्ट किंवा संघ न्यायालयाची तरतूद करण्यात आली, पण ऑक्टोबर, १९३७ रोजी संघ न्यायालयाची स्थापना करण्यात आली व भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संविधानाच्या केंद्रीय न्यायालय ह्या चौथ्या प्रकरणात कलम १२४ ते १४७ तरतुदी केल्यानुसार २६ जाने. १९५० मध्ये स्वतंत्र भारतासाठी सर्वोच्च न्यायालय कार्यरत झाले.

### (२) सर्वोच्च न्यायालयाची आवश्यकता

लोकशाही शासनव्यवस्था असलेल्या कोणत्याही देशात स्वतंत्र सर्वोच्च न्यायालय असणे गरजेचे असते. विशेषत: संघराज्य शासनपद्धती स्वीकारलेल्या देशात तर सर्वोच्च न्यायालयाची गरज महत्त्वाची किंवा मूलभूत गरज आहे. त्यामुळे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाची गरज पुढील बाबींवरून स्पष्ट करता येईल.

**(अ) संघराज्य व्यवस्था**

भारतात संघराज्य व्यवस्था असून त्यासाठी संघराज्य (Federal State) या शब्दाऐवजी राज्याचा संघ (Union of State) हा शब्द भारतीय संविधानामध्ये वापरण्यात आलेला आहे. संघराज्यामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात अधिकारांची विभागणी करण्यात आलेली असल्याने केंद्र सरकार व एक घटक सरकार, केंद्र सरकार व अनेक घटक सरकार,

राज्याराज्यांमध्ये वाद होण्याची शक्यता असते. असे वाद/तंटे सोडविण्यासाठी संघराज्य राज्यव्यवस्थेमध्ये सर्वोच्च न्यायालयाची गरज भासते. कारण असे वाद सर्वोच्च न्यायालय नि:पक्षपणे सोडवू शकते.

### (आ) संविधानाचे पालन व संरक्षण करणे

भारतात देशाचे संविधान अंतिम व सर्वश्रेष्ठ असल्याने देशातील सरकारे भारतीय संविधानानुसार कार्ये करीत आहेत किंवा नाही हे पाहण्याची अंतिम सत्ता सर्वोच्च न्यायालयाकडे असते. विशेषत: भारतीय संविधानातील विविध तरतुदींचा योग्य अर्थ लावणे, संविधानविरोधी कायदे व कृती रद्द करणे. थोडक्यात भारतीय संविधानाचे पालन करून घेणे व संविधानाचे संरक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची आवश्यकता आहे.

### (इ) व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे

लोकशाही व्यवस्थेमध्ये जनता/नागरिक सार्वभौम व सर्वश्रेष्ठ असते. त्यामुळे नागरिकांना काही हक्क देऊन त्यांचा विकास साध्य करावा लागतो. भारतीय संविधानानेदेखील भारतातील प्रत्येक भारतीय नागरिकाला काही मूलभूत हक्क दिले आहेत, परंतु ह्या हक्कांचा वापर/उपभोग घेताना इतर व्यक्ती किंवा शासनाकडून अडथळे/अतिक्रमण होऊ नये किंवा अतिक्रमण झाल्यास ते दूर करून व्यक्तीच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची गरज असते.

## (३) सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य

आज भारतातील हे सर्वोच्च न्यायालय अपक्ष, निर्भय व स्वतंत्र आहे. न्यायालयाला ही अवस्था प्राप्त करून देण्यासाठी घटनाकारांना विशेष प्रयत्न करावे लागले आहेत. त्यासाठी राज्यघटनेत अनेक तरतुदी कराव्या लागल्या आहेत. त्या तरतुदी खालीलप्रमाणे विशद करता येतील.

(अ) सर्वोच्च व उच्च न्यायालयातील सर्व न्यायाधीशांच्या नेमणुका भारताच्या राष्ट्रपतींकडून होतात. घटनाकारांनी जाणीवपूर्वक ही व्यवस्था केलेली आहे. कारण भारताचे राष्ट्रपती हे अपक्ष आहेत. अपक्ष व्यक्तींनी केलेल्या नेमणुका निश्चितच योग्य असतील. म्हणजेच भारतीय संविधानाच्या कलम १२४(१) नुसार सरन्यायाधीश व इतर सर्व न्यायाधीशांच्या नेमणुका कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप न होऊ देता राष्ट्रपतींमार्फत केल्या जातात.

(आ) न्यायाधीशांच्या पात्रता या राज्यघटनेने निश्चित केलेल्या आहेत, तर इतर सनदी सेवकांच्या पात्रता गृह मंत्रालय व केंद्रीय लोकसेवा आयोग निश्चित करते; परंतु न्यायाधीशांच्या पात्रता राज्यघटनेने निश्चित केल्या असल्यामुळे त्या परिदृढ स्वरूपाच्या आहेत.

(इ) न्यायाधीशांच्या नेमणुका या तात्पुरत्या काळासाठी असणार नाहीत तर त्या स्थायी स्वरूपाच्या असतील. त्याद्वारे एक प्रकारची नोकरीची हमी देण्यात आलेली आहे. इतकेच नव्हे तर त्यांचे वेतन संचित निधीतून दिले जाते. त्यावर संसदेलाही चर्चा करण्याचा अधिकार नाही.

(ई) न्यायाधीशांचे वेतन सर्वाधिक असते. आज मुख्य न्यायाधीशांना २,८०,०००/- (२०१९ च्या संसदीय कायद्यानुसार) दरमहा वेतन व इतर न्यायाधीशांना २,५०,०००/- दरमहा वेतन दिले जाते. हे अधिक वेतन देण्याचे कारण म्हणजे न्यायाधीशांसमोर आर्थिक चिंता असता कामा नये किंवा शुल्लक कारणासाठी भ्रष्ट बनता कामा नये.

(उ) सर्वोच्च न्यायालयाला असलेल्या विशेष अधिकारामुळे न्यायालायाच्या निकालावर किंवा न्यायालयाचे न्यायाधीश जो निकाल देतील त्यावर कोणालाही टीका करता येणार नाही. तसेच कलम १४१ नुसार सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय सर्व न्यायालये, सरकार व नागरिकांना मान्य करावे लागतात.

(ऊ) न्यायाधीशांना सहजासहजी त्यांच्या पदावरून बडतर्फही करता येत नाही. त्यासाठी नोकरीची पूर्णपणे हमी देण्यात आली आहे. प्रतिकूल परिस्थितीत जर न्यायाधीशांना बडतर्फ करावयाचे असेल तर त्यासाठी महाभियोगाचा खटला चालववावा लागेल. हा खटला अत्यंत क्लिष्ट अशा प्रकारचा आहे. न्यायाधीशांविरुद्ध प्रथम गंभीर प्रकारचे आरोप लावून आरोपपत्रक सादर करावे लागेल. त्यानंतर हेच आरोपपत्र संसदेच्या दोन्हीही सभागृहात (लोकसभा व राज्यसभा) स्वतंत्रपणे २/३ बहुमताने मंजूर होणे आवश्यक आहे. त्यानंतरच राष्ट्रपती एक अधिघोषणा करून न्यायाधीशांना त्यांच्या पदावरून पदभ्रष्ट करतील. वरील सर्व व्यवस्थेमुळेच भारतीय न्यायव्यवस्था जागतिक पातळीवर मान्यता पावलेली आहे.

(ए) न्यायाधीशांना सेवानिृत्तीनंतर वकिली व्यवसाय करण्यावर बंदी असल्याने न्यायालयाचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा राखली जाते.

(ऐ) सर्वोच्च न्यायालय व अधिनस्थ न्यायालयासाठी स्वतंत्र प्रशासकीय व्यवस्था व स्वतंत्र कर्मचारी वर्ग असून त्यांची नेमणूक करण्याचा पूर्ण अधिकार न्यायालयाला आहे व कर्मचाऱ्याच्या वेतनावरील खर्चसुद्धा संचित निधीतून केला जातो.

(औ) सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय एखाद्या प्रकरणी/विषयी स्वत: खटला चालू शकते, त्यास न्यायालयीन सक्रियता म्हणता येईल.

## ६.२.२ सर्वोच्च न्यायालयाची रचना

### (१) सदस्य संख्या

कलम १२४ अन्वये सर्वोच्च न्यायालयाची स्थापना व संख्या याविषयक तरतूद केली आहे. मूळ घटनेमध्ये सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ८ (एक सरन्यायाधीश व ७ अन्य न्यायाधीश) इतकी ठरविण्यात आली होती. २०१९ च्या बदलानुसार सद्य:स्थितीत सर्वोच्च न्यायालयाचे एक मुख्य न्यायाधीश आणि ३३ इतर न्यायाधीश अशी एकूण ३४ सदस्य संख्या आहे.

| अ.क्र. | वर्ष | न्यायाधीशांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| (१) | १९५० | १ + ७ | ८ |
| (२) | १९५६ | १ + १० | ११ |
| (३) | १९६० | १ + १३ | १४ |
| (४) | १९७८ | १ + १७१ | १८ |
| (५) | १९८६ | १ + २५ | २६ |
| (६) | २००८ | १ + ३० | ३१ |
| (७) | २०१९ | १ + ३३ | ३४ |

### (२) न्यायाधीशांची नेमणूक

भारताचे मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपतींमार्फत होते. अर्थात या नियुक्त्या करताना भारताचे राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश यांचा सल्ला घेऊ शकतो, तर कधीकधी वर्तमान मुख्य न्यायाधीश यांच्याशी सल्लामसलत करून करतात. असे असले तरी ज्येष्ठता न्यायाधीशाची नेमणूक मुख्य न्यायाधीश म्हणून करण्याचा संकेत पाळला जातो.

### (३) न्यायाधीशपदासाठी पात्रता

(अ) संबंधित व्यक्ती भारताचा नागरिक असावा.

(आ) भारतातील कोणत्याही उच्च न्यायालयामध्ये न्यायाधीशपदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.

(इ) उच्च न्यायालयासमोर अधिवक्ता म्हणून वकील म्हणून किमान १० वर्षे काम केलेले असावे.

(ई) राष्ट्रपतींच्या मते ती व्यक्ती निष्णांत कायदेपंडित असावा.

### (४) न्यायाधीशांचा कार्यकाळ

न्यायाधीशांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे निश्चित केल्याने सेवानिवृत्तीपर्यंत ते आपल्या पदावर राहू शकतात. हे निवृत्ती वय जाणीवपूर्वक अधिक ठेवण्यात आले आहे. सेवा निवृत्तीपूर्वी स्वेच्छेने आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा अधिकार न्यायाधीशांना असतो. याशिवाय जर न्यायाधीश गंभीर गुन्ह्यात अडकलेले असतील म्हणजे ते भ्रष्ट झाले असतील किंवा राष्ट्रपतींच्या मते ते मानसिक दृष्ट्या किंवा शारीरिक दृष्ट्या विकलांग झाले असतील तर त्यांना त्यांच्या पदावरून बडतर्फ करण्याचीही व्यवस्था घटनाकारांनी केली आहे.

## (५) बडतर्फ

न्यायाधीशांना बडतर्फ करण्यासाठी त्यांच्याविरुद्ध महाभियोग खटला दाखल करावा लागतो. प्रथम त्यांच्याविरुद्ध संसदेच्या कोणत्याही एका सभागृहाकडून १/४ सभासदांच्या सह्या घेऊन आरोपपत्र सादर करावे लागते. त्यानंतर हे आरोपपत्र स्वतंत्ररित्या लोकसभा आणि राज्यसभेमध्ये २/३ बहुमताने मंजूर करून घ्यावे लागते. त्यानंतर राष्ट्रपती एक अध्यादेश काढून त्यांना त्यांच्या पदावरून बडतर्फ करतील.

## (६) सेवानिवृत्तीनंतर बंधने

न्यायाधीश सेवानिवृत्ती झाल्यानंतर त्यांना इतरत्र दुसरा कोणताही व्यवसाय करता येत नाही. या गोष्टी घटनाकारांनी भारताची प्रतिष्ठा व न्यायाधीशांची प्रतिष्ठा अबाधित राहावी म्हणून तरतूद केली आहे. याशिवाय त्यांना वकिली व्यवसायापासूनदेखील प्रतिबंध घातलेला आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ज्या ठिकाणी त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले त्याच ठिकाणी त्यांनी वकिली जर केली तर न्यायाधीशांवर दडपण येऊ शकते.

## (७) न्यायाधीशांचे शपथग्रहण

भारतीय राज्यघटनेच्या कलम १२४ (६) नुसार सर्वोच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीशांना त्यांच्या नियुक्तीनंतर संविधानाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ राष्ट्रपती देत असतात व शपथविधीच्या दिवसापासून न्यायाधीश आपले पद ग्रहण करतात.

## (८) वेतन व भत्ते

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे वेतन ठरविण्याचा अधिकार संसदेला असतो. २०१९च्या बदलानुसार सध्या मुख्य न्यायाधीशांना दरमहा दोन लाख ऐंशी हजार रुपये वेतन दिले जाते, तर इतर न्यायाधीशांना दरमहा दोन लाख ऐंशी हजार रुपये वेतन दिले जाते. याशिवाय दिल्ली येथे निवासस्थान, प्रवासविषयक, आरोग्यविषयक, दूरध्वनीविषयक सवलत प्रदान केली जाते. निवृत्तीनंतर त्यांना निवृत्तिवेतन दिले जाते.

# ६.२.३ सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र म्हणजे त्याच्या खटले चालविण्याच्या व त्यावर निकाल देण्याच्या अधिकाराची व्याप्ती होय. त्याचे कार्यक्षेत्र आणि व्याप्ती भारताच्या राज्यघटनेने निश्चित केलेली आहे. सर्वोच्च न्यायालय हे भारतातील निर्णयाचे अंतिम न्यायालय आहे. भारतीय राज्यघटना व नागरिकांचे मूलभूत अधिकार यांचे संरक्षण करणे, तसेच घटनेतील विविध नियमांचा अर्थ लावणे, केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे तंटे मिटविणे, उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरुद्ध पुनर्निणय देणे, राष्ट्रपतींना कायदेविषयक सल्ला देणे, इ. कार्ये सर्वोच्च न्यायालयाद्वारे पार पाडली जातात. त्यामुळे श्री. सेटलवाड आणि श्री. कुष्णस्वामी अय्यंगार यांच्या मते, भारताचे सर्वोच्च न्यायालय हे जगातील कोणत्याही सर्वोच्च न्यायालयाच्या तुलनेत शक्तिशाली आहे असे म्हटले आहे.

## (०१) प्रारंभिक अधिकार क्षेत्र

प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणजे असे खटले की, ज्यांची सुरुवातच सर्वोच्च न्यायालयात होते हे सर्वोच्च न्यायालयाचे अत्यंत महत्त्वाचे अधिकार क्षेत्र आहे जे भारतीय राज्यघटनेच्या कलम १३१ नुसार खालील खटल्यासंबंधीचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणता येईल. ते पुढीलप्रमाणे आहेत,

(अ) राज्याविरुद्ध राज्य यांच्यातील संघर्ष

(आ) राज्याविरुद्ध केंद्र सरकार यांच्यातील संघर्ष .

(इ) केंद्र सरकारचा राज्यघटनेशी विसंगत निर्णय

(ई) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती व पंतप्रधान यांच्या निवडी संदर्भातील वाद

(उ) भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर आक्रमण झाल्यानंतर त्यांच्या विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. हे खटले केवळ सर्वोच्च न्यायालयातच चालवावे लागतात.

## (०२) पुनर्निणयाचे अधिकार क्षेत्र

भारतामध्ये एकेरी न्यायव्यवस्था आहे. न्यायपालिकेच्या सर्वोच्च स्थानी सर्वोच्च न्यायालय आहे. त्यामुळे कलम १३२ नुसार सर्वोच्च न्यायालयास पुनर्निणयाचा अधिकार आहे. भारतीय उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयावर पुनर्निर्णय देण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त झाला आहे. अर्थात उच्च न्यायालयाच्या निर्णयावर हा सर्वोच्च न्यायालयाचा पुनर्निर्णय आहे. खालील प्रकारचे खटले सर्वोच्च न्यायालय पुनर्निर्णयासाठी स्वतःकडे घेऊ शकते. फक्त सैनिकी न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालय पुनर्निर्णय देऊ शकत नाही.

### (अ) संवैधानिक दावे

भारतीय संविधानाच्या कलम १३२ मध्ये ही तरतूद आहे. उच्च न्यायालयाने असे प्रमाणपत्र दिले की, संबंधित खटल्याच्या बाबतीतील राज्यघटनेचा अंतिम अर्थ लावणे गरजेचे आहे, तर अशा खटल्यात सर्वोच्च न्यायालय पुनर्निर्णय देते.

### (आ) दिवाणी दावे

ज्या एखाद्या प्रकरणाचा संबंध मालमत्तेच्या संदर्भातील वादाशी असतो. दिवाणी प्रकरणांच्या बाबतीत कमीतकमी २० हजार रुपये किमतीचा असला पाहिजे, तसेच हा सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यायोग्य महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत झाला आहे असे प्रमाणपत्र उच्च न्यायालयाने दिले तरच सर्वोच्च न्यायालय भारतीय संविधानाच्या कलम १३३ नुसार दिवाणी दाव्यावर पुनर्निर्णय देऊ शकते.

### (इ) फौजदारी दावे

एखाद्या प्रकरणाचा संबंध गुन्ह्याशी असतो, अशा फौजदारी प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात उच्च न्यायालयाने प्रमाणपत्राशिवाय पुनर्निर्णय देऊ शकते. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात चालवावे, असे प्रमाणित केल्यास न्यायालयाने आरोपीला निर्दोष ठरविले, परंतु उच्च न्यायालयाने तो निर्णय बदलून आरोपीला दोषी ठरवून मृत्युदंडाची शिक्षा दिल्यास किंवा उच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा दिल्यास अशा प्रसंगी तोच खटला आपल्याकडे घेऊन कलम १३४ नुसार पुनर्निर्णय देऊ शकतो.

## (०३) सल्लाविषयक अधिकार क्षेत्र

भारताचे राष्ट्रपती आवश्यकतेनुसार ज्या ज्या वेळी पेचप्रसंग निर्माण होतील किंवा कायद्याच्या तांत्रिक बाजूचे प्रश्न निर्माण होतील ते प्रश्न राष्ट्रीय स्वरूपाचे असो किंवा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे असो अशा प्रसंगी सर्वोच्च न्यायाधीशांचा सल्ला मागतील असा सल्ला देण्याचे कार्य भारतीय संविधानाच्या कलम १४३ नुसार सर्वोच्च न्यायालय करील. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सल्ला राष्ट्रपतींवर बंधनकारक नसतो.

## (०४) रिट्स/आदेशाचे अधिकार क्षेत्र

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ नुसार भारतातील कोणताही नागरिक कोणत्याही हक्कांचे उल्लंघन झाल्यास हक्क परत मिळविण्यासाठी उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागू शकतो. मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाने किंवा उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास रिट असे म्हणतात. अशा प्रसंगी संबंधित अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय मिळावा यासाठी अन्याय करणाऱ्या संबंधिताला मूलभूत अधिकाराची अंमलबजावणी करण्याचा हुकूम अथवा आदेश देते. त्यासाठीच हा घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार नागरिकांना मिळाला आहे.

## (०५) स्वतः च्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याचे अधिकार क्षेत्र

भारतीय संविधानाच्या कलम १३७ नुसार आपण दिलेल्या निर्णयाचा फेरविचार करून पूर्वीच्या निर्णयात बदल करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असतो. भारतीय न्यायालयीन प्रक्रिया अशी आहे की, साक्षीपुरावे जमा करण्याचे कार्य जिल्हा पातळीवरील न्यायालय करतात. त्यांच्यातील चुका दुरुस्त करण्याचे कार्य उच्च न्यायालय करते तर त्यावर सुज्ञपणे विचार करण्याचे कार्य सर्वोच्च न्यायालय करते. असे होत असले तरीही सर्वोच्च न्यायालयाकडून चुका होणारच नाही असे नाही. सर्वोच्च न्यायालय हे अंतिम न्यायालय आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून चुका होऊ शकतात. कोणावरही अन्याय होऊ नये असे अपेक्षा असल्यामुळे सर्वोच्च न्यायालय पूर्वी स्वतःच दिलेल्या निकालावर कधी-कधी पुनर्विचार करून निर्णय देते, यालाच स्वतःच्या निर्णयावर पुनर्निर्णय असे म्हणता येईल.

## (०६) न्यायालयीन पुनर्विलोकन

न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे कायदेमंडळाने केलेला एखादा कायदा राज्यघटनेशी विसंगत असेल तर तो कायदा रद्द करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. यालाच न्यायालयीन पुनर्विलोकन असे म्हणता येईल. न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार भारताने अमेरिकन राज्यघटनेतून स्वीकारला आहे. राज्यघटनेची योग्य अंमलबजावणी व्हावी, राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांचा अनुचित वापर कोणत्याही सत्तेकडून होऊ नये किंवा एखाद्या राजकीय पक्षाने सत्ता हाती आल्यामुळे सत्तेचा गैरवापर करून विरोधकांना दडपून लोकशाही व्यवस्थेचा खून पाडू नये अशा प्रकारची खबरदारी भारतीय घटनाकारांनी घेतलेली दिसते, ते यावरून की त्यांनी लोकशाहीच्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार दिला आहे.

## (०७) अभिलेख न्यायालय

सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय म्हणून कार्यरत आहे. या न्यायालयाने दिलेले प्रत्येक निर्णय कलम २९ नुसार अभिलीखीत असून त्यांच्या नोंदी जतन करून ठेवल्या जातात. कारण भविष्यकाळात जर तशाच प्रकारची घटना, प्रसंग उद्‌भवला तर हे निकाल मार्गदर्शन म्हणून उपयुक्त ठरतात. याशिवाय हे न्यायालय न्यायालयाचा अवमान करणाऱ्या व्यक्तींना दंड किंवा शिक्षाही देऊ शकते.

## (०८) राष्ट्रपतींच्या आदेशानुसार एखाद्या प्रकरणाची चौकशी करणे

राष्ट्रपतींना एखाद्या प्रकरणाची किंवा एका व्यक्तीच्या गैरवर्तवणुकीची चौकशी करण्याचे आदेश दिल्यास सर्वोच्च न्यायालय त्या प्रकरणाची चौकशी करून राष्ट्रपतींना अहवाल सादर करते. उदा. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांना बडतर्फ करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो. त्यासाठी त्या अध्यक्ष व सदस्य यांची चौकशी सर्वोच्च न्यायालयामार्फत करावी लागते.

## (०९) अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या नेमणुका करणे

सर्वोच्च न्यायालयाला स्वत:चा व स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमणुकीचा अधिकार असल्याने सर्वोच्च न्यायालयातील अधिकारी व इतर कर्मचारी वृंद नेमणे, त्यांच्या नेमणुकीचे नियम, पद्धती ठरविणे, इत्यादी कार्ये सर्वोच्च न्यायालयास करावी लागतात.

## (१०) न्यायालयाच्या कामकाजाचे नियम व कार्यपद्धती ठरविणे

सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपतींची पूर्वपरवानगी घेऊन व संसदेने केलेल्या कायद्याला अनुसरून भारतीय संविधानाच्या कलम १४९ नुसार न्यायालयाच्या कामकाजाचे नियम तयार करण्याचे कार्ये सर्वोच्च न्यायालयास करावे लागतात.

## *स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न*

**चूक की बरोबर ते सांगा**

(१) भारताच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.

(२) भारतात २०१९ च्या बदलानुसार सर्वोच्च न्यायालयाची न्यायाधीशांची संख्या ३० आहे.

(३) न्यायाधीशांना सेवानिवृत्तीनंतर वकिली व्यवसाय करण्यास बंदी आहे.

(४) मूलभूत हक्काचे संरक्षणाची जबाबदारी राज्यघटनेने राष्ट्रपतींना दिली आहे.

(५) भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ नुसार मूलभूत हक्काचे उल्लंघन झाल्यास सर्वोच्च व उच्च न्यायालयामध्ये दाद मागू शकतो.

## ६.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

(१) **प्रिव्ही कौन्सिल :** इंग्लंडमध्ये न्यायदान करण्याची एक स्वतंत्र संस्था होती, ती स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीयांचे सर्वोच्च न्यायालय म्हणून न्यायदानाचे कार्य करीत असत.

(२) **प्रारंभिक अधिकार क्षेत्र :** प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणजे असे खटले की, ज्यांची सुरूवात पक्त सवोच्च न्यायालयात होते. उदा. राज्यविरूद्ध राज्य यांच्यातील संघर्ष, राज्यविरूद्ध केंद्रसरकार, इत्यादी.

(३) **पूनर्निर्णयाचे अधिकारक्षेत्र :** भारतातील सर्वोच्च न्यायालय हे एखादया उच्च न्यायालयाने दिलेल्या व स्वत: दिलेल्या निर्णयावर पून्हा विचार करून निर्णय देते.

(४) **रिट्स :** मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास ते हक्क मिळविण्यासाठी उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयामध्ये आपण दाद मागू शकतो. या संदर्भात संबंधित न्यायालयाने दिलेले आदेशास रिट्स असे म्हणतात.

(५) **न्यायालयीन पुनर्विलोकन :** कायदेमंडळाने केलेला कायदा जनतेच्या हीताचा नसेल, राज्यघटनेशी विसंगत असेल तर तो कायदा रद्द करण्याचा अधिकार हा सर्वोच्च न्यायालयास असतो.

(६) **अभिलेख न्यायालय :** सर्वोच्च न्यायालय हे एक अभिलेख न्यायालय म्हणून कार्य करते; म्हणजेच न्यायालयाने दिलेले प्रत्येक निर्णयाची नोंद ठेवत असते. कारण भविष्यकाळात पूर्वी प्रमाणे घडलेल्या घटना, प्रसंग पून्हा घडलेल्या असतील तर ते पून्हा निकाल देत असतांना त्या जतन ठेवलेल्या नोंदी मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडतात.

## ६.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(१) बरोबर

(२) चूक

(३) बरोबर

(४) चूक

(५) बरोबर

## ६.५ सारांश

सर्वोच्च न्यायालय या घटकामध्ये आपण न्यायालय व न्यायव्यवस्था याची निर्मिती, आवश्यकता आणि त्यांचे स्वातंत्र्य तसेच त्याची रचना, अधिकार क्षेत्र, इत्यादींचा अभ्यास केला. यातून आपणास सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्व दिसून येते. कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी मनमानी कायदे करून जनतेवर ते लादू नयेत, म्हणून कायद्याची संविधानिक चौकटीनुसार आहेत किंवा नाहीत याची चिकित्सा करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य तसेच भारतीय संविधानाचे संरक्षणाची जबाबदारीसुद्धा सर्वोच्च न्यायालयाचीच आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय या सर्वोच्च संस्थेला घटनाकारांनी एक स्वातंत्र्य संस्था म्हणून राज्यघटनेत स्थान दिले आहे.

सुप्रसिद्ध घटनातज्ज्ञ एम. व्ही. पायली यांनी असे मत व्यक्त केले आहे की, वरील अधिकारामुळे सर्वोच्च न्यायालयाला केवळ सर्वश्रेष्ठ स्थानच मिळाले आहे असे नसून ते राज्यघटनेचेही संरक्षक बनले आहे. न्यायालय ही कायदा तयार करणारी संस्था नाही, ती कायद्याचे संरक्षण करणारी संस्था आहे. भारतीय संविधानाचे रक्षण करणे तसेच भारतीय नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे, केंद्र व घटकराज्ये तसेच राज्या-राज्यांमधील वाद मिटविण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे.

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र स्पष्ट करा.

(२) न्यायालयीन पुनर्विलोकन व अभिलेख न्यायालयाचा अर्थ लिहा.

(३) सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य स्पष्ट करा.

(४) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची पात्रता व कार्यकाळ याविषयी माहिती द्या.

(५) भारतीय न्यायव्यवस्थेचा उदय सांगा.

## ६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) पाटील य. सांडूर, विठ्ठल पंडीतराव सांडूर, *लोकप्रशासन*, पुणे, निराली प्रकाशन.

(२) जाधव, तु. आणि शिरापूरकर, म., *भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध खंड-१ भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया*, पुणे, सुनील ॲकडमी

(३) बंग, के. आर, *भारतीय प्रशासन*, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स

(४) कटारिया, सु., *भारतीय लोकप्रशासन*, जयपूर, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, (हिंदी).

(५) वाघमारे, श्या., गजभारे, सु. (२००८) *भारतीय प्रशासनाची रूपरेषा*, लातूर, राजमुद्रा प्रकाशन.


ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

दूरध्वनी क्र. (०२५३ ) २२३१४७५, २२३१७१४

**Website:** https://ycmou.digitaluniversity.ac **Email:** dir_shu@ycmou.digitaluniversity.ac

**मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा**

## प्रत्याभरण

या पुस्तकाबाबत आपल्याला अभ्यासक्रमाची रचना, काठिण्य पातळी, भाषाशैली, विषय-विवेचन, स्वयं-अध्ययन प्रश्न या संदर्भात तसेच तुमचा संबंधित क्षेत्रातील अनुभव, प्रशासनातील अनुभव, प्रशासकीय सुधारणेविषयी नवीन दृष्टीकोन, लोकप्रशासनातील नवप्रवाह इत्यादींबाबत काही सूचना असल्यास पुढील पत्त्यावर किंवा खाली दिलेल्या ई-मेलवरून कळवाव्यात.

**आपल्या सूचना पाठवण्याचा पत्ता**

**संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२

dir_shu@ycmou.digitaluniversity.ac, pubadmycmou@gmail.com या ई-मेलवर पाठवू शकता.

**तुमच्याविषयी :**

(१ ) संपूर्ण नाव : ____________________

(२) संपूर्ण पत्ता : ____________________

____________________

(३) मोबाईल क्र. : __________ ईमेल : ____________________

(४) शिक्षण : __________ हुद्दा : __________

(५) तुमचा प्रतिसाद/सूचना : ____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

DB/AB21-154

*सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित*

ज्ञानगंगा घरोघरी


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

( महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले )

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक-४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७
फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६
वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac ● http://ycmou.ac.in